# आनंदलहरी

## श्री दत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचने

## भाग – ६

# आनंदलहरी

श्री दत्तमहाराज कवीश्वर

यांची

प्रवचने

भाग – ६

मधुकर हळवी 20.4.2008

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस
श्रीरामनवमी (शके १९३०)
रविवार, दि. १३ एप्रिल, २००८

मुखपृष्ठ
आमोद दामले

मुद्रक
रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२३२९१०३४

प्रकाशक
श्री दत्त आश्रम संस्थान
प.पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांती नगर समोर,
जालना - ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२ २३६८०५


*अखंड मंडलाकारं व्याप्तं येन चराचरम् ।*
*तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नम: ॥*

मानवजन्म प्राप्त झालेला असताना काहीतरी ईश्वराची सेवा घडावी, आपली पापं सर्व नष्ट व्हावीत, ईश्वरकृपेला आपण पात्र व्हावं हे सर्व संतमहात्मे सांगतात. त्यांनी त्याप्रमाणे ईश्वराची सेवा करून जन्माचं सार्थक करून घेतलेलं आहे. ईश्वराचं कार्य कसं होतं. भगवंतांनी अर्जुनाला उपदेश केलेला आहे. त्यात त्यांनी सांगितलं की मी बुद्धी देतो ददामि बुद्धी योगार्थ । मानवाला मी स्वत: बुद्धी देतो ही ईश्वरानी दिलेली बुद्धी वेगळी आहे. 'बुद्धी कर्मानुसारिणी ।' हा ही एक सिद्धांत आहे. पूर्वी पाप पुण्य करून आपण जसं आलो त्याप्रमाणे आपली बुद्धी तिकडं प्रवृत्त होते. परंतु ईश्वराची ज्याला कृपा आहे त्याच्यावर त्याला उत्तम बुद्धी प्राप्त होते. दैवी संपत्ती म्हणून ज्याला म्हटलेलं आहे भगवंतांनी की दैवी संपत्ती ही ईश्वराच्या कृपेनं प्राप्त होते. प्रल्हाद ५ वर्षांचा होता आणि त्याचा पिता हिरण्यकश्यपू त्रैलोक्याचा राजा होता. एखाद्या प्रांताचा मंत्री किंवा त्या मंत्र्याच्या हाताखालचे सहकारी आणखी कुठल्या कुठल्या खात्याचे मंत्री अशापैकी तो नव्हता. आणखी सगळं ताब्यामध्ये आहे. परंतु प्रल्हादाची मन:स्थिती परमेश्वराचं भजन करावं असं त्याला वाटायचं. शाळेमध्ये जरी गेला तरी ईश्वराच्या भजनाकडं लक्ष आहे. जे काही मुलांनी, पालक असतील म्हणा किंवा शिक्षक असतील त्यांच्या सांगण्याप्रमाणे अभ्यास तर करायचा काय. पण अभ्यासामध्ये आणखी आपल्याला यश मिळावं, आपली बुद्धी आणखी उत्तरोत्तर वाढत जावी, चांगली व्हावी याकरता ईश्वराची प्रार्थना ही आवश्यक आहे. गुरूभक्त भगवंतरावजी पटवर्धनांनी ही दोन्ही सोय केलेली आहे. सध्याच्या म्हणजे स्वराज्य मिळाल्यानंतरच्या एकंदर

राज्यशासनामध्ये ईश्वराचं नांव नाहीये, कोणच्याही विद्याअध्ययनामध्ये आणखी संतांच्या ग्रंथांचा अभ्यास करणं, काहीतरी विचार करणं इकडं प्रवृत्तीच नाहीये. त्यांनाही स्वत:ला ज्ञान नाही त्या अधिकाऱ्यांना श्रद्धा नाही, भक्ती नाही. पण तसेच कार्य होत आहेत. प्रल्हादाच्या अंत:करणामध्ये नारदमहर्षींनी आणखी प्रेरणा केलेली आहे. नारदांचे शिष्य प्रल्हादजी. पहिलं नांव आहे भक्तांमध्ये प्रल्हाद नारद पराशर पुंडलिक. पहिल्या नंबरचे भक्त म्हणजे प्रल्हादजी आहेत. त्यांनी आणखी ईश्वराचं भजन करावं. भक्ती करण्याकरता, ईश्वराची कृपा संपादन करण्याकरता हा जन्म आहे. हा त्यांचा पक्का निश्चय झालेला आहे. आत्मानात्म विचारही झालेला आहे. त्यामुळे हिरण्यकश्यपू त्याचा जो बाप होता तो आणखी विरुद्ध आहे. देवाचं भजन-बिजन काही करायचं नाही म्हणाला. कुठला अरी काढलाय. मी सगळ्यांचा ईश्वर आहे. मी मालक आहे. पण प्रल्हादजींना ते पटायचं नाही. देव दर्शन करणं, देवाचं नामस्मरण करणं, शाळेमध्ये गुरूजी कुठे बाहेर गेले की याचं आपलं भजन सुरू झालं. त्या गुरूजींनी जाऊन तक्रार केली, ''राजेसाहेब हा तुमचा मुलगा म्हणाले याची बुद्धी वेगळी दिसती. आम्हाला काही सांगता येत नाही. त्याला आम्ही शिकवू शकत नाही म्हणाले.'' त्याला बोलावलं हिरण्यकश्यपूनी आणि विचारलं, ''मी कोण आहे तुला माहिती आहे की नाही. संपूर्ण त्रैलोक्यामध्ये माझी इच्छा कोणी मोडू शकत नाही. माझी आज्ञा कोणीही आणखी भंग करू शकत नाही. तेव्हां मी इतका मोठा असताना तू माझ्या आज्ञेच्या विरुद्ध कसा वागतोस? हरीचं भजन करायचं नाही म्हटलं असतांना करतो आहेस.'' प्रल्हादजींनी उत्तर दिलेलं आहे आपल्या पित्याला. ''पिताजी सर्व त्रैलोक्य जिंकलं आहे असं आपण म्हणता. पण









स्वत:चं मन सुद्धा आपण जिंकलं नाही, आपल्या मनांत येईल ते झालं पाहिजे. मनाप्रमाणे वागणारे तुम्ही मनाला जिंकू शकला नाही. सगळं जिंकलं म्हणता काय जिंकलं? मनाकडं पहा. आपली बुद्धी चांगली आहे की नाही हे पहात चला. आत्मनिरीक्षण करा. त्याचा अभ्यास रोज करा आपण म्हणजे आपल्याला समजून येईल की आपल्याजवळ किती दोष आहेत आणि ते दोष दूर करण्याची शक्ती आपल्यामध्ये नाही आहे. ती ईश्वराची शक्ती आहे.'' म्हणून त्यांनी पुष्कळ छळ केलेला आहे. प्रल्हादजींचा छळ प्रसिद्ध आहे. 'प्रल्हादासि पिता करितो दाटणी परि तो स्मरे मनी नारायण.' किती जरी पित्यानी त्रास दिला, मारण्याचा प्रयत्न केला सगळी शस्त्रास्त्रं वापरली परंतु काहीही उपयोग झाला नाही. त्यावेळेला त्याच्या मनावर थोडासा का होईना एक परिणाम झाला की इतकी शस्त्रास्त्र वापरून मी त्याला ठार मारण्याचा प्रयत्न करतोय परंतु हा जिवंत आहे. काय आहे. माझ्यापेक्षा कोणीतरी एक शक्ती मोठी आहे काय? अशी एक मनामध्ये कल्पना उत्पन्न झाली पण जवळची जी मंडळी असतात ती अहंकार वाढवणारी आहेत. आपण त्रैलोक्याचे राजे, आपल्याला भीती बाळगण्याचं काय कारण आहे? आपण त्याला गुरूजींना नेऊन देऊ, शुक्राचार्यांना सांगू वगैरे वगैरे. शेवटी अवतार त्या भगवंताला प्रल्हादाकरता घ्यावा लागला आणि त्याचा जो बाप होता त्रैलोक्याला त्रास देणारा. मी म्हणतोय तसं झालं पाहिजे. माझी आज्ञा सगळ्यांनी पाळली पाहिजे. मुलगा बिलगा मी काही जाणत नाही. मुलालासुद्धा मी ठार मारीत. मारू शकणार नाही. पण ही जी निर्भयता त्या मुलाच्या ठिकाणी उत्पन्न झालेली आहे ही निर्भयता सर्वही वेदव्यास महर्षींनी प्रल्हाद चरित्र वर्णन केलेलं आहे. की ही निर्भयता बुद्धीमध्ये उत्पन्न झाली, ईश्वरांनी दिलेली आहे. ईश्वराच्या

कृपेने निर्भय बुद्धी होते. अभयंसत्वसमशुद्धी. भगवद्गीतेमध्ये अभयम् हे पहिलं लक्षण आहे. दैवी संपत्तीचं. निर्भय असतो. भगवंताचा भक्त निर्भय असतो. कुणीही कितीही त्रास दिला तरी त्याला त्याच्याबद्दल मनावर परिणाम होत नाही. निर्भयपणाने आणि आपलं कर्तव्य जे आहे, संतमहात्मे जसं सांगताहेत त्याप्रमाणे आपण वागायचं. ही निर्भयता आणि त्यामुळे शेवटी त्याच्या पित्याचा नाश झाला. भगवंताला यावं लागलं आणखी हिरण्यकश्यपूचाही नाश झालेला आहे. त्यावेळी प्रल्हादजींनी पुष्कळ मोठी स्तुती केलेली आहे. आणि वर मागायला सांगितला त्यांनी. नरसिंह प्रगट झाले. ''प्रल्हादा काय तुला वर पाहिजे बाबा'' ''मला वर मी वर मागण्याकरता काय तुमची भक्ती करीत नाही म्हणाले मी निष्काम आहे. काहीही माझी इच्छा नाही. पिता मारत होता म्हणून त्याला मारा असं मी कुठं म्हटलं तुम्हाला? माझ्या पित्यापासून वाचवा असं मी म्हटलं नाही. तुम्ही आपलं तुमची दया, त्या वेळेमुळे तुम्ही केलेलं आहे. मला काहीही वर नको.'' हे एक आश्चर्य आहे. संतमहात्म्यांची बुद्धी किती शुद्ध झालेली असते. ५ वर्षांच्या मुलाला ठार मारणारा पिता परंतु शेवटी त्या प्रल्हादांनी आपल्या करता वर मागून घेतलाच. माझ्या मनामध्ये कामना, माझ्या मनामध्ये कोणचीही वासना राहू नये. सात्विक सुद्धा नको, निर्मळ असं अंत:करण झालं पाहिजे.

त्याशिवाय आपली भक्ती राहणार नाही. आणि नंतर एक प्रार्थना केली. ''देवा आणखी एक वर मागू का म्हणाले. हे ते माझे पिताजी आहेत यांचा आपण उद्धार करावा, यांनी आपला द्वेष केला, अज्ञान आहे. मध्यस्थी, जो पाहिजे तो असा पाहिजे. शुद्ध बुद्धीचा पाहिजे. आपल्याला त्रास दिलेला आहे यांनी. जाईना नरकात. नाही. नरकातून काढणारी शक्ती आज आपल्यासमोर आहे. त्या

ईश्वराजवळच प्रार्थना. आणि याचा उद्धार केला. नरसिंहांनी उत्तर दिलेलं आहे. अरे तुझा पिता इतका पवित्र झाला आहे की त्याची सगळी पापं गेलेली आहेत. २१ पिढ्या याच्या पूर्वीच्या आणि हा हे सगळे पवित्र झालेली आहे. स्वर्ग लोकाला गेले. यत् साधोस्यपुरेजात: ....... देवाला कुठे मान द्यायचा भक्तांनी पण देव भक्तालाच मोठेपणा देतो. या हिरण्यकश्यपूच्या कुळामध्ये तुझ्यासारख्या शुद्ध बुद्धीचा भगवद्भक्त निर्माण झाल्यामुळे याचा उद्धार झालेला आहे. म्हणून काही त्याला अभिमान झालेला नाही. ही जी खरी सर्वही शत्रूंचं, सर्वांचा सुद्धा कल्याण व्हावं अशी इच्छा करणारी बुद्धी ही ईश्वराच्या कृपेशिवाय मिळणार नाही आहे. आणि असा बुद्धीचा विकास झाला पाहिजे. शुद्ध बुद्धी झाली पाहिजे. काम, क्रोध, द्वेष वगैरे जे विकार मनामध्ये वाढतात. मला यांनी त्रास दिलेला आहे, याचं केव्हा आपण हे करू अशी सारखी भावना द्वेषभावना आणि त्यामुळे अशांती सारखी मनामध्ये रहाते. याप्रमाणे अशी चरित्र आहेत. महाभारत आहे. भागवत आहे. सर्वही आणखी लहान वयामध्येच ही आवड लागली पाहिजे. देवाचं सान्निध्य या ठिकाणी गुरूमहाराजांचं आहे. आपण सर्वही मुलांना सांभाळणारी मंडळीही प्रेमानी, स्त्रिया आहेत, पुरूष आहेत. वळण लागावं. आपली बुद्धी चांगली व्हावी म्हणून प्रयत्न करणारी मंडळीही आहेत. हे लक्षात ठेऊन रोज देवदर्शन करणं, काहीतरी थोडसं नामस्मरण करणं आणखी आपला अभ्यास करून चांगले ग्रंथ आपल्या वाचनात रहावे तर त्याच्या योगानी आपलं मन शुद्ध, पवित्र होऊन जातं आहे. याप्रमाणे पूर्वीच्या सर्वही ऋषीमंडळींनी सर्वांच्या करताही मार्गदर्शन करून ठेवलेलं आहे. अरण्यामध्ये रहायचे, काय धान्य बिन्य थोडं फार असायचं, काय मिळेल त्यामध्ये समाधान मानून सर्वेपि सुखिन: सन्तु । सर्वे सन्तु निरामय: । सर्वे

भद्राणी पश्यन्तु मा कश्चित् दु:खमाप्नुयात् ॥ हे कल्याण आहे. सर्वांचं कल्याण म्हणजे सुख मिळालं पाहिजे सर्वांना. आपल्याला एकट्यालाच सुख मिळालं पाहिजे अशी इच्छा नाही. सर्वही सुखी व्हावे. त्याचप्रमाणे सर्वांना आरोग्य मिळावं ही ही प्रार्थना देवाजवळ करतायत. सर्वे सन्तु निरामय: । शरीर चांगलं असल्याशिवाय काय होणार. प्रपंच तरी काय होणार आणि परमार्थ तरी काय होणार? म्हणून कोणालाही, आणखी आमय म्हणजे रोगराई होऊ नये, सर्वांचं शरीर चांगलं असावं, सर्वांना बुद्धी चांगली असावी. त्यांचं सबंध जीवन मंगलमय व्हावं. सगळं मंगलमय त्यांना पहायला मिळावं आणि सर्वही दु:खापासून मुक्त व्हावेत अशी त्या संतमहात्म्यांची इच्छा आहे. स्वतंत्र स्वत:साठी देवाजवळ ते काहीच मागत नाहीत. ती एक वेगळी बुद्धी आहे. स्वत:चाही त्यात समावेश आहेच आहे. नाही असं नाही. पण मला सुखी करा असं म्हणत नाहीत. मला संपत्ती द्या. मला आणखी सत्ता द्या. अशी प्रार्थना कधीही करायची नाही. सकाम आणखी भक्ती करायचीच नाही. त्याप्रमाणे इथं आपल्याला शिकवणारी मंडळी चांगली आहेत. ईश्वराचीच ही योजना आहे. की या येऊर मध्ये कोणी उत्पन्न झाला आणखी त्यामुळे अशा प्रकारची मंडळी आपल्याला मार्गदर्शन करायला भेटलेली आहेत. ईश्वरानी, सद्गुरू महाराजांनी, राष्ट्राला उपयुक्त असलेली बुद्धी चांगली लाभावी त्यांनी आणि राष्ट्रकार्य तुमच्याकडून व्हावं एवढीच आणखी गुरू महाराजांच्या जवळ प्रार्थना आहे.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**

॥ श्री गुरुदेव दत्त ॥

***अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानांजनशलाकया।***
***चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरुवे नम: ॥***

मन किंवा बुद्धी ज्याला म्हणतात. अंत:करण तत्वं ज्याला म्हणतात ते आहे. बाह्य साधने आणि अंत:करण म्हणजे आतले साधन आहे. बाह्य विषयांचं ज्ञान करुन देणारी इंद्रिय, बर्हिन्द्रिय ज्याला म्हणतात. बाहेरचे विषय आहेत. डोळ्याने दिसतात पदार्थ. कानाने शब्द ऐकू येतात. रसनेंद्रियाने बाहेरच्याच विषयांचा रस समजतो. घ्राणेंद्रिय आहे. त्याच्या सहाय्याने गंधांने ज्ञान होते. आणि त्वगिंद्रिय आहे ते सर्वात मोठे इंद्रिय आहे, शरीरव्यापी. त्याने स्पर्शाचे ज्ञान होते.

तर हे सगळे विषय समजून देणारी ज्ञान करुन देणारी इंद्रिय ही बर्हिन्द्रिय आहेत. बाहेरच त्यांचे विषय असतात. मन आणखी बुद्धी ही दोन तत्वं वेगळी वेगळी नाहीत. एक अंत:करण तत्व म्हणून जे आहे त्यालाच मन असंही म्हणतात, बुद्धी असंही म्हणतात, वेगळ्या वेगळ्या अवस्थेमध्ये. संशयास्पद स्थितीमध्ये शास्त्रकार त्याला मन असं म्हणतात. निश्चय झाला म्हणजे ते कार्य बुद्धीचं आहे असं समजतात. बुद्धी तत्वं आहे. निश्चय झाल्या नंतरच कोणचंही कार्य घडतं आपल्या हातून.

ह्या आंत राहणाऱ्या सर्वही पदार्थांना मिळून सूक्ष्म शरीर असं नाव आहे. हात, पाय, डोळे वगैरे जरी बाहेरुन दिसत असते तरी ती इंद्रिय नाहीयेत. म्हणजे हा पदार्थ अतिंद्रिय आहे. इंद्रियांनी दिसणारा नाहीये. समजणारा नाहीये. स्थूल देह इंद्रियांनी समजतो. ध्वनीचे ज्ञान करुन देणारे जे इंद्रिय दिसत नाहीये, हे बाहेरचे कान आपण पहातो ते बहिऱ्यांनासुद्धा असतात. पण त्यांना शब्दाचं ज्ञान होत

नाही. म्हणून शब्दज्ञान करुन देणारे इंद्रिय वेगळं आहे. ते त्याला नाहीये, असं मानाव लागतं. डोळ्यांनी डोळ्यापुढे आलेले सर्व पदार्थ समजतात. पण डोळे हे जे इंद्रिय आहे ते स्वत: समजून घेत नाही. दुसऱ्याचे डोळे आपण पहातो म्हणजे डोळ्यांची जागा आपण पहातो. पण मूर्त पदार्थ समजून देणारे इंद्रिय हे तिथे दिसत नाही, पहाण्याचं स्थान ते आहे.

तर अशी सूक्ष्म तत्वं शरीरात किती तरी आहेत. दिसली नाहीत तरी त्यांच्या कार्यावरुन त्यांचं अस्तित्वं मान्य करावं लागतं. पुढे येणारा पदार्थ समजतो आणि त्याप्रमाणे आपण वागतो, यावरुन डोळे हे इंद्रिय आहे आम्हाला. दिसला नाही पदार्थ म्हणजे नाही. त्याचं अस्तित्व किंवा नास्तित्व त्याच्याप्रमाणे मानतो. अनुमान प्रमाण त्याला म्हणतात. तर ही न दिसणारी सगळी तत्वं शरीरामध्ये आहेत. आत्म्याबरोबरच ती आलेली आहेत आणि ज्या ज्या देहामध्ये तो आत्मा जातो आहे त्या त्या देहामध्ये सूक्ष्म शरीराच्यारुपाने ती जात आहेत. स्थूल शरीराला कालमर्यादा आहे, ज्याला आपण आयुष्य समजतो. त्याची कालमर्यादा संपली म्हणजे ते स्थूल शरीर इथंच पंचतत्वांमध्ये विलीन होतं आणि सूक्ष्म शरीर दुसऱ्या शरीरामध्ये जातं. जीवात्मा, हाही त्याच्याबरोबर आहे.

हा जो विभाग सांगितला वेदांत शास्त्राच्या दृष्टीने - शरीरात राहाणारा जीवात्मा म्हणजे कोण आहे? हा एक विचार उपनिषदांमध्ये केलेला आहे. वेदांत शास्त्रं म्हणजे आत्मा किंवा अनात्म या पदार्थांचा विचार करणारे शास्त्रं. वेदांचा अंत म्हणजे शेवटचा असा अर्थ नव्हे. अंत भाग म्हणजे निश्चयात्मक भाग. वेदामध्ये सांगितलेल्या पदार्थांचा निश्चय ज्याच्यामध्ये केलेला आहे असा भाग म्हणजे उपनिषद भाग. सगळ्या उपनिषदांना वेदांत म्हणतात.

त्या वेदांतामध्ये हा जीवात्मा कसा आहे हे सांगितले आहे, आणि तोच सिद्धांत पहिल्या ''दिगंबरा'' शब्दाने महाराजांनी दाखवला आहे.

***दिग्भिरवेष्टितमम्बरमेव प्रत्यग्ब्रह्मेति ।***
***खंब्रह्मेति श्रुतिरपि वदति दिगंबराचेति ॥***

ब्रम्हतत्व ज्याला म्हणतात अथवा ईश्वरतत्वं ज्याच्या संकल्पाने सर्व जग निर्माण झालेलं आहे. इतकी त्याची शक्ती आहे. एक तत्वं असताना आपण बहुरुप व्हावं असा नुसता संकल्प होताच पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश ही पंचमहाभूते निर्माण झाली. त्यांच्या पासून इतर सगळे भौतिक पदार्थ निर्माण झाले. शरीरे काय, वृक्ष काय, सगळंच तयार झालं. तर ही ज्याची संकल्पं शक्ती आहे, तो मुख्य परमात्मा, ईश्वर, भगवान सगळी नावं त्याचीच आहेत, तोच जीवात्मा बनलेला आहे. सर्व मी तोच झालेला आहे हा मुख्य सिद्धांत आहे. पण ती ज्ञानदृष्टी उत्पन्न झाली पाहिजे, त्याकरता प्रयत्न करायला पाहिजेत. ते प्रयत्न म्हणजे काही चार पाच वर्ष महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेण्यासारखं नाही. अनेक जन्म अभ्यास करुन ती आपली बुद्धी तशी तयार केलेली असते.

''मी कोण आहे?'' हे आपल्याला कळत नाही. देहाला आपण ''मी'' म्हणतो. इंद्रियांना, मनाला सगळ्यांनाच आपण ''मी'' म्हणतो. सगळी कार्य करणारा ''मी'' आहे, म्हणजे सर्व ठिकाणी ''मी'' असा शब्द आपण वापरतो. तो खरा ''मी'' नाहीये.

जीवाचं स्वरुप आणि ईश्वराचं स्वरुप अगोदर वेगळं वेगळं दाखवतात, महाराज. आणि दोन्हीही एक कसे आहेत हे शेवटी सांगतात. तर ह्या जीवात्म्याला देहापासून ''मी''म्हणायला सुरुवात झाली. जीव आणि देह एकरुप होऊन गेलेले आहेत. मी उंच आहे,

मी काळा गोरा आहे, मी चालतो, मी ऐकतो, म्हणजे सर्व ठिकाणी ''मी'' भरुन राहिलेला आहे. त्याच्याशी तादात्म्य पावलेला आहे. तो खरा ''मी'' कोणचा आहे हे प्रथम सांगितलं आहे--

***दिग्भिरवेष्टितमम्बरमेव***

प्रत्यग् ब्रम्ह त्याला म्हणतात. सर्वांच्या आंत आहे. म्हणजे ह्या देहाच्या आत सूक्ष्म शरीर जे सांगितलं आहे, ह्या सूक्ष्म शरीरामध्ये पांच कोष म्हणून विभाग केले आहेत. जीवात्माचे शरीर झाकणारे म्हणून त्यांना कोष म्हणतात. तलवार म्यानामध्ये ठेवली की कोष म्हणतात त्याला. तलवार झांकली गेलेली आहे. तसा जीवात्मा आच्छादित झालेला आहे.

पहिलं आच्छादन म्हणजे अन्नमय कोष, ज्याला आपण देह समजतो. अन्नाने वाढणारा, अन्नामध्ये विलिन होणारा, इथे अन्न म्हणजे पृथ्वी असा अर्थ घेतलाय त्यांनी. तर हा पहिला कोष म्हणजे माझ्या शरीराचं नांव आपण समजतो. सर्व क्रिया शरीराकडून होतात म्हणजे मीच करतो असे समजतो आपण. ते बाहेरचे आच्छादन दूर झाले पाहिजे. अम्बरम् म्हणजे आकाशाप्रमाणे वेष्टित असं ईश्वर तत्वं आहे. त्याला हे जे दृष्य पदार्थ समजून येणारे, मूर्त पदार्थ आहेत-- हे शरीर आहे त्याच्या आतमध्ये प्राणवायू आहे, त्याच्या नंतर मन आहे, त्याच्या नंतर बुद्धी आहे. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय कोष म्हणून आहे -- बुद्धी आणि आनंदमय कोष म्हणून आहे. ज्ञानमय कोष म्हणून एक ईश्वराची शक्ती आहे. ह्या सगळ्याही दृष्य किंवा मूर्त पदार्थांनी तो झांकून गेलेला आहे.

ते जे प्रत्यग् म्हणजे आत असलेले ब्रम्हतत्वं आहे ते जीवात्म्याचे खरे स्वरुप आहे. तो आनंदरुप आहे, निर्विकार आहे. खरा ''अहम्'' समजून येत नाही आपल्याला. सर्व कार्य करणारा मी आहे. सुखी

होणारा, दु:खी होणारा, कामक्रोधादिक विकार ज्याला उत्पन्न होतात, जातात असं चाललेलं आहे सारखं. पण या सगळ्या विकारांमध्ये सांपडलेला जीवात्मा ''अहम्'' हा खरा नाहीये. विचार करुन सत्पुरुषांच्या संगतीमध्ये राहून हे वारंवार ऐकून, त्यांच्याकडून योग्य रीतीने समजून आलेलं असताना या जीवाच्या स्वरुपापर्यंत आपण बुद्धीच्याद्वाराने जातो. हे सगळं जे आहे ते बाजूला होतं, आणि प्रत्यगात्मा म्हणजे अंतरात्मा, आपल्याला कोण ते समजतं. देह हा एक आत्मा आहे. इंद्रिय हा एक आत्मा आहे. मन एक आत्मा आहे. सगळ्यालाच आत्मा समजतो आपण. मग खरा आत्मा कोण आहे?

ते जे प्रत्यग्ब्रह्म म्हणजे साक्षी निर्विकार, स्वयंप्रकाशी, आनंदरूप जे आहे ते खरं जीवाचं रूप आहे. खरा मी म्हणजे असा आहे. पण तिथपर्यंत बुद्धी जायलाच किती तरी काल जातो आहे. तो ''अहम्'' शुद्ध सांपडला, त्या स्वरुपाचं अनुसंधान निरंतन करावं म्हणून सांगतात. सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी काही स्तोत्रं केलेली आहेत. त्या स्तोत्रांमध्ये हाच विषय मांडलेला आहे. आत्मानात्म विचार म्हणून. स्वरुपानुसंधान सारखं चालू पाहिजे.

मी निर्विकार आहे. मी सुखदु:खादि द्वद्वांतीत आहे. मी आनंद स्वरूप आहे. ह्या स्वरूपाचं अखंड अनुसंधान झालं तर संसार बाजूलाच रहातो. त्याच्यामध्ये काही कमी जास्तीपणा झाला तरी याला त्याचं सुख दु:ख काही नाही. तो द्वंद्वातीत आहे. म्हणून ते जे आपलं आत्मं स्वरूप आहे त्याचं अखंड अनुसंधान झालं पाहिजे. तर ते

***स्वरूपानुसंधान । व्हाया कीजे मन:शोधन***
***देवगुरू सेवन । सदाचरण अनासक्ते ।।***

ही त्याची साधना आहे. शुद्ध आत्मस्वरूपाचं ज्ञान होण आणि मनाने त्याचे अखंड अनुसंधान घडणं ह्याच्याकरता पुष्कळ चित्त शुद्धं झालं पाहिजे. आपली बुद्धी शुद्धं झाली पाहिजे. बुद्धीमध्ये असणारे कामक्रोधादि सगळे दोष निघून गेले पाहिजेत. रजोगुण, तमोगुण सगळे बुद्धीतले जाऊन शुद्ध सत्वगुणात्म बुद्धी ज्या वेळेला होईल त्या वेळेला ते आत्मस्वरूप त्या बुद्धीला सापडतं. त्याचं अनुसंधान मग अखंड करतात. त्या करता देवांची गुरूंची, संतांची सेवा, सत्कर्माचे आचरण हे सारखं चालू ठेवलं पाहिजे. म्हणजे आत्मस्वरूपाचं चिंतन होत. ते आत्मस्वरूप म्हणजे खरा जीवात्मा तो आहे, प्रत्यग्ब्रह्म आहे, निर्विकार आहे.

आणखी ईश्वर तत्व खंब्रह्मेती श्रुतिरपि वदति दिगंबराचेति, सर्व व्यापक असं ईश्वर तत्व आहे. तो सर्व स्वरूपी आहे. आणि ह्या देहामध्ये रहाणारा जीवात्मा -- सर्वही इन्द्रिय, मन, बुद्धी, प्राण या सर्वाची कार्य पहाणारा -- फक्त पहाणारा आहे. त्याचा त्यांच्या कार्याशी कोणचाही संबंध नाही. ही वस्तुस्थिती या पहिल्या श्लोकात सांगितली आहे. हे दोघेही एक आहेत, असं नंतर सांगतायत

***दिगवत् चाम्बरमेव व्यापक पूर्णब्रह्मेति।***
***सच्चितसुखधनमायातीतं दिगंबरा वदति॥***

दुसऱ्या ''दिगंबरा'' ह्या संबोधनात दोघेही एक होऊन गेलेत. जीवात्माचे अनुसंधान, मी कोण आहे हे समजून घ्यायचं. त्याचं अखंड अनुसंधान ठेवायचं. बाकी विसरून जायचं सगळं. ह्या करता त्याचं अनुसंधान आहे. त्यानंतर ईश्वर स्वरूप काय आहे? आकाशाप्रमाणे सर्वव्यापी ईश्वर स्वरूप आहे आणि दोघेही परिपूर्ण आहेत.

***जो सत्य आहे परिपूर्ण आत्मा।***

या गुरूस्तुतीत तेच सांगितले आहे. परिपूर्ण आत्मस्वरूप म्हणजे जीवही नाही आपण ईश्वरस्वरूपही नाही. सच्चिदानंदघन स्वरूप, अद्वितीय अशा प्रकारचं जे आहे तेच प्रत्यग् ब्रम्ह आहे आणि त्याने अनुसंधान करण्याकरता ''दिगंबरा'' ह्या दुसऱ्या शब्दाने सांगितले आहे.

त्यानंतर ''श्रीपादवल्लभ'' हे संबोधन आहे. आणि शब्द परत ''दिगंबरा'' आहे. त्याचंही विवेचन केलं आहे.

***श्रीपादवल्लभ नाम प्राप हि नक्रगजेंद्रमिव ।***
***द्रौपद्यंबरीबचोर ग्रसितद्विजमेव ॥***

श्रीपादवल्लभ या नामामध्ये इतकं स्मरण झालं महाराजांना. श्रीपाद हा दत्तात्रेयांनी घेतलेला अवतार आहे. गुरूचरित्रामध्ये त्या अवताराची कथा आलेली आहे. आरंभाला ज्ञान भूमिकेववरून विचार झाला आहे. तत्व विचार करताना देह, इंद्रिय, मन, प्राण वगैरे सगळं बाजूला ठेवले. आणि त्याचा साक्षी -- ज्याच्या अस्तित्वामुळे या सगळ्यांना कार्य करता येतं तो अंतरात्मा म्हणजे जीवाचं स्वरूप आहे. तो निर्विकार, साक्षी आहे. ईश्वराचं स्वरूप सर्वव्यापी आहे. सर्व विश्वरुपी, विराटरुपी तो आहे. आणि हे दोघेही एक आहेत. हे दोघेही एक आहेत. हे दुसऱ्या श्लोकात सांगितले आहे. ज्ञान किंवा तत्वं दृष्टीने या दोघांचे स्वरूप सांगून त्यांचे ऐक्य सांगितले आहे.

आता श्रीपादवल्लभ हा अवतार झाला. श्रीपादवल्लभ हे नांव जे प्राप्त झालं आहे हे भक्तांचं कल्याण कसं केलं त्यांनी त्यावरून प्राप्तं झालयं. अवतार हा निर्मोह आहे. त्याला काही मोह नाही. पण जीवात्माला मोह उत्पन्न झालेला आहे. मी शरीर आहे. मी दुःखी आहे. मी मोठा आहे, श्रीमंत आहे, गरीब आहे वगैरे. हे सगळे भ्रम झालेले आहेत. ईश्वर हा सर्वव्यापी, सर्व स्वरूपी आणि निर्मोह आहे.

भक्तीमार्गाच्या योगाने त्या ईश्वरस्वरूपाची कृपा झाली म्हणजे हे सगळं ज्ञान होतं.देहादिकांपासून ते मन बाजूला होता होता आत्मस्वरूपाच्या ठिकाणी जाऊन पोहोचतं आणि त्याचं अनुसंधान होऊ लागतं. ईश्वर कृपेनं विचारांनी ईश्वरस्वरुपाचं ज्ञान होतं आहे. आणि त्याच्या संबंधी अंत:करणामध्ये भक्ती आणि प्रेम निर्माण होतं. ज्ञानदृष्टी आणि प्रेमदृष्टी या भक्तीच्या भूमिकेवरून हा विचार चाललेला आहे.

श्रीपादवल्लभांचं म्हणजे ईश्वराचं स्मरण झाल्यानंतर नक्र आणि गजेंद्राची प्रथम आठवण येते. मगराने त्या गजेंद्राला धरल्याची कथा सर्वांना माहीत आहे. मगर जेव्हां त्याला आंत ओढून नेऊ लागला तेंव्हा त्याला ईश्वराचं स्मरण झालं. त्याने ईश्वराची प्रार्थना केली. भगवान श्रीही गरुडावर बसून आले. आणि त्यांनी त्या गजेंद्राला मुक्त केले. संकटात सांपडल्यावर एका ईश्वराशिवाय दुसरा कोणीही आपला त्राता नाही या भावनेने शरण गेलेला गजेंद्र, त्याचं रक्षण केलं.

आता दुसरी कथा सांगतात, द्रौपदी, अंबरीष आणि चोरांच्या तावडीत सापडलेला ब्राह्मण. द्रौपदी आणि अंबरीष यांचंही संरक्षण केलं भववतांनी श्रीकृष्णांनी द्रौपदीचं रक्षण केलं. अंबरीषाचं रक्षण महाविष्णुंनी केलं तरी ते एकच रूप आहे. तेही संकटात सापडलेले होते. द्रौपदीच्यावर मोठं संकट आलेलं आहे. भर सभेमध्ये तिची विटंबना व्हावी म्हणून सर्व कौरव प्रयत्न करताहेत. कोणीही तिचा त्राता नाही. सर्व पांडव तिचे पतीसुद्धा स्वस्थ बसलेले आहेत. अशा वेळेला अनन्य अंत:करण तिचं झालेलं आहे. अन्य जे आहे ते बाजूला करून त्या ईश्वरस्वरूपाच्या ठिकाणी जर अंत:करण जडलं तर ईश्वराचं दर्शन होतं, कृपा होते. तत्वज्ञानामध्येही अनन्य व्हायला

पाहिजे. म्हणून पंचकोष बाजूला करून शुद्ध आत्मस्वरूपाच्या पर्यंत अंत:करण पोहोचलं पाहिजे. ईश्वरस्वरूप समजून घेणं आणि त्याच चिंतन फक्त आनंद म्हणून करणं, ही ज्ञान भूमिका आहे. त्याच्यातही भक्तीची आवश्यकता आहे.

ईश्वराच्या स्वरूपासंबंधी विचार चालू असताना श्रीपादवल्लभ भक्तवत्सल कसे आहेत हे समजून देण्याकरता गजेंद्राला मगरापासून मुक्त केलं भगवंतांनी, त्याची कथा सांगितली. त्याचं स्मरण केल. द्रौपदीचंही संरक्षण भगवंतांनी केलं आहे. तिला वस्त्रं दिली. हेही आर्त भक्ताचं लक्षण आहे. अंबरीष राजा असाच संकटामध्ये सांपडला. दुर्वास ऋषी शाप द्यायला लागले. महाविष्णु येऊन, ''मला शाप द्या'' म्हणाले. ''तुमचा शाप भोगायचं सामर्थ्य अंबरीषाचं नाही. त्याच्याकरता तुमचा शाप मी भोगतो.'' अनेक जन्म घ्यावे लागतील तुला. असं ते अंबरीषाला म्हणाले. महाविष्णु म्हणाले, मी घेतो त्याच्याकरता जन्म.

वस्तुत: जन्माला कारण म्हणजे कर्म आहे. पापपुण्यं जे काही घडलं असेल त्या प्रमाणे जन्म येतो म्हणजे नवीन शरीराशी जीवात्म्याचा संबंध होतो. जुनं शरीर पडणं म्हणजे मृत्यु आणि नवीन शरीराशी जीवात्म्याचा संबंध म्हणजे जन्म आहे. हे नवीन शरीर कोणाचं मिळेल याचा काही नियम नाही. जशी कर्म असतील त्याप्रमाणे ते प्राप्तं होतं. जास्तीत जास्त पाप असेल तर वृक्ष योनीत जन्म येतो. म्हणजे वृक्षामध्ये जीव आहे हे आपल्या शास्त्रकारांनी पूर्वीच सांगितलं आहे. पुण्यकर्म असेल तर मनुष्यादिकांची शरीरे मिळतात. तर वस्तुत: ईश्वराला पापपुण्याचा काही संबंधही नाही. निर्मोह आहे. सगळं कार्य त्याचं चाललं आहे. आणि त्याचा त्याला अहंकार नाही. सत्कर्म जरी झाली तरी त्या कर्माचा अहंकार उत्पन्न

झाला तर त्या संपूर्ण कर्माचं फळ मिळत नाही. कर्म ईश्वरार्पण करणं म्हणजे कर्तृत्व ईश्वराचं आहे ही भावना जर ते कर्म करताना असेल तर ते कर्म अत्यंत शुद्धं होतं.

ईश्वराला त्यांच काहीच नाही. संपूर्ण विश्व उत्पन्न करणं , त्याचं संरक्षण करणं आणि पुन्हा संहार करणं ही केवढी मोठी कार्य आहेत. विश्व असतानासुद्धा संकटात सांपडलेल्या अनेक जीवानां मुक्तं करणं, जिज्ञासू जीवांना मार्गदर्शन करणं. जास्तीत जास्त जीव अर्थार्थीच असतात. मला हे पाहिजे, ते पाहिजे. त्यांच्याही इच्छा पूर्ण करण्याची शक्ती ईश्वराचीच आहे. तर असे सगळेही भक्तं जे आहेत त्यांच्या योग्यतेप्रमाणे, अधिकाराप्रमाणे त्याचं कार्य करणं हे सगळं ईश्वराचं सामर्थ्य आहे. पण त्याच्याबद्दल कर्तृत्वाभिमान नाहीये. वस्तुत: ईश्वराच्या शक्तीने कार्य होत असतानासुद्धा अहंकार नसणं ही एक मोठी शक्ती आहे.

ज्ञानेश्वर भिंतीवर बसलेले असताना चांगदेव वाघावर बसून आहे, आपली योगशक्ती दाखवण्याकरता. ह्यांना नुसती इच्छा झाली, आपणही चांगदेवांना सामोरे जाऊ या. ही इच्छा होण्याबरोबर ती दगड मातीची भिंतसुद्धा क्रियाशील झाली. चालू लागली. मग वाघ तर चेतन आहे. चेतनावर ताबा मिळवणं हे काही अशक्य नाही. पण अल्पशक्ती असताना तो अभिमान चांगदेवांना उत्पन्न झाला आणि इथे ज्ञानेश्वरांकडे पूर्ण शक्ती असल्यामुळे अत्यंत अभिमान करण्यासारखी गोष्टं असताना अभिमान नाहीये. आपली शक्ती विसरून जाणं हे फार मोठे सामर्थ्य आहे. केवळ खऱ्या ज्ञानी पुरुषाला किंवा भक्तालाच हे शक्य आहे तशी ईश्वराची स्थिती आहे. तसे ईश्वराचे विश्वाचं पालन करणे म्हणजे प्रत्येकाला कर्माचं फळ देणं. ईश्वराला पाप-पुण्य नसल्यामुळे जन्म येणचं शक्य नाही. पण

भक्ताकरता त्याने जन्म घेतले आहेत.

तिसरी कथा श्रीपादवल्लभांच्या एका व्यापारी भक्ताची आहे. तो कुरवपुरजवळच्या एका गावात व्यापार करीत होता. त्याने एक नवस केला. त्याप्रमाणे व्यापारात त्याला फायदा झाल्यावर तो नवस फेडण्यासाठी तो कुरवपुरला यायला निघाला. काही चोरांना हे समजल्यावर तेही त्याच्याबरोबर यायला निघाले. आम्हीही यात्रेला येतो म्हणाले. वाटेत एका निर्जन अरण्यात त्याला मारलं आणि त्याची संपत्ती घेतली. ईश्वर दिसत नाही, म्हणजे नाहीच, अशी त्याची कल्पना. नास्तिकवाद ! पण हा जो ब्राह्मण आहे हा ईश्वराला मानणारा होता. म्हणून जरी द्रव्य मिळालं तरी आपण कबूल केलेलं आहे. देवाजवळ जाऊन अन्नसंतर्पण करायचं. त्यामुळे त्या द्रव्याबद्दल त्याच्या मनामध्ये मोह निर्माण झाला नाही. हे देवाला द्यायचं. तो आस्तिक होता. त्यामुळे श्रीपादवल्लभ तिथे आले त्यांनी त्या सर्व चोरांना मारलं. एक चोर शरण आला. त्या ब्राह्मणाला जिवंत केलं. त्याने केलेला नवस त्याच जन्मात पूर्ण करून घेतला देवाने. ही ईश्वराची कृपा आहे. त्याला जरी चोरांनी मारलं तरी त्याला जिवंत करून त्याच्याकडून त्याचा अन्नसंतर्पणाचा संकल्प पूर्ण करून घेतला. ईश्वराला सांगून संकल्प केल्याचं हे फळ त्याला मिळालं त्या चोरावर जशी कृपा केली तशी आमच्यावर कृपा करा अशी प्रार्थना पुढल्या श्लोकात केली आहे.

***दिगंबरा गुरू वासुदेवभ दत्तस्त्वं ब्रह्म् ।***
***कामक्रोधग्रासितं मां लभ तथैव झटिति वह ॥***

'दिगंबरा' ही हाक मारली आहे. श्रीपादवल्लभ हेच दिगंबर आहेत. जीवात्मरूपी तेच आहेत, तेच परमेश्वरस्वरूप आहेत आणि दोन्ही मिळुन परब्रम्हरूपी तेच आहेत. 'गुरू वासुदेव दत्तस्त्वं ब्रह्म्'

म्हणताहेत महाराज भक्ती, ईश्वराबद्दल प्रेमही उत्पन्न झालं पाहिजे. ईश्वराच्या शक्तीची अंत:करणामध्ये जर खरी जाणीव झाली तर प्रेम, भक्तीही उत्पन्न होते. जास्तीत जास्त भक्ती घडण्याकरता परमेश्वराच्या स्वरूपाच्या ज्ञानाची आवश्यकता आहे. त्याचं प्रतीक जरी समजून आलं तर ज्ञान नसलं तरी हरकत नाही, पण प्रेम मात्र अत्यंत आवश्यक आहे. त्या प्रेमाने तो (भक्त) हाक मारतो. संबोधन करतो -- दत्तस्त्वं ब्रह्म.

तर गुरू वासुदेव म्हणतात महाराज दत्तात्तेय स्वरूप हे गुरू स्वरूप आहे. सद्‌गुरूंचा हा अवतार आहे. हातात शस्त्रं घेऊन कंसाला, रावणाला मारलं असा अवतार नाही. जर जीवांना मार्गदर्शन करून त्यांचं अज्ञान म्हणा, विकार म्हणा त्यांच्या मनातले दूर करून मनाची शुद्धी जीवांची करायची आणि त्यांचं स्वरूप त्यांना दाखवून द्यायचं. म्हणजे ते मार्गाला लागले. तर हे सद्‌गुरू स्वरूपही दत्तात्रेय आहेत. वासुदेव म्हणजे ईश्वराचं स्वरूपच आहे. वासुदेव शब्दाचा अर्थ किंवा त्याची शक्ती, विष्णु सहस्त्रनामामध्ये भीष्माचार्यांनी सांगितलं --

***द्यौ: सचन्द्रार्कनीत्रा खं दिशो भूर्महोदधि: ।***
***वासुदेवस्य वीर्येण विधृतानि महात्मन: ॥***

ते मोठे भक्तं होते भीष्माचार्य. हे संपूर्ण आकाश मंडल जे आहे चंद्र, अर्क, नक्षत्र हा सर्व जो खगोल आहे हे ''द्यौ'' आहे. ''ख'' म्हणजे संपूर्ण आकाश मंडल, सर्व दिशा, सर्व महोदधि ही ज्याच्या प्रभावाने राहिलेली आहेत, मर्यादित राहिलेली आहेत. आपलं स्थान सोडून पडत नाहीत. सर्व नक्षत्र मंडल वर फिरतंय पण खाली पडत नाही. याला धारण करणारा कोण आहे ? कोणी धरलेलं आहे ? कोणाच्या शक्तीने हे राहिलेले आहेत ? तर ''वासुदेवस्य वीर्येण विधृतानि

महात्मन:'' तो जो भगवान वासुदेव सर्वेश्वर, विश्वरूपी झालेला त्याच्या वीर्यांनी हे सगळं धारण केलेलं आहे. ईश्वराचं अनुमान करणारी श्रुती म्हणून जी आहे त्यात त्यांनी दिलेलं आहे -- इतके वर असलेले सगळे पदार्थ, भूर्लोक जसा आहेत तसे हे निरनिराळे पदार्थ म्हणजे लोकच आहेत. पण सूर्य मंडळ, नक्षत्रे खाली पडत नाहीत यावरून त्यांना धारण करणारी कोणीतरी शक्ती असली पाहिजे ही कल्पना अनुमानाने येऊ शकते.

तर हे ज्यांनी ओळखलेलं आहे म्हणून वासुदेव म्हणजे ईश्वरस्वरुप, त्याचप्रमाणे गुरुस्वरुप अशा प्रकारचे दत्तात्रेय आहेत. ईश्वर आणि गुरू हे एकच झालेले आहेत दत्तस्वरूपाच्या ठिकाणी. तर ही भावना साधकाची असावी असं त्यांचं म्हणणं आहे. सद्गुरू आणि परमेश्वर एकच आहेत. ईश्वरापेक्षा गुरू श्रेष्ठ आहे. म्हणजे गुरूनिष्ठा उत्पन्न होण्याकरता ती वर्णनं आहेत, नाही असे नाही. परंतु एकच आहेत ते. सद्गुरू शक्ती मनातले अज्ञान किंवा विचार दूर करणारी आहे. ईश्वरशक्ती ही दुर्जनांना शासन करणं, मारणं, सगळ्यांचं संरक्षण करणं, ही कार्य ईश्वरशक्ती म्हणून चालू आहेत. म्हणून दोन्हीही शक्ती वस्तुत: एक आहेत ही भावना ठेवून, ''गुरू वासुदेव दत्त:'' गुरू आणि ईश्वरस्वरूप असे दत्तात्रेय साक्षात् परब्रह्म आहे.

आणखी त्यांची प्रार्थना आहे -- कामक्रोध ग्रसित ---- संबोधन करून, हाक मारून मागितलं काय तर काम-क्रोध ग्रसित मी आहे. चोरांनी ग्रसित म्हणजे धरलेल्या/मारलेल्या ब्राह्मणाला तुम्ही जीवंत केलत, त्याच्याकडून तुम्ही नवस फेडून घेतलात, तसं मलासुद्धा कामक्रोधरूपी चोरांनी मला धरलेलं आहे आणि ते मला मारणार आहेत. भागवतामध्ये पाचव्या स्कंधात जडभरत नावाच्या

ज्ञानी महात्म्याची कथा शुकाचार्यांची सांगितली आहे. त्या जडभरताने संसार हे अरण्य आहे असे रूपक केलं आहे. कारण अरण्याच्या मार्गाने संसारातले सगळे जीव निघालेले आहेत. तिथं सुख नाहीये. सहा चोर या जीवाला मारतात आणि त्याचं पुण्यं वगैरे सर्वस्व घेऊन जातात. ते चोर म्हणजे काम, क्रोध, मद, मत्सर इत्यादी तर या चोरांनी मला आता मारायचं ठरविलेलं आहे. तेव्हा लवकर आपण या आणि मला आपल्याकडे घेऊन चला. दिगंबरा - ----- दिगंबरा या सगळ्याही संबोधनामध्ये ही हांक मारलेली आहे.

मनाने हांक मारायची म्हणजे दुसरीकडे कुठेही मन जाऊन उपयोगी नाही. आपलं संरक्षण करणारी ईश्वरशक्ती आहे त्या ईश्वराला हाक मारताना मनाची अत्यंत आवश्यकता आहे. त्या वाणीचं कार्य नुसतं चालू असतं. तास, दोन तास, चार तास कोणीही बसू शकतं. वाणीनं ज्याला बोलवायचं तिकडे मन जाण्यासाठी दिगंबरा शब्दाचे अर्थ महाराजांनी सांगितले आहेत. तोच जीवात्मा म्हणजे अंतरात्मा शुद्ध आहे. विश्वरुपी झालेला तोच ईश्वर आहे. तोच पुन्हा एकरूप होऊन परब्रह्मरुपीही तोच आहे. आणि त्यानेच श्रीपादवल्लभ असे अवतार धारण करून भक्तांचं संरक्षण केलेलं आहे. अशी कार्य करणार जो आहे दिगंबररुपी परमात्मा त्याला ही हाक मारलेली आहे. आर्त होऊन काम क्रोधादि शत्रुंनी मला ग्रासलेलं आहे, ते मारताहेत, या बुद्धीनं हांक मारलेली आहे. आणि त्यावेळेला त्यांची शक्ती जर मनामध्ये आली तर जास्ती प्रेम निर्माण होतं. आणि त्या प्रेमाने हाक मारल्यावर ईश्वराची कृपा होते, कार्य होतं. तेवढ्यासाठी द्रौपदी, अंबरीष राजा इ. ची सगळी उदाहरणे महाराजांनी दिलीत.

तर भक्तीमार्ग आणखी ज्ञानमार्ग. ज्ञान आणि भक्ती, दोन्हीही

या संत महात्म्यांच्या ठिकाणी आहे. ईश्वरभक्तं जे मोठे महात्मे झालेले आहेत त्यांना ज्ञान नाही असं म्हणता येत नाही. त्यांनी सगुणाचं वर्णन केलेलं आहे -- तुज सगुण म्हणु कि निर्गुण रे। सगुण निर्गुण एकू गोविंदु रे ॥ ज्ञानेश्वर महाराजांचा अभंग आहे. तेंव्हा सगुण निर्गुण दोन्ही एक आहेत. ही दृष्टी या आरतीमध्ये ''दिगंबरा'' शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना महाराजांनी दिलेली आहे. स्वत: त्यांना तशी दृष्टी होती. म्हणून त्याचप्रमाणे अवतार धारण करून साकार झालेलाही तोच आहे. मूळ स्वरूप अद्वितीय आहे. संसार नाही, जग नाही, काही नाही. इथ पर्यंत दृष्टी गेली म्हणजे जगालाही तो जीव विसरून गेला. आमच्या बुद्धीमध्ये संसार आहे. तो संसार बुद्धीतला गेला. नियामक ईश्वर आहे, आम्ही नियम्य आहोत हीसुद्धा भावना गेली पाहिजे. प्रेमामुळे त्या स्वरूपाची चरित्रं जाणून घेऊन भक्ती वाढते. द्रौपदीला त्यांनी अगदी सुरक्षित ठेवलं. भर सभेमध्ये तिचे पांचही पती दास बनून खाली मान घालून बसले असताना तिचं कोण संरक्षण करणार होतं ? त्यावेळेला त्याना बोलण्याची शक्तीच नव्हती. काय बोलणार दुर्योधनापुढे ? भीष्म, द्रोण तर अगदी कानावर हात ठेवून मोकळे झाले. दुर्योधनाचे आम्ही अन्न खातो, तेंव्हा त्याच्या विरुद्ध आम्ही काय बोलणार ?, म्हणाले. अशा स्थितीमध्ये ज्या ईश्वरशक्तीवर विश्वास ठेवून द्रौपदीने सगळा भार टाकला -- ''तुझ्या शिवाय माझा कोणीही त्राता नाही'' आणि त्या परमात्म्याने त्यावेळी वस्त्ररूप धारण केलं. अनेक वस्त्रं दु:शासन फेडतोय पण नाही, द्रौपदी वस्त्ररहित होऊ शकत नाहीये. प्रयत्नवाद ! जीवाने केला प्रयत्न त्या ईश्वरशक्तीपुढे काहीही चालू शकत नाहीये. तर अशा रीतीने अवतार धारण केलेल्या साकार ईश्वराची जरी भक्ती केली तरी आपलं कार्य होतं आहे. सगुण आहे की निर्गुण आहे ?

सगुण श्रेष्ठं कि निर्गुण श्रेष्ठं ह्या वादात पडायचं कारण नाही. एक तर ज्ञान दृष्टी किंवा पूर्ण भक्ती दृष्टी मिळवावी. आणि ह्या दोन्हीही भूमिका/दृष्टी मिळाल्या तर भेद रहातंच नाही. एकच परमात्मा आहे -- तोच सगुण आहे तोच निर्गुण आहे. अशी ज्ञानेश्वर महाराजांसारखी प्रेमदृष्टीही आहे. ज्ञान दृष्टीही आहे, ऐक्य दृष्टीही आहे. तो एकच परमात्मा अनेक रूपधारी झालेला आहे. तोच सर्व कार्य चालवतो आहे. महात्म्यांनी हे पूर्ण ज्ञान मिळवलं आहे आणि पूर्ण भक्तीमार्गही त्यांच्याजवळ आहे. मग कोणाचाही बुद्धिभेद होणार नाही अशा रीतीने ते उपदेश करत असतात. ईश्वराची जी सगुण साकार रूपे आहेत त्याचीच त्यांनी भक्ती करायला सांगितली आहे. कारण सर्व सामान्य जनांना जीवात्मा कसा आहे, निर्विकार आहे, त्याचे मूळ स्वरूप काय आहे याची कल्पना नाहीये. मला जर सर्व सुखदु:खांची प्रत्यक्ष जाणीव आहे, तर मीच कर्ता आहे मग मी निर्विकार कसा असेन ? अशा तऱ्हेचे अज्ञान त्यांच्या मनात आहे. अशा भूमिकेवर असलेल्यांचा बुद्धी भेद होऊ नये म्हणून संतांनी तो परमेश्वर अवतार धारण करतो, साकार आहे असे प्रतिपादन केले. आमच्यासारखे शरीर धारण करून सगळी कार्ये करायची त्याची शक्ती आहे, एवढा तरी विश्वास ठेवावा जीवांनी. अज्ञानी सर्वसामान्य जीवांना तुम्हीही निर्गुण निराकार आहात, ईश्वरही निर्गुण निराकार आहे हा उपदेश एकदम कसा पटणार ? त्यांना तर काही अनुभव नाही. मूर्त पदार्थ आम्ही डोळ्यांनी पहातो, त्याच्याबद्दल विचार करायची बुद्धीला सवय झालेली आहे. ती सवय, बुद्धीवर झालेले ते संस्कार कायम ठेवून साकार केलेला आहे. भक्तीमार्गामध्ये आकाराबद्दल काही आग्रह नाहीये. अमूक एक स्वरूपाची उपासना करा असा आग्रह नाहीये. ज्या स्वरुपाच्या ठिकाणी तुम्हाला प्रेम वाटेल त्याची उपासना करा.

अनेक जन्म गेले अभ्यास करतात करता. मन हे स्थिर झालेलं आहे. देवाला हाक मारताहेत. एकवीस तास आपल्याला किती तरी वाटतात. एका मनुष्याला एकवीस तास सतत देवाला ''दिगंबरा .....'' म्हणून हाक मारणं शक्यच नाहीये. परंतु ते जरी आमच्या हातून घडलं असं समाधान म्हणा किंवा अहंकार म्हणा -- सात्विक अहंकार असेल तो, काही तरी म्हणा ते होतं. परंतु आपल्या हातून घडलेले सगळं पुण्यकर्म विसरून जाणं ही भक्तीची परिसीमा आहे.

एक शंकराचा भक्त गंगातीरावर कौपीन धारण करून हात जोडून शंकरांना हाक मारतो -- हे गौरीनाथ शंभो माझ्यावर प्रसन्न व्हा. अशी हाक मारता मारता अनेक वर्षे जरी गेली तरी एखादे निमिषंच गेलंय असं वाटलं पाहिजे. अन्न नाही, पाणी नाही, वस्त्रं नाही, भूक नाही, तहान नाही, पूर्ण वैराग्य आहे, प्रेम आहे. शरीराकडे लक्षही नाही. अशा अवस्थेत ईश्वराची भक्ती करण्यामध्ये कित्येक वर्षे गेली तरी ती एखाद्या मिनिटाप्रमाणे भासली पाहिजेत. अजून आणखी नामस्मरण व्हावं, देवाला हाक मारावी असं वाटलं पाहिजे इतकी ज्याची बुद्धी विशाल झाली आहे, असा महात्मा दुर्लभ आहे, असं भगवान् म्हणतात.

तर किती सेवा झाली पण ती कमीच झाली आहे. काळ कमी आहे असं वाटलं पाहिजे. आपल्या हातून थोडसं काही सत्कर्म घडलं तर आपल्याला त्याचा केवढा अभिमान, अहंकार वाटतो. असंच उत्तरोत्तर व्हावं असं वाटतं. पण खऱ्या भक्तीच्या भूमिकेत कालाचाही विसर पडला पाहिजे. कुठं काय झालं? थोडंस काहीतरी एकवीस तास काय, सात दिवस, पंधरा दिवस एवढंसच काहीतरी झालं अशी बुद्धी पाहिजे. ही बुद्धी अनेक जन्मांच्या अभ्यासाने मिळते.

परंतु याच जन्मात त्या भूमिकेपर्यंत जाण्याकरता आरंभापासून

सगुण भक्ती अत्यंत उत्कटतेने व्हायला पाहिजे. सगुण साकार जे भगवंताचे जे स्वरूप आहे त्याची उपासना करा. त्याची एखादी मूर्ती बनवून त्याची उपासना करा. त्यांनी अशी सगळी मोकळीक दिलेली आहे. मनाला कुठं तरी स्थिर करण्याचा प्रयत्न करा. म्हणून मूर्ती पूजा आहे. कितीही सेवा झाली, भक्ती घडली तरी कमीच आहे, इतकी ज्याची बुद्धी झालेली आहे, इतका जो ईश्वराच्या सेवेत रंगून गेलेला आहे त्याला काही करायची गरजच नाही. तो मुक्तच झालेला आहे. तशी आपली मनाची स्थिरता व्हावी. बऱ्या वाईट संस्कारांमुळे जरी मी एवढं केलं तेवढं केलं असं वाटलं, मी एवढा जप यज्ञ केला असं वाटलं, वाटूं दे. निदान त्यातूनच पुढे आपण आणखी देवाची भक्ती, उपासना करावी असं तर त्याला वाटेल. त्या करता अवतार घेतला, भक्तांचे रक्षण केले, कल्याण केले हे जे भगवंताचे चरित्रं आहे ते सर्व खोटं कसं मानायचं? म्हणून अनेक रूपं धारण करून तो परमात्मा येतो, भक्तांची कार्य करतो. त्याचे गुण ऐकून, चरित्र ऐकून त्याच्या साकार रूपाच्या ठिकाणी आपलं मन स्थिर करणं, त्याची भक्ती करणं आणि ते होण्याकरता त्याचीच प्रार्थना करीत रहाणं अशी भूमिका संतांनी मुद्दाम घेतलेली आहे.

पंढरीला जाण्याचा उपदेश त्यांनीच केला. आषाढी आहे, कार्तिकी एकादशी आहे. कोणच्या तरी निमित्ताने तुम्ही जा असं. जे ज्ञानेश्वर महाराजांनी सातशे वर्षांपूर्वी सांगून ठेवलंय ते अजूनही चालू आहे. विटेवर उभा असलेला पांडुरंग तोच परमेश्वर आहे. ही भावना जर अंत:करणामध्ये उत्पन्न झाली तर ज्ञान भूमिका न मिळूनसुद्धा तो जीव मोठा अधिकारी ठरतो.

''दिगंबरा दिगंबरा ...'' या महामंत्रामध्ये किती तरी मोठी भूमिका महाराजांनी आणली आहे. सगळे देव बाजूला करून एक

चैतन्यघन जे परम तत्वं आहे ते घेतलं आहे. वाणीने, शब्दाने जरी आपल्याकडून ''दिगंबरा दिगंबरा...'' निघालं आणि त्याबद्दल भक्ती, प्रेम निर्माण झालं तर त्याचाही अधिकार मोठा आहे.

गीता सांगायला एक पुराणिकबुवा व्यासपीठावर बसले होते. इतरांबरोबर एक साधा शेतकरी ऐकायला येऊन बसला. गीता सांगणार आहेत पुराणिकबुवा हे त्याला समजल्यावर त्याच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. पुराणिकबुवांनी त्याला विचारले ''शेतकरीदादा, तुमच्या डोळ्यात अश्रु कां आले?'' शेतकरीदादांनी उत्तर दिले, ''भगवान् आणि अर्जुन रथामध्ये बसलेले आहेत. अर्जुनाने धनुष्यबाण टाकून दिलेले आहेत. आणि भगवान् गोपालकृष्ण त्याला उपदेश करताहेत असं मला दृष्यं दिसायला लागलं म्हणून डोळ्यातून अश्रू आले.'' पुराणिकबुवांनी व्यासपीठावरून खाली उतरून त्याला नमस्कार केला. ते म्हणाले, ''तुम्हाला गीता समजली. आम्हाला फक्त शब्दांचा अर्थ समजला.'' शब्दांचे अर्थज्ञान होणं हे वाईट नाहीये. परंतु अर्थज्ञानाचं कार्य म्हणजे त्याप्रमाणे प्रेम निर्माण झालं पाहिजे.

ज्ञान भूमिका ही कांही वाईट नाहीये. पण केवळ शब्द ज्ञानाने प्रेम निर्माण होईल किंवा न होईल हे त्या जीवाच्या पूर्व कर्मावर अवलंबून आहे. ईश्वराची कृपा पाहिजे त्यासाठी. त्या ज्ञानातून ईश्वराबद्दल प्रेम उत्पन्न झालं तर ते प्रेम फार मोठं आहे ना ! ईश्वरस्वरूपाचं ज्ञान म्हणजे त्याची शक्ती केवढी आहे, अनादि, अनंत तो आहे. हे ज्ञान झाल्यानंतर जास्ती प्रेम उत्पन्न व्हावं लागतं ते आपल्याला कधी होतंच नाही. म्हणून शाब्दिक ज्ञानापेक्षा खरं ज्ञान जर झालं तर तेही निश्चितच ज्ञान आहे. खरा ज्ञानी हा भक्त असतोच. त्याला काही भक्ती करायला सांगायची जरूरी नाही. तो

भक्तच आहे. विभक्त नाही. पण हे सर्व आपण बाजूला ठेवू. जर एखाद्या जीवाच्या अंत:करणात श्रद्धा असेल, भक्ती असेल तर तो मोठा अधिकारी आहे. त्या भक्तीला दृढ करण्याचा प्रयत्न त्याने करायचा आहे. त्या करता अशा प्रकारची ही स्थाने ईश्वरी इच्छेने निर्माण झालेली आहेत. तिथे असे कार्यक्रम वारंवार होताहेत.

त्या भजनाच्या वेळी आपल्याला आनंद होतोय. काही संस्कार ईश्वराच्या कृपेने होताहेत. तेच संस्कार कसे वाढीला लागतील, त्याचं फळ केव्हा मिळेल, ते द्यायला ईश्वर समर्थ आहे या भावनेने आपला बुद्धी विकास व्हावा म्हणून देवाजवळ प्रार्थना करायची आहे.

***दुरितांचे तिमिर जावो***
***विश्वस्वधर्मे सूर्ये पाहो ।***
***जो जे वांछिल तो ते लाहो***
***प्राणिजात ॥***

अशी प्रार्थना ज्ञानेश्वर महाराजांनी देवाजवळ केली आहे. सगळी दुरितं संपू देत म्हणाले. म्हणजे तुमचं स्वरूप जीवाला समजेल. त्या जीवावर तुम्ही केवढे उपकार केले आहेत. शरीर दिलं आहे. वाणी दिली आहे. अंत:करण, बुद्धी, विचार करण्याची शक्ती दिली आहे. बाकीच्या पशु, पक्षी इ. प्राण्यांना ही देणगी नाहीये. खाणं, पिणं आणि रहाणं या शिवाय त्यांना काहीही माहित नाही. दुसरीकडे प्रवृत्तीच नाही त्यांची. त्यांच्या मनावर परीणाम होणं शक्य नाहीये. जर पूर्व जन्मात काही चांगले संस्कार झाले असतील, सुकृत घडलं असेल आणि या जन्मात पशु-पक्षांच्या योनीत गेला तरी संतांच्या कृपेने त्यांनाही ज्ञान होतं. एखादा अपवाद आहे.

तरी मानवाला अशी सर्व सोय देवाने करून दिलेली आहे. संत महात्म्यांची भेट होते आहे. त्या भेटीमुळे आपल्या मनामध्ये

असणारे सर्व विकार दूर व्हावेत, ती तळमळ मनामध्ये उत्पन्न झाली पाहिजे. ईश्वराला तळमळीने हाक मारताना हे मनातले विकार दूर झाले पाहिजेत. तेवढ्यासाठी असा जपयज्ञ आहे. ''दिगंबरा दिगंबरा.....'' म्हणता म्हणता ईश्वरस्वरूपाचं अधिकाधिक ज्ञान होण्याकरता आपल्या बुद्धीची सगळी दुरितं जाऊ शकतात. वैयक्तिक, सामुदायिक सगळ्या दुरितांचा क्षय होऊ शकतो. म्हणून संतांची सर्वत्र नामसंकीर्तनाचा प्रसार जास्तीत जास्त केलेला आहे. त्यांचं तेच कार्य आहे. एक तर ते सुलभ आहे आणि श्रद्धने भक्तीने नामसंकीर्तन केल्यानंतर त्याचे जे फळ आहे -- दुरितक्षय, तेही ईश्वरकृपेने मिळू शकतं. स्वधर्माचरणाबद्दल प्रेम निर्माण होतं आणि स्वधर्माचरण घडल्यानंतर त्याचं फळ -- जो जे वांछिल तो ते लाभो -- मिळतं. भक्तीधर्माचा जर तो अधिकारी असेल तर शुद्धं कर्माचरण करू शकेल. ज्ञानयोगाचा तो अधिकारी असेल तर तेही स्वधर्माचरण त्याच्या हातून घडू शकेल.

संन्यासी असतात काही. सर्वसंग परित्याग करून आत्मस्वरूपाचे चिंतन करीत बसलेले असतात. मिळेल तेवढी भिक्षा ग्रहण करायची आणि सगुण, निर्गुण परमेश्वराचे होईल तेवढे चिंतन करायचे. तर स्वधर्माचरणाचे फल प्राप्त होण्याकरता दुरितक्षय होण्याची प्रार्थना ज्ञानेश्वर महाराजांनी केली आहे. आणि तो दुरितक्षय भगवंताच्या नामसंकीर्तनाने होतो आहे. ''जळतील पापे जन्मांतरीची '' म्हणतात. अनेक जन्मांची पापे नामसंकीर्तनाने नष्ट होतात म्हणतात.

म्हणून अशा जपयज्ञाचा पुरस्कार सर्व संत महात्म्यांनी केला आहे. जिथे जिथे असे जपयज्ञ होतील त्यात भाग घेऊन नामसंकीर्तन करण्याची तळमळ निर्माण झाली तर त्या तळमळीतून पुढे परमेश्वराला हाक मारण्याची बुद्धी होईल. ईश्वरस्वरूपाचे अनुसंधान म्हणजे तो

जप आहे. ''लवकर माझे दुरितक्षय करा, माझ्यावर प्रसन्न व्हा'' अशी तळमळीने ईश्वराला हाक मारणारा हा जप अखंड घडतो आहे. त्यामुळे जीवाची सर्वही कार्य सिद्धी होते आहे. जीवभावही नाहीसा होतोय. जन्ममरणाच्या फेऱ्यातून जीव मुक्तं होऊन परमेश्वरस्वरूप होऊन जातो. आपल्या वैदिक संस्कृतीची ही ज्ञानदृष्टी आहे. त्यात आकारालाही महत्वं आहे, मूर्तीलाही महत्वं आहे. सर्वव्यापी ईश्वर आहे, तो निराकार आहे, त्याची मूर्ती कुठली असणार असले उगीच वादविवाद घालण्यात काय अर्थ आहे? निराकार आहे आम्ही समजू शकतो. निराकारचे चिंतन करायची आमच्या मनाला सवय तरी आहे का? आकाराकडेच मन जातं आमचं. निराकार आहे म्हणायचं आणि आकाराकडे मन जास्तं आमचं, म्हणजे हेही गेलं आणि तेही गेलं. ज्ञानही गेलं आणि भक्तीही गेली. त्यापेक्षा संतांच्या उपदेशाप्रमाणे सगुण भूमिकेवर राहून जमेल तेवढी त्या ईश्वराची सेवा उपदेशाप्रमाणे सगुण भूमिकेवर राहून जमेल तेवढी त्या ईश्वराची तशी प्रार्थना करणं, त्याची कृपा संपादन करणं, हेच आपलं मुख्य कर्तव्य आहे. हेच महाराजांनी ''दिगंबरा'' या शब्दाचा अर्थ स्पष्टं करताना दाखविलेलं आहे. तेव्हा अशा या जपयज्ञात भाग घेऊन आपल्या बुद्धीची निर्दोषता वाढत जाईल हीच ईश्वरस्वरूप श्री महाराजांच्या चरणी प्रार्थना.

**॥ अवधुत चिंतन श्री गुरूदेव दत्त ॥**

## प.पू. दत्तमहाराज यांचे 'अनुग्रह' या विषयावरील प्रवचन
## दिनांक : २.११.१९९३

अहं सर्वस्य प्रभव: मत्त सर्वं प्रवर्तते ।

भगवद्गीतमध्ये भगवान ईश्वरभाव रूपाने गीतेचा उपदेश अर्जुनाला करतायत. त्या वेळेला आपण कोण आहोत हे त्यांनी सांगितलेले आहे. सर्व विश्वाला उत्पन्न करणारा मी आहे आणि सर्व ही कार्य माझ्यापासून प्रवृत्त होतात. सर्वांचा प्रवर्तक मी आहे हे स्वत: भगवान सांगतायत. जीवाच्या करता सांगतायत. **जीवाची बुद्धी अशी असली पाहिजे की कोणी तरी एक कर्ता, पूर्णशक्ती संपन्न असा आहे. ही भावना जीवाच्या अंत:करणामध्ये उत्पन्न व्हावी म्हणून हे सांगितलं.** त्यात काही स्वत:च्या शक्तीचा अभिमान नाही. वस्तुस्थिती आहे.

तर ही ईश्वरशक्ती ईश्वरानेच प्रगट केलेली आहे. अधिकारी व्यक्तीला उपदेश करती असताना त्या शक्तीचं स्वरूप काय आहे, ईश्वरशक्ती सर्व प्रवर्तक आहे असं ईश्वरानेच सांगितलेलं आहे. ईश्वरस्वरूप होणारे महात्मे हे अर्थात ईश्वररूप असल्याने त्यांची शक्ती म्हणजे ईश्वर शक्तीच आहे.

*ज्ञानीत्मात्मेव मेमतं ।*

म्हणून महाराज सांगतायत. ज्ञानी आणि माझ्यामध्ये काही फरक रहात नाही. भेदबुद्धी ही देहदृष्टी आहे. हा निराळा, तो निराळा, उपाधिक भेद आहे. वस्तुत: भेद नाही आहे. निरूपाधिक स्वरूपामध्ये 'साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले। अवघे मिळूनि एकचि जाहले। देहातीत वस्तू।'

**समर्थांचा सिद्धांत आहे. सर्वही ब्रह्मज्ञानी महात्मे एकरूप आहेत. देहातीत वस्तुरूप झालेले आहेत. अर्थात त्यांचाही संकल्प म्हणजे**

**ईश्वरसंकल्पच आहे**. संकल्पशक्ती ही व्यवहारातही आपण मानतो. अनेक प्रकारच्या शक्ती आहेत.

*सस्यानुभवे पर्यता: तत्वे बुद्धी प्रवर्तते ।*
*तस्य दृष्टीगता सर्वेमुच्यन्ते सर्व पातकै: ।*

हेही शास्त्रकार सांगतात. अनुभवापर्यंत तत्वज्ञान झालं पाहिजे. **शब्दानं तत्वज्ञान होतं. नाही असं नाही. शब्दप्रमाण त्या करताच आहे. तत्त्व, अतत्त्व विचार करण्याकरता शब्दप्रमाण आहे. बुद्धीही त्याला अनुरूप असावी एवढच शास्त्रज्ञांचं सांगणं आहे.** आचार्य महाराज सांगतायत. बुद्धी प्रमाण आहे. सर्व शास्त्रज्ञांनी सर्व महर्षींनी बुद्धी प्रमाण मानलेली आहे. परंतु ती शास्त्रप्रमाणानुसारी असावी. शास्त्र प्रमाण म्हणजे संस्कृत असावी असं त्यांचं म्हणणं आहे. केवळ बुद्धीनं पूर्ण निर्णय करता येत नाही. पूर्ण बुद्धीचे महात्मे म्हणजे साक्षात् ईश्वररूपच झालेले असतात. तेव्हां **अभ्यास करता करता ज्याची बुद्धी अत्यंत स्थिर झाली, आत्मस्वरूपाकार झाली, आत्मभाव ज्या बुद्धीमध्ये आणखी बाणलेला आहे अशा महात्म्यांचा जो संकल्प आहे किंवा ज्याची दृष्टीसुद्धा इतकी शक्तीसंपन्न असते त्यांची दृष्टी ज्याच्यावर पडेल त्याचा सर्वही पापक्षय होत आहे.**

**सत्पुरुष किंवा ज्ञानी महात्मा याला मोक्ष कसा मिळतो** हा एक विचार उपनिषदामध्ये आलेला आहे. ज्ञानी महात्मा जरी झाला तरी या जन्मामध्ये ज्ञान झालं असेल त्याला. मागच्या अनेक जन्मामध्ये पुष्कळ कर्म त्यांनी केलेली आहेत. **मुक्त होणं याचा अर्थ कर्म संपणं.** म्हणजे मुक्त होणं. तर ती सगळी कर्म संपल्यानंतर देहसंबंध संपला. जन्म मृत्यु हे बंद झाले. नवीन देहाचा संबंध म्हणजे जन्म. या देहाचा संबंध सुटणं म्हणजे मृत्यु. अशी जन्ममृत्युची व्याख्या शास्त्रकार करतात. जन्ममृत्युचं म्हणजे नवीन देहाच्या

संबंधाचं कारण काय? तर त्याने केलेली जी कर्म आहेत त्या कर्मामुळे देहसंबंध येतो. अनेक देह आहेत त्या त्या देहाचा संबंध त्याच्या कर्माप्रमाणे येतो. हा एक सिद्धांत त्यांनी मांडला. ती कर्मच संपली म्हणजे कारणच नाहीसे झाल्यानंतर देहरूपी कार्य होणारच नाही. अर्थात देहसंबंध संपला. देहसंबंध असेपर्यंत सुखदु:ख द्वंद्वाची आणखी जाणीव राहणार ती ही संपली. देहाचा संबंध संपल्यामुळे हेही मुक्त पुरुषाचं स्वरुप आहे. देहसंबंध संपणं म्हणजे देहाला कारण असलेली सर्व कर्म संपून जाणं. **ही सर्व कर्म कशी संपणार हा एक मोठा प्रश्न आहे. तर त्याचं मुख्य साधन म्हणजे आत्मज्ञान जे आहे परमात्म स्वरूपाचं प्रत्यक्ष ज्ञान, नुसतं शब्दज्ञान नाही. प्रत्यक्ष ज्ञान हे सर्व कर्मक्षयाला कारण आहे.**

**सर्व कर्माचा दाह ज्ञानाग्नीने होतो असं सांगतात भगवान. तर ती सर्वही कर्म संपायची. आत्मज्ञानही त्याला त्या करता प्राप्त करून घ्यावं लागतं. ते आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याकरता साधन म्हणजे बुद्धीची स्थिरता पाहिजे. बुद्धीची जरुरी ही व्यवहाराकरता जशी सांगितली जाते त्याचप्रमाणे मोक्षाकरता सुद्धा बुद्धीची जरुरी आहे. परमार्थामध्ये बुद्धी पाहिजे आणि व्यवहारामध्येही बुद्धी पाहिजे.** म्हणून बुद्धीला जास्ती श्रेष्ठत्व सर्वांच्या मताने आहे. बुद्धीवाद, बुद्धीवाद म्हणजे बुद्धीप्रधान वाद ज्याला आपण म्हणतो बुद्धीप्रधान वाद सर्व शास्त्रकारांना मान्य आहे.

धीमान् जो आहे खरा त्याला कोणताही जगामध्ये अविषय नाही. सगळ्या विषयांचं ज्ञान तो संपादन करू शकतो. ते बुद्धीचं महत्व कालीदासांनीही सांगितलं आहे. तर त्या बुद्धीमध्ये चांचल्य म्हणून जो दोष आहे त्याच्यापुढे अर्जुनासारख्याला पण हात टेकावे लागते. त्याने कबूल केलं की माझं मन मी आवरू शकत नाही. केवढी

सर्व देवांची कृपा झाली. सर्व देवतांपासून शंकरांच्यापासून उत्तम विद्या त्याला मिळाल्या होत्या. संगीत विद्या सुद्धा अर्जुन शिकला. त्याला इंद्राने मुद्दाम सांगितलं तू शिकून घे.

समर्थांनी जे श्रवण भक्तीचं निरुपण करताना सांगितलेलं आहे. ऐकत जावे। किती वर्णन केलेले आहे समर्थांनी. म्हणजे वैराग्य पाहिजे, त्याग केला पाहिजे, पण ज्या काही आवश्यक गोष्टी आहेत पूर्व भूमिकेमध्ये, ज्ञानाच्या पूर्वी त्याच्या संबंधी वैराग्य उपयोगी नाही. हे समर्थांचे फार महत्वाचं सांगणं आहे. किती शास्त्र आहेत. किती विषय आहेत.

त्याप्रमाणे अर्जुनाला सगळ्या विद्या मिळाल्या आहेत. संगीत विद्या आहे. अस्त्र विद्या आहे. तर ईश्वराबद्दल अत्यंत श्रद्धा आहे. भक्ती आहे. गुरूभक्ती आहे. गुरूकृपा आहे. सगळं आहे. अशा अवस्थेमध्ये असणारा अर्जुन म्हणतो मनाचा निग्रह फार कठीण आहे. हे अर्जुनाचे उद्गार आहेत. हे मान्य आहे.

**भगवान म्हणाले हे खरं आहे. मन हे निग्रह करण्याला फार कठीण आहे म्हणाले. पण निग्रह करता येणार नाही असं नाही. भारतीय संस्कृतीमध्ये आशावाद फार आहे. अनेक प्रकारची साधनं सांगितलेली आहेत. त्या निरनिराळ्या साधनांचा अभ्यास करून आणखी आपल्या मनाची, बुद्धीची स्थिरता ही संपादन करणं हे मुख्य सांगितलेलं आहे. बुद्धी स्थैर्य हे आत्मज्ञानाला अत्यंत उपयोगी आहे. मनाला स्थिर करण्याचे दोन उपाय भगवंतांनी सांगितले. अभ्यास करणं, मन स्थिर करण्याचा प्रयत्न करणे. स्वरूपानुसंधान व्हायला पाहिजे. आत्मस्वरूप खरं काय आहे ते शास्त्रांनी, आचार्यांनी जसं सांगितल असेल ते मनामध्ये आणून त्याचं अनुसंधान त्या बुद्धीनं, मनाने जर झालं तर पुढं**

**साक्षात्कार होतो. समाधी आहे. आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर सर्व संपलं. सर्व कर्मक्षय होतो. सर्व कर्मक्षय झाल्यानंतर देह संबंध संपतो. देहसंबंध संपल्यानंतर सुखदु:खादिक संवेदना बंद होतात. ही स्थितप्रज्ञाची लक्षणं त्याकरताच सांगितलेली आहेत.**

आचार्यांनी स्थितप्रज्ञाची लक्षणं विवरण करत असताना सांगितले आहे की ज्ञानाभ्यास करून त्या भूमिकेवर गेलेल्या ज्ञान मनुष्याला ही लक्षणं नैसर्गिक असतात. त्याला प्रयत्न काही करावे लागत नाहीत.

दु:खेषु अनुद्विग्नमन: सुखेषु विगतस्पृहा: । हे मात्र आमच्यासारख्या संसारी अज्ञानी मनुष्याला फार अशक्य वाटतं. त्याकरता फार प्रयत्न करावा लागतो. पण ज्ञानी महात्म्यांना काही नाही. त्यांची ही नैसर्गिक लक्षणं आहेत. **साधकांची सगळी ही साधनं आहेत म्हणून सांगतात भगवान भगवद् गीतेमध्ये. त्याचप्रमाणे भगवद्भक्तांची लक्षणं 'अद्वेष्टा सर्व भूतानां । ही भगवद् भक्तांची लक्षणं आहेत. सगळी साधकांची साधनं आहेत. बुद्धी स्थिर व्हावी. आत्मस्वरूपाचं अनुसंधान करता यावं. त्या बुद्धीला स्थिर झाल्याशिवाय आणि आत्मस्वरूपानुसंधान होणार नाही तर त्या मनाची बुद्धीची स्थिरता हे प्रमुख साधन मानलेलं आहे. तर स्वरूपानुसंधान, ज्ञान, मोक्ष याचं साधन मानलेलं आहे.**

तर बुद्धीचं मनाचं स्थिरत्व करण्याचे अनेक उपाय शास्त्रकारांनीही पुष्कळ सांगितलेले आहेत. योगाभ्यास त्या करता आहे. प्राणायामादिक अभ्यास पण फार कठीण आहे. साधनं सांगता सांगता एक साधन त्यांनी असं सांगितलेले आहे. 'वीतराग विषयं वा चित्तम् ।' हे एक योगसूत्र आहे. वीतराग जो ज्ञानी महात्मा, त्याच्या चित्तामध्ये आणखी जे चित्त विषय होई **म्हणजे एखाद्या जीवावर**

**कृपा करावी, त्याचं कल्याण व्हावं असं त्या ज्ञानी महात्म्याला वाटेल त्याचं चित्त स्थिर होईल. हे एक संकल्प शक्तीचं उदाहरण आहे.** योगशास्त्रकार संकल्प मान्य करणारे आहेत. आणि अशा योगी पुरुषाची संकल्पशक्ती फार मोठी असते. सर्व सिद्धी ज्या वर्णन केलेल्या आहेत त्या संकल्पशक्तीरूपच आहेत. मानसिक शक्तीचा विकास म्हणजेच सिद्धी आहेत सगळ्या . तर त्या संकल्प शक्तीचा प्रभाव हा त्यांना मान्य आहे. प्रयत्नांनी आणि तशी संकल्पशक्ती करून घेता येते. ती संकल्पशक्ती व्यवहारामध्ये ही आपल्याला मान्य आहे. राष्ट्रपती वटहुकूम काढल्यानंतर फाशीची शिक्षा झालेल्यालासुद्धा दया होऊ शकते. सोडून देतात. सर्वोच्च न्यायालयाने जरी निर्णय दिला असला तरी त्या राष्ट्रपती वटहुकूमाने म्हणा, त्याच्या दयेने त्यांच्या संकल्पाने तो त्या दोषातून मुक्त झाला. अशी अनेक संकल्पशक्तींची उदाहरणं व्यवहारामध्ये पुष्कळ आहेत.

पण ह्या सगळ्या संकल्पशक्ती सत्य संकल्प नाहीत. सर्व शक्ती त्या संकल्पस्वरूप होत नाहीत. जीवात्म्याची कोणाचीही शक्ती सत्यसंकल्पशक्ती नाही. ईश्वरस्वरूप झालेले महात्मे, त्यांची संकल्पशक्ती मात्र प्रभावी आहे. तो संकल्प या जीवाचा उद्धार व्हावा असं त्या महात्म्यांच्या मनामध्ये उत्पन्न होईल, त्या जीवात्म्याचं मन स्थिर लगेच होतं. कितीतरी विकार मनामध्ये, बुद्धीमध्ये आहेत. अनेक विकार बुद्धीमध्ये असताना ती बुद्धी कोणत्याही विषयाचा संपूर्ण निर्णय करु शकत नाही. हे मान्यच करावं लागतं आपल्याला न्यायाधीशाचं एक उदाहरण दिलं होतं. स्वामी महाराजांनी सांगितलं. न्यायाधीशांनी खून करणाऱ्या माणसाला फाशी दिली, म्हणाले. पण ज्यांनी ८/१० खून केले असतील त्या बाकीच्या खूनाची शिक्षा न्यायाधीश देऊ शकतो का? एका खूनाबद्दल फाशी झाली की संपलं

त्याचं, प्राण गेला. **प्राण गेल्यानंतर बाकीची जी पापकर्म, दोष आहेत ते तसेच राहिले ना !** पूर्ण शक्ती ही माणसाच्या जीवात्माच्या बुद्धीमध्ये नाही आहे. म्हणून त्याला सत्य संकल्प म्हणता येत नाही. ईश्वराचे किंवा ईश्वररूप झालेले महात्मे यांची संकल्प शक्ती ही मात्र परिपूर्ण आहे. **आपल्या शिष्याचा, किंवा ज्याच्यावर अनुग्रह करायचा आहे त्याचं कल्याण व्हावं असा नुसता मनामध्ये संकल्प झाला की सर्व कार्य होऊ शकतं. त्याला बाकीचं काहीही लागत नाही.** हा एक मोठा विशेष ईश्वराच्या संकल्पामध्ये सांगितलेला आहे. किंवा ईश्वरसंकल्प शक्तीमध्ये तो सांगितलेला आहे.

अर्जुनाला विश्वरूप पहाण्याची इच्छा झाली, विश्वरूप दाखवा म्हणाला. वस्तुत: विश्वरूप पहाण्याची अर्जुनाची योग्यता नाही आहे, पण आरंभाला नाही कसं म्हणायचं? काहीही साधन सामग्री नसताना ती एकदम निर्माण झालेली आहे. ही संकल्प शक्ती आहे. ही सर्वांच्याजवळ नाही आहे. सामान्य शक्ती बुद्धीची पुष्कळांजवळ आहे. पण त्या शक्तीपेक्षा ही मोठी शक्ती आहे. बुद्धीची शक्ती आहे.

दु:शासनाची, दुर्योधनाची किंवा हिरण्यकश्यपुची शक्ती ही फक्त देहात्म बुद्धी मनामध्ये आहे. देहात्मभाव धारण करून असलेल्या बुद्धीची शक्ती आहे. शास्त्र संस्कार ज्या बुद्धीवर झालेले आहेत म्हणजे देहापेक्षा आत्मा वेगळा आहे. तो अजरामर आहे, तो असंग आहे, कशाचाही त्याला संबंध नाही. उत्तरोत्तर आत्मस्वरूपाचे जे जे काही भाग दाखवलेले आहेत उपनिषदामध्ये त्याप्रमाणे. ज्याला अनुभव येतो आहे, अभ्यासाने आणि वैराग्याने, अत्यंत स्थिरबुद्धीने ध्यानाने हे अनुभव यायचे आहेत. **हे अनुभव ध्यानाने येण्यासाठी बुद्धीची स्थिरता अत्यंत जरूर आहे. ती स्थिरता वीतराग महात्म्यांच्या संकल्पानेसुद्धा होऊ शकते.** हे योगसूत्रकारांनी

सांगितलं आहे. आणि अशा प्रकारची अनेक उदाहरणंही व्यास महर्षींनी मांडलेली आहेत.

**शक्तीपात करणं म्हणजे शक्ती नवीन देणं असा नाहीये. गुरूंच्या संकल्पाचा प्रभाव त्याच्या चित्ताची स्थिरता करू शकतो. हे ज्ञानी महात्म्यांचं सामर्थ्य त्यांनी दाखवलेलं आहे. आणि असं सामर्थ्य उत्पन्न होणार नाही असा आक्षेप घेणाऱ्याला स्वत:च्या सामर्थ्याचीसुद्धा पूर्ण जाणीव नाही, स्वत:ची कर्म चांगली कोणची, वाईट कोणची, किती केलेली आहेत, काल काय केली, आज काय केली हे सुद्धा जो आणखी स्मरण करू शकत नाही त्याला आणखी एकंदर बुद्धीची शक्ती किती आहे याचा निर्णय कसा करता येईल? त्यामुळे ईश्वरस्वरूप झालेल्या महात्म्यांची संकल्पशक्ती ही असं कार्य करू शकते, हे शब्दप्रमाणाने सिद्ध आहे. आणखी त्याप्रमाणे प्रत्यक्ष अनुभवही आलेले आहेत. हे पुराणादिकामध्ये व्यासादिकांनी वर्णन केलेले आहेत.**

भीष्माचार्यांची संकल्पशक्ती होती की नाही. इच्छामरणी झाले ते. आपल्या पित्याची सेवा केली. पित्याकरता त्याग केलेला आहे. आजन्म ब्रम्हचारी रहायचं आणि राज्य करायचं. राज्यत्याग नुसता नाही, ब्रम्हचारी म्हणजे संसारत्यागही त्यांनी केला. आणि त्याप्रमाणे शेवटपर्यंत राहीले. भीष्माचार्यांना पित्याने अंत:करणापासून दिलेला आशीर्वाद की तुला इच्छा जोपर्यंत होणार नाही तो पर्यंत यमधर्म तुला स्पर्श करु शकणार नाही. त्यामुळे इच्छामरणी झाले ते.

रामराज्याचं आणखी महत्व वर्णन करताना शुकाचार्य महाराजांनी परिक्षित राजाला सांगितलेलं आहे की राम राज्य करीत असताना सगळेच इच्छामरणी होते असं सांगतात. मरणाची ज्याला इच्छा नाही त्याला मृत्यु येणार नाही. मरणाची इच्छा कुणाला होती

का, कधी होती की नाही. असे पुष्कळ प्रश्न निर्माण होतील. अतिशय दु:खाच्या वेळेला होतील. नको आता पुरे. भीष्माचार्य शेवटी इच्छामरणी जरी होते तरी शरीर सोडायचं त्यांनी ठरवलं. आणि शरीर विसर्जन केलेलं आहे. भगवंतांचं ध्यान करतायत. भगवान प्रत्यक्ष समोर उभे आहेत. आणि अशा स्थितीमध्ये स्तुती करता करता त्यांचा देहत्याग झालेला आहे. तर अशा रीतीनं मृत्युकरवी सुद्धा विजय मिळवणं इतकी मोठी संकल्पशक्ती अनेक जीवांची सुद्धा आपल्याला उदाहरणावरुन दिसून येते.

तेव्हां आपल्या बुद्धीची शक्ती वाढवता येणं शक्य आहे. योगशास्त्रात हे वर्णन केलेलं आहे. आणि त्यांच्यामध्ये ईश्वरतत्व त्यांनी मुद्दाम मानलेलं आहे. केवळ आत्मविचार होऊ शकणार नाही. ईश्वराची शक्ती मान्य केली पाहिजे. उपासना केली पाहिजे. त्या उपासनेच्या प्रभावाने आणखी मानवाच्या मानसिक शक्तीचा विकास सिद्धीरुपाने करायची इच्छा असेल तर तसा होईल. परंतु सिद्धी आणखी घेऊ नयेत. असंही भगवंतांनी सांगितलेलं आहे. नको. माझ्याजवळ ज्यांना यायचय ना त्यांनी सिद्धीच्या पाठीमागे लागू नये. सामर्थ्य मिळू शकेल वाटेल तशा प्रकारचं तर ईश्वराची उपासना ही त्या करता मुद्दाम त्यांनी बुद्धीस्थैर्य व्हावं म्हणजे बुद्धीस्थैर्य झाल्यानंतर सगळ्या संकल्पशक्तीचाही विकास होते. इतरांकरताही उपयोग त्या संकल्पशक्तीचा करता येतो. त्यांचही कल्याण करता येंत. तर या दृष्टीनं ईश्वर उपासना ही महत्त्वाची. **योगशास्त्रकार प्रयत्नवादी आहेत. प्रयत्नांनी सगळं साध्य करता येतं असं त्यांचं म्हणणं आहे. केवळ प्रारब्धावर अवलंबून राहीलेले ते नाही आहेत. संतमहात्म्यांनी जरी प्रारब्धाचा विचार मांडलेला असला तरी ईश्वराची शक्ती मोठी आहे एवढंच त्यांना सांगायचय. 'ठेविले**

**अनंते तैसेचि रहावे' । तुकाराम महाराज सांगतात म्हणजे प्रारब्धवाद मानतायत. लोकांचा आणखी बुद्धीभेद करतायत असा आक्षेप घेण्याचं काही कारण नाही. त्या अनंताची शक्ती इतकी मोठी आहे की त्याला अनुसरावच लागतं. अपरिहार्य आहे. हा त्यांचा अभिप्राय आहे. कारण निरहंकार ते झालेले आहेत. अहंकार ज्या बुद्धीतून पूर्ण निघून गेलेला आहे** त्या शिवाय पूर्ण शक्ती पूर्ण ज्ञान प्राप्त होणं शक्य नाही.

तुकाराम महाराजांच्या सर्व गाथा बुडवून टाकल्या इंद्रायणी नदीमध्ये. आणि तुकाराम महाराज तिथं अन्नपाणी टाकून बसले पुढे १०/१२ दिवसांनी जशाच्या तशी त्या वह्या मिळाल्या. हे आपण ऐकतो म्हणजे तुकाराम महाराज आपले अभंग गेले, आपले अभंग गेले ते मिळावे म्हणून बसले होते का? अभंग आपण केले आहेत अशी त्यांची भावना होती का? ते गेले, व्यर्थ गेले, फुकट गेले, मिळालं पाहिजे, नाहीये.

'आपुलीया बळे नाही मी बोलत। सखा, कृपावंत वाचा त्याची।' ही ज्यांची बुद्धी आहे. निरहंकार बुद्धी आहे. कर्तृत्व आपलं नाहीये. 'मत्त सर्व प्रवर्तते। हा सिद्धांत महात्म्यांच्या मनामध्ये नेहमी असतो. म्हणून त्यांचा अहंकार पूर्ण विलयाला गेलेला असतो. आणि अशी अहंकाररहित असणारी बुद्धी आहे. कधीही संकल्प कशाबद्धलही करायचा नाही. देह जरी जायचा प्रसंग आला तरी नाही. पण अशा वेळेला अशा महात्म्यांच्या मनामध्ये जर त्या शिष्याबद्दल संकल्प निर्माण झाला म्हणजे त्या शिष्याचं भाग्य आहे. महात्म्यांना काय स्वत:च्या कीर्तीची. मानापमानाची काही अपेक्षा नाही. पण त्यांचच प्रारब्ध आहे, त्यांचच सत्कर्म उदयाला आलेलं आहे आणि त्यामुळे त्याची सेवाबुद्धी, शुद्धबुद्धी पाहून आणि याप्रमाणे त्याला

त्यांच्या मनामध्ये संकल्प उत्पन्न झाला तो सत्यसंकल्प आहे. 'ऋतंभरा वृत्तप्रज्ञा'। म्हणतात **त्याप्रमाणे त्या शिष्याची बुद्धी, कामक्रोधादिक विकार सगळे नाहीसे होतात. आणि बुद्धी स्थिर होते, ध्यानाचा अभ्यास सुरू होतो. स्वरुपानुसंधान करु लागतो. संसारापासून ती बुद्धी निवृत्त झालेली आहे. वैराग्यही उत्पन्न होतं. आणि त्या बुद्धीनं ध्यानाभ्यास सुरु झालेला असताना ध्यानापेक्षा आणखी पुढची समाधीअवस्था त्याला प्राप्त होते. आणि ती समाधी अवस्था त्याचं पर्यवसान म्हणजे प्रत्यक्ष साक्षात्कार नंतर होतो.**

तर अशा दृष्टीनं कर्म सांगितलं आहे. अभ्यासाचा क्रम शास्त्रज्ञ महात्म्यांनी सांगितला आहे. त्यांचा संकल्प जर झाला तर आपला उद्धार होईल हे त्यांनी महत्वाचं सांगितलेलं आहे. आणि त्यामध्ये फायदा काय हेही दाखवलेलं आहे. **आत्मस्वरूपाचं ध्यान करायचंय. संसारातून बुद्धी बाजूला करुन आत्मस्वरुपापर्यंत नेऊन त्या आत्मस्वरुपाचं हे चिंतन करायचं मुख्य हे कर्तव्य आहे जीवात्म्याचं. मानव जन्मामध्ये हे आलं पाहिजे. तर हे साध्य.**

इथपर्यंत तू आलेला आहेत. अहं कोण आहे त्याचा विचार करता करता अन्नमय, प्राणमय, विज्ञानमय, मनोमय, आनंदमय पुरुषाच्याही पलीकडं एक स्वतंत्र 'अहं साक्षी मी' आहे. संसारामध्ये असणारा अहं पुष्कळ आहे. कोणाला अहं म्हणायचं? देहाला अहं म्हणायचं, इंद्रियाला अहं म्हणायचं, मी पहातो, मी पाहिलं, मी ऐकलं म्हणतो म्हणजे श्रोतेंद्रिय आणखी एक झाली आहेत. त्या त्या इंद्रियांशी तादात्म्य झाल्याशिवाय अशी भाषा येणार नाही. कानांनी ऐकलेलें असताना मी ऐकलं म्हणतो म्हणजे श्रोतेंद्रिय आणखी एक झाली आहेत. व्यवहारामध्ये असलेला अहं हा या इंद्रियामध्ये, देहामध्ये, मनामध्ये, बुद्धीमध्ये, एकरुप होऊन गेलेला आहे. त्याला

बाजूला करायचे विवेक अनेक प्रकारचे आहेत. नित्यानित्यविवेक आहे, क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक आहेत. शरीरादिकांपेक्षा मी वेगळा आहे हा विवेक झाला पाहिजे. हेयोपादेय विवेक आहे. काय घ्यायचं जगातलं आणि काय सोडायचं हे समजलं पाहिजे हा ही विवेक आहे. त्यासाठी मी २४ गुरु केले म्हणून भगवान दत्तात्रेयांनी आणखी त्या यदुराजाला उपदेश केला. हेयोपादेय विवेक. कोणता गुण आहे. कोणता दोष आहे. काय घ्यावं कोणचं सोडावं. हे समजण्याकरता मी गुरु केले.

तर अशा दृष्टीनं अनेक जन्माच्या अभ्यासाने, ईश्वरकृपेने शरीरादिकांपेक्षा मी वेगळा आहे इथपर्यंत बुद्धी येऊन पोचली. त्याचप्रमाणे आत्मस्वरुप म्हणजे मी असंग आहे. सच्चिदानंदरुप आहे. साक्षी आहे मी. निर्विकार मी आहे. असंग आहे हे समजणं, समजल्यानंतर हे स्थिर झालं पाहिजे. म्हणजे विघ्न उत्पन्न झालं तर काय करायचं? व्याधी आहे, शरीरामध्ये आणखी काही रोग वगैरे निर्माण झाले त्यामुळे ध्यान बंद झालं. **मनामध्ये आणखी काही दोष निर्माण झाले, काय याचा उपयोग आहे. काहीतरी वाटून आणखी अकर्मण्यता निर्माण झाली तरीसुद्धा तो आणखी अभ्यास बंद होणार.** स्थिरता. ध्यानापेक्षा आणखी जास्ती स्थिर मन होणं. म्हणजे समाधी आहे. प्रत्याहारानंतर ध्यानाला सुरुवात आहे. प्रत्याहार झाल्यानंतर सगळ्या इंद्रियापासून मन बाजूला राहू शकतं. म्हणजे ज्या स्वरुपाचं आपण ध्यान करायला लागू त्या ध्यानाने त्या ध्येयाचा साक्षात्कार होतो हा एक सिद्धांत आहे. सगुण स्वरुप असो अथवा निर्गुणात्मक स्वरूप असो. सगुण स्वरुपाचं ध्यान सुद्धा ध्येयाचा साक्षात्कार करुन देणारं आहे.

शंकराचार्य महाराजांचे जे मुख्य शिष्य पद्मपादाचार्य हे नरसिंहाचे उपासक होते म्हणतात. पण ती नरसिंहाची उपासना

इतकी मोठी होती त्यांची, की ध्यान करता करता नरसिंहरूप ते होऊन गेले. बीडच्या जवळ नामलगांव म्हणू एक गाव आहे. आशापूर्त गणेश म्हणून त्याला म्हणतात. तिथं भृषुंडी ऋषी रहात होते. भृषुंडी ऋषी त्या वाल्मीकी ऋषींच्या उदाहरणाप्रमाणे नामा कोळी म्हणून कोणीतरी वाटमाऱ्याचा धंदा करणारे पूर्वी होते. जंगल होतं तिथं. गणेशांचे शिष्य आणखी मुद्‌गल ऋषी तिकडून निघालेले त्यांना त्यांनी धरलं, काय आहे तुमच्याजवळ? टाका. तुम्हाला मी मारणार आहे. त्यांची कृपा झाली, संकल्प झाला. त्यांना उपदेश करुन मुद्‌गल ऋषी निघून गेले. आणि तो नामा कोळी ध्यान करता करता म्हणजे नामस्मरण करता करता त्यांना सोंड निर्माण झाली. सरूपता मुक्ती ज्याला म्हणतात, गणपतीप्रमाणे. भृषुंडी त्याला म्हणतात. त्यांचं ते स्थान आहे. आशापूर्त्य गणेश. त्यांचं ते स्थान आहे.

तर सगुणाच्या ध्यानानेसुद्धा आणखी मनुष्य अशा प्रकारचा होऊ शकतो. मग निर्मळ, निर्विकार आत्मस्वरुप मी आहे, असंग आहे हे ध्यान करता करता आणखी त्या ध्यानानेच आणखी स्थिरता मनामध्ये निर्माण झाल्यानंतर त्याला समाधी अवस्था प्राप्त होते, ज्या समाधी अवस्थेमध्ये देहाचा काही संबंध नाही. काही नाही. आत्माकार बुद्धी झालेली आहे. देहसंबंध नाही, काही नाही. आणि अशा स्थितीमध्ये त्या समाधीचं पुढचं पर्यवसान म्हणजे साक्षात्कार हे आहे.

तर या समाधी अवस्थेपर्यंत जाण्याला जर मध्ये विघ्न उत्पन्न झाली तर काय करायचे? कर्म आपण केलेली असतात. अद्यापि कर्मबंधाच्या पलीकडे आपण गेलेलो नाही आहे. ध्यानापर्यंत आलो. कसं तरी आलो म्हणा. तिथे **पण ते टिकलं पाहिजे. शरीरामध्ये काही रोग उत्पन्न झाले. मानसिक विकृति निर्माण झाल्या. सगळी**

**कामं बंद झाली. हे नको. याची काही जरूर नाही असं वाटायला लागलं कंटाळा आला तर? हे सगळे दोष आहेत.**

तर योगसूत्रकार मुद्दाम सांगतात. प्रत्येक चेतन जो आहे सर्वांतर्यामी आहे आत्मा परमात्मा, त्याचा साक्षात्कार म्हणजे त्याचं ज्ञान होतं त्या ध्यानाने. ध्यान करता करता आणखी तोच मी चेतन आहे. निर्विकार मी आहे. असंग मी आहे हे पूर्ण आपल्याला कळल्यानंतर सुखदु:खाचा संबंध संपलाय. विवेक वैराग्याची सीमा झालेली आहे. सर्वांपासून त्याचं मन बाजूला झालेलं आहे. आत्मस्वरुपाचं ज्ञान झालं **पण मध्ये येणारी विघ्न त्याला काय करणार? विघ्न सुद्धा त्या परमेश्वराच्या ध्यानाने आणखी विघ्न सुद्धा दूर होतात.** 'योगक्षेमं वहाम्यहम्।' म्हणतात ना. ते त्याला प्राप्त झालेलं नाही. ते त्याला प्राप्त करुन देणं आणि जे मिळालं आहे त्याचं संरक्षण करणं ही दोन्ही जबाबदारी ईश्वराने मान्य केलेली आहे. करुन केलेले आहे. पण असा जो अनन्यभूत ध्यान करणारा जो आहे त्या भक्ताचं योगक्षेम मी करतो. पारमार्थिक योगक्षेम, व्यावहारीक योगक्षेम नुसते नाही. **व्यवहारामध्ये काय मिळायचे मिळेल. राहिलं. परंतु पारमार्थिक योगक्षेम महत्वाचे आहे. बुद्धीची स्थिरता मिळाली पाहिजे.** आणि ती स्थिरता मिळून ध्यानाला सुरुवात झाल्यानंतर ही आलेली विघ्न दूर झाल्याशिवाय काय करणार? अखंड ध्यान चालू पाहिजे त्या अखंड ध्यानाचं पर्यवसन समाधी आणि साक्षात्कारामध्ये होणं. आत्मस्वरुपाचा साक्षात्कार झाल्यानंतर नंतरही अभ्यास आहे. वासनाक्षय सगळा झाला पाहिजे. मनाचा मनोनाश तत्त्वज्ञान दृढ झालं पाहिजे त्याकरता अखंड अभ्यास आहे. तो अखंड अभ्यास शेवटपर्यंत चालू रहाण्याकरता ईश्वराची, सद्गुरूंची उपासना ही अत्यंत आवश्यक मानलेली आहे.

पूर्ण शक्तीसंपन्न ईश्वर आणि सद्गुरु ईश्वररुप आहेत. म्हणून त्यांच्या शक्तीनं आणखी आपली विघ्नही दूर होतात. प्राप्त झालेलं साधन जे काही आपल्याजवळ आहे. त्या साधनाची दृढता होते. स्थिर होतं ते साधन. आणखी फलसिद्धी होते. आणखी या दृष्टीनं हा एक मार्ग योगशास्त्रकारांनी दाखवलेला आहे. आणि वीतराग महात्म्यांचं चिंतन करणं. संतांची चरित्र वाचन केल्याने मनाची स्थिरता होते असं योगसूत्रकार सांगतात, त्या संतमहात्म्यांचा जर संकल्प झाला तर त्या संकल्पाने आणखी सगळं कार्य होऊन जात आहे.

**ज्ञानेश्वर महाराज गेले असं मानायची जरुर नाही.** समाधी लावून बसले म्हणजे संपलं. काही नाही, आळंदीला कोणी नाही. अजून आळंदीला लोक जातात. अनुष्ठान करतात. त्यांना दृष्टांत होतायत. सगळं झालेलं आहे. मध्ये काही विचार चालला होता त्यांची समाधी उघडून पहायचा. विज्ञानवाद आहे सध्या. वैज्ञानिकांनी अपारदर्शक पदार्थाच्या पलीकडच्या वस्तूचाही फोटो घ्यायचा कॅमेरा शोधून काढला आहे म्हणे. पुष्कळ विचार झाला सगळ्यांचा. जाणकार लोक म्हणाले, 'बुद्धीभेद होईल. तुमच्या कॅमेऱ्याला आंत ज्ञानेश्वरांचं रुप दिसलं नाही तर तुम्ही सांगणार म्हणजे ज्ञानेश्वर तिथे नाहीत. त्यामुळे किती लोकांचा बुद्धीभेद होईल? ''म्हणून शेवटी तो विचार सोडून दिला त्यांनी. **म्हणजे वैज्ञानिक साधन हे श्रेष्ठ आहे आणि त्याच्यापेक्षा ज्ञानेश्वरांचा संकल्प श्रेष्ठ मानायला आम्ही तयार नाही. त्या साधनाने पाहिलं म्हणजे ज्ञानेश्वर आहेत का नाहीत हे सिद्ध होतं ही आमची बुद्धी आहे.**

विदर्भामध्ये जे गुलाबराव महाराज होऊन गेले. त्यांची गोष्ट नागपूरच्या एकाने सांगितली. महाराज अंध होते. अगदी बालपणीच त्यांची दृष्टी गेली. ते आपली पूजा बिजा करायचे. बसायचे, ध्यान

करायचे, नामस्मरण करायचे. एक फोटोग्राफर नेहमी येणारा, तो म्हणाला, ''महाराज तुमचा फोटो काढायचाय.'' महाराज म्हणाले, ''फोटो वगैरे काही काढायचा नाही'' त्यांनी ताकीद केली काही काढायचा नाही. त्या फोटोग्राफरने ते ऐकून घेतले. संध्याकाळी काही मंडळीं बरोबर महाराज आपले बाहेर फिरायला निघाले. तेव्हां त्या सगळ्यांचे फोटो घेतले. आणखी दुसऱ्या दिवशी सकाळी तो महाराजांच्याकडे आला. आल्याबरोबर महाराजांनी त्याला विचारले, का बाबा फोटो निघाला का?'' घाबरला तो म्हणाला, ''तुमचा काही फोटो त्यात आला नाही बाकीच्या तिघांचा त्यात आला.'' **म्हणजे महात्म्यांच्या संकल्पाला आम्ही कमी मानणार.**

ज्ञानेश्वर महाराज समाधी लावून बसलेले आहेत. हे आम्हाला खरं वाटत नाही. पण ते खरं समजण्यासाठी ज्या वैज्ञानिक साधनांचा उपयोग केला आणि त्याच्यामध्ये जर ते खोटं ठरलं तर किती लोकांचा बुद्धीभेद होईल. किती वारकरी ७०० वर्षापासून जाणारे त्यांचा बुद्धीभेद करण्याकरता वैज्ञानिक साधनांचा उपयोग केला असं होणार नाही का? मग ते थांबलं नंतर.

तर अशा दृष्टीनं आणखी ईश्वराचा संकल्प जो आहे, महात्म्यांचा संकल्प हा आणखी श्रेष्ठ मानलेला आहे शास्त्रकारांनी, त्या संकल्पाप्रमाणे आणखी कार्य चालू आहे. महात्मे आजही आहेत. ईश्वराच्या कृपेने आणखी 'धर्मस्थापनेचे नर' समर्थांनी सांगितल्याप्रमाणे आजही आहेत. पुढेही होणारे आहेत. होऊन गेलेले आहेत. ईश्वराच्या आदेशाप्रमाणे आणखी धर्मस्थापना ते करत असतात. प्रसंगी आपल्या संकल्प शक्तीचा उपयोगही त्यांना करावा लागतो. आणि नैसर्गिक शक्ती ही त्यांची संकल्पशक्ती असली तरी त्यांना अहंकार निर्माण होत नाही हे एक मोठं वैशिष्ट्य आहे. शक्ती

जवळ असून शक्ती विसरुन जाणारे महात्मे ते आहेत.

चांगदेव आले. वाघावर बसून आले. आकाश मार्गाने आले, गुरु म्हणून ज्ञानेश्वरमहाराजांना शरण यायला निघालेले असताना सुद्धा अहंकार घेऊन आले. योगाभ्यास पुष्कळ झालेला आहे. आणि ज्ञानेश्वर महाराज आपल्या इतर भावंडांबरोबर भिंतीवर बसले होते. थंडीचे दिवस. कोणी येऊन सांगितले, अहो हे योगी आलेले आहेत. ज्ञानेश्वरमहाराजांनी विचार केला त्यांना सामोरं जायला पाहीजे. ती भिंत चालायला लागली, असं आपण समजतो. ऐकतो पुष्कळ कथा ही. तर ही कथा भिंत ज्या वेळेला चालायला लागली हे चांगदेवांनी पाहिले त्यावेळेला त्यांचा अहंकार पूर्ण गेला, वाघाला आणखी वश करणं, वाघावर आज्ञा चालवणं त्याला घेऊन जाणं. वाघ चेतन आहे मीही चेतन आहे. तो ऐकणं शक्य आहे म्हणाले. पण दगडामातीची भिंत चालवणारे हे, यांची केवढी मोठी शक्ती आहे. पण हा एवढाच विचार केला चांगदेवांनी यापेक्षाही पुढचा विचार आहे की दगडमातीची भिंत आपण चालवतो या शक्तीची आठवणसुद्धा त्यांना राहीलेली नाही. केवढी शक्ती आहे.

पूर्णपणें निरहंकार बुद्धी ज्ञानेश्वर महाराजांची. चांगदेवांच्या पत्राचं उत्तर लिहायला सांगितलं निवृत्तीनाथांनी. चांगदेवांच्या पत्रात तर मजकूर नाही. कोरा कागद आहे. कारण कोरा कागद म्हणजे लिहायला बसल्यावर त्यांच्या बुद्धीमध्ये संशय निर्माण झाला ना। नमस्कार ज्ञानेश्वर महाराजांना लिहायचा का आशीर्वाद लिहायचा? पहिल्या वाक्यामध्येच थांबले ते. आशीर्वाद कसा लिहायचा म्हणाले? गुरू म्हणून आपल्याला जायचय त्यांच्याकडे आशीर्वाद कसा लिहीणार? बरं, नमस्कार लिहायचां म्हणजे केवढा मोठा १४०० वर्षांचा मी आहे हे २०/२१ वर्षाचे आहेत. लहानांना नमस्कार कसा

लिहायचा? म्हणून तसाच कोरा कागद पाठवून दिला. निवृत्तीनाथांनी पाहिलं. काही नाही. कोरा कागद आहे. मुक्ताबाई तर स्पष्ट बोलून गेल्या १४०० वर्ष राहूनही अजून कोराच आहे.

पण निवृत्तीनाथांनी ज्ञानेश्वर महाराजांना उत्तर लिहायला सांगितलं. तिथं काही वेळ नाही.

'स्वस्तिश्री वटेषु जो लपोनि जगताभासु। दावी मज ग्रासु प्रगटीला जगी।'

वटेश्वर चांगदेवांचं कल्याण असो. लहान मला समजत असला तरी लहानांनी सुद्धा मोठ्याचं कल्याण असो म्हणायला हरकत नाही. मोठा समजत असला तरी मोठ्यांनी लहानांचं कल्याण लिहायला हरकत नाही हे एवढं चांगदेवाला सुचलं नाही. एवढे योगी ऐवढे समाधी लावणारे, आपल्या संकल्प शक्तीनं मृत्यु आलेल्याला जिवंत करणारे, १४ वेळा ज्यांनी स्वत:चा मृत्यु चुकवला, दुसऱ्यालाही जिवंत केलं त्यांना एवढं लक्षात आलं नाही.

ज्ञानेश्वर महाराजांची बुद्धी इतकी पूर्ण शक्तीसंपन्न आहे की चांगदेवांना ते चांगदेव म्हणून समजत नाही आहेत. मी मोठा आणि ज्ञानेश्वर लहान हे समजणं ही जी बुद्धी आहे ती देहापर्यंत आलेली बुद्धी आहे. देहाच्या पलीकडं अजून गेलीच नाही. चांगदेव गेलेच नाहीत. मोठा आणि लहान देहाच्या दृष्टीनं म्हणतात. ज्या देहाला काळाचा संबंध अधिक आहे तो देह मोठा आहे. ज्या देहाला काळाचा संबंध कमी आहे तो देह लहान आहे. आत्म्याला देह, इतकी वर्ष, तितकी वर्ष, पण चांगदेवांनी स्वत:ला मोठे समजून ज्ञानेश्वरांना लहान समजणं हे अद्यापी क्षेत्र क्षेत्रज्ञ विवेकही झाला नाही. ध्यान, समाधी तर फार पुढं आहे. योगाभ्यासाची समाधी वेगळी आणि ही समाधी वेगळी त्यामुळे ज्ञानेश्वर महाराजांनी लिहायला सुरुवात करताना

चांगदेव म्हणजे आत्मरुपानेच ते समजतात. 'स्वस्तिश्री वटेषु जो लपोनि जगदाभास दावी' आत्मस्वरुप आच्छादित झाल्यानंतर आणखी जगदाभास दिसतो आहे. आणि आत्मस्वरुप प्रगट झाल्यानंतर जगदाभास बंद होतो आहे. चांगदेवाला आत्मरुपाने पहातात. केवढी बुद्धी आहे. शास्त्र संस्कृत बुद्धी. पूर्ण ज्ञान आणखी या बुद्धीमध्ये आलेलं आहे. त्यामुळे आणखीही शक्ती निर्माण झाली आहे. संदेह नाही काही नाही. ६६ ओव्या लिहून पाठवून दिल्या. काम झालेलं आहे.

तर अशा दृष्टीनं ही आपली बुद्धी शास्त्रसंस्कार संपन्न व्हायला पाहिजे. शास्त्र हे सुद्धा ईश्वराच्या बुद्धीतूनच निर्माण झालेलं आहे. ईश्वराची आज्ञा आहे. **या शास्त्राने जी जी साधनं सांगितली आहेत त्या पैकी आपल्याला जी होण्यासारखी असतील ती घ्यायची, त्या साधनांचा अभ्यास करायचा. वैराग्यसंपन्न होण्याचा प्रयत्न करायचा. त्याच्यामध्ये काही विघ्न येऊ नये म्हणून ईश्वराची प्रार्थना करायची. श्रेष्ठ जे महात्मे आहेत त्यांची संगती मिळाली तर करायची नाहीतर त्यांचे जे ग्रंथ आहेत ती सुद्धा संगतीच आहे. ग्रंथवाचन करणं, मनन करणं. चिंतन करणं ही सुद्धा त्यांची संगतीच आहे. या दृष्टीनं आपल्या मनाची बुद्धीची स्थिरता जितकी जितकी अधिक वाढवता येईल तितकी वाढवण्याकरता मनुष्यजन्म आहे. या मनुष्यजन्मामध्ये आपल्या बुद्धीमध्ये सांसारिक वासनांचा संग्रह जितका अधिकाधिक होत जाईल तितकं तितकं आपण परमेश्वरापासून दूर दूर जात आहोत. त्या करता महापुरुषांचा संश्रय, महापुरुषांची संगती, वैचारिक असो किंवा प्रत्यक्ष प्रारब्धाने मिळाली तर तशी करून आपल्या मनाची स्थिरता करून घेऊन अभ्यास करायचा आहे. आत्मस्वरुपाचं**

**चिंतन करणं हे मुख्य आहे. स्वरुपानुसंधान हे मुख्य घडलं पाहिजे आणि हे स्वरूपानुसंधान अखंड चालू रहावं याकरता ईश्वराची उपासना हे आणि सर्वही महात्म्यांचं सांगणं आहे. भगवंतांनी शास्त्ररुपाने ते आपल्यापुढे मांडलेले आहे.**

भारतासारखा आणखी श्रेष्ठ देश कुठंही दिसत नाहीये. केवळ अर्थ आणि काम याशिवाय कोणताही विचार मनामध्ये येत नाही असे देश आहेत. धर्म नाही, मोक्ष नाही. पण मोक्षस्वरुप काय समजल्यावर चांगलं आहे असं वाटतं, मात्र आपण करत नाही. सर्व दु:खनिवृत्ती, सर्वही दु:ख संपणं म्हणजे मोक्षपदार्थ आहे. चांगलं आहे की हे ! कोणचीही दु:ख, अध्यात्मिक, अधिभौतिक, अधिदैविक, भूकंप नाही, संप नाही, काही नाही. चांगलं आहे. पगार मिळतो आहे जास्ती, वाढतो आहे. सगळं होतय. सर्वही दु:खाची निवृत्ती म्हणजे मोक्षपदार्थ आहे. हे नको का कुणाला. पण त्याच्याकरता जे काही धर्मानुष्ठान आहे, ईश्वराची आज्ञा पालन केली पाहिजे. कर्मयोग आहे. उपासना योग आहे. भक्ति योग आहे, योगाभ्यास करण्याची शक्ति असेल तर तो योगमार्गही आहे. अवघड आहे. सांगणारेही भेटणं कठीण आहे. ज्ञानमार्ग तर फारच अवघड आहे. तेव्हां या दृष्टीनं जी जी साधनं आपल्याला करता येतील ती करत राहायचे.

अजुर्नाला फक्त कर्मयोगाचं अनुष्ठान करायला सांगितलं. तुला जे प्राप्तकर्म आहे ते तू करत रहा. पुढचा विचार तुला करायचं कारण नाही. फळ मिळेल की नाही वगैरे संशयही बाळगण्याचं कारण नाही. मिळणार नाही अशा प्रकारचं विरुद्ध मत करुन घेण्याचं कारण नाही. ज्यांनी सांगितले तो फळ देणारा समर्थ आहे. आणि मी करणारा आहे अशी बुद्धी ठेऊ नकोस. एवढंच फक्त सांगितलं. अहं कर्ता,

अशी बुद्धी ठेऊन अमुक फळ मला मिळालं पाहिजे, फलाची अभिलाषा बाळगून कर्म करु नकोस एवढं त्याला सांगितलं. ईश्वराचं स्मरण करुन तू हे सगळं करत रहा. एवढा त्याला कर्मयोग सांगितला आहे.

त्याच्यापेक्षा कितीतरी पाठीमागे आपण आहोत. किती जन्माच्या बरोबरीने अर्जुनाच्या प्राप्त होईल कुणाला ठाऊक. पण ईश्वराची प्रार्थना तेवढीच करायची काय ! आम्हाला तत्त्वज्ञान होण्याची पात्रता आपण प्राप्त करुन घ्यायची म्हणजे बुद्धी स्थिर झाली पाहिजे. **निर्वासन झाली पाहिजे. म्हणजे आपल्या स्वरुपाचं चिंतन आम्ही करु शकू.** आणि त्या चिंतनाने पुन्हा साक्षात्कार प्राप्त होतो एवढंच मागायचं आहे. या ठिकाणी आणखी समर्थ वाङ्मयाचा अभ्यास चालू आहे. प्रत्येक महिन्याला अशा दृष्टीनं हे सगळं २/२ दिवस म्हणा अशा प्रकारचं चिंतन होत आहे. मनन पाहिजेच ना चिकित्सा ही जरुर आहे. चांगली चिकित्सा व्हावी.

भगवंतांनी ज्ञानप्राप्तीची साधनं सांगितली आहेत. प्रणिपात पाहिजे, म्हणजे नम्रता पाहिजे. चिकित्सा करताना अहंकाराने विचारायला जाऊ नये, तत्त्वबोध व्हावा. चांगलं योग्य कळावं, बुद्धीनं विचारायला जावं. त्यानंतर परिप्रश्न म्हणजे चिकित्साच आहे. चिकित्सा नको असं नाही. भगवान सांगतात, चिकित्सा पाहिजे. करा, चांगली योग्य दृष्टीनं करा. राम रावणाचं युद्ध झालच नाही. कौरव पांडवांचं युद्ध झालच नाही, कालिदास झालाच नाही, हे गृहीत धरुन चिकित्सेला सुरुवात करु नको. मग काय निर्णय होईल कुणास ठाऊक. सगळं गृहीत धरुन तुम्ही माना. बुद्धी चालवा. पण त्या बुद्धीवर असे संस्कार चांगले घेऊन त्याप्रमाणे त्या बुद्धीनं विचार करा. ही सेवा हे साधन सांगितलेलं आहे. परंतु ही सुद्धा मुख्य साधनं नाहीत. ज्ञानाची मुख्य साधनं पुढे सांगतात भगवान. श्रद्धा पाहिजे

मनामध्ये हे सगळं खरं आहे. परमेश्वराची आज्ञा आहे. वेद काय, शास्त्र काय, पुराण काय, इतिहास काय, महात्म्यांचं सांगणं काय सगळे शब्दप्रमाण आपण जरी मानत असलो, शब्द जरी असले तरी हे सगळं खरं आहे. ही श्रद्धा विश्वास हे मुख्य अंतरंग साधन आहे. आणखी त्या ध्येयाची सिद्धी करुन घेण्याकरता आणखी प्रयत्न करणं इंद्रिय निग्रह करणं ही सगळी साधनं आपल्याला प्राप्त झाली पाहिजेत. **आपल्याजवळ साधनं किती कमी आहेत, किती दोष आहेत आपल्याजवळ, गुण दोष निरीक्षण प्रत्येक दिवशी आपण केलं पाहिजे. आणि त्यापैकी किती दोष कमी झाले किती दोष वाढले ते सगळं निरीक्षण करुन त्या करता आणखी साधनाभ्यास ईश्वरप्रार्थना करत असावी.**

ही सगळी साधनं भारतामध्ये सिद्ध आहेत. काही नवीन असं उसनं घ्यायची जरुर नाही. **आणि निराश होण्याचं कारणचं नाही. आत्मस्वरुप हे अजरामर आहे. जरी त्यांनी वैराग्याचा अभ्यास करायला सांगितला, सर्वसंग परित्याग करायला सांगितला असला तरीसुद्धा जीवात्मा अजरामर आहे हा सिद्धांत मुद्दाम सांगितला आहे. जीवाला नाश नाही, जन्म नाही, नाश नाही. पण मध्ये आपल्या पूर्व पापामुळे बुद्धीमध्ये दोष निर्माण होतात. त्या कर्माचं फल भोगावं लागतं. त्यातून सुटून जाण्याकरता उपायही सांगितले. सगळं सांगून ठेवलेलं आहे. महात्मे लोक निर्माण झालेले आहेत. ईश्वराच्या आज्ञेनं कार्य करतायत. आपल्या शक्तीप्रमाणे जीवाची बुद्धी स्थिर करु शकतात. हे शास्त्राप्रमाणेच सांगतात.** शास्त्र जसं सांगतं त्याप्रमाणे सांगितलेलं आहे. आणि हे सगळंही आपल्याला प्राप्त व्हावं.

'सर्वांच्या हृदयस्थ परमेश्वर आहे पूर्ण शक्तीसंपन्न आहे. त्याला

तू शरण जा.'' असे भगवंतांनी अर्जुनाला सांगितले. अहंकार त्याग करुन सर्व कर्तृत्व आपलं आहे. मी कर्ता आहे ही भावना ठेवू नकोस. प्रार्थना म्हणजे सगळं होतं.त्या सर्वांतर्यामी परमेश्वराने आणि तत्स्वरुप महात्म्यांनी आमच्यावर कृपा करावी.

**आमच्या बुद्धीमध्ये असलेले जे अनेक दोष आहेत ते गेले असं समजता येत नाही आपल्याला. माझा राग गेला, मला काही वासना नाही. असे आपण म्हणतो पण किती दिवस, किती वेळ, पाहिलयं का आम्ही. किती दिवस राग गेलेला आहे? १ तास सुद्धा जात नाही. विरुद्ध घटना घडल्याबरोबर लगेच रागावतो आपण. हे विकार किती मनामध्ये भरलेले आहेत हे सगळे विकार मनातले दूर होणं म्हणजे किती कठीण आहे.**

आपले हे जे काय कार्य आहे त्या कार्यामध्येही असंच चिंतन अखंड व्हावं, सर्वही साधनांचा उपदेश योग्य अधिकारी व्यक्तींकडून आपल्या कानावर पडावा त्याप्रमाणे आणखी आचरण करावं ईश्वराची प्रार्थना आणि ती आपल्याकडून चालू रहावी अशी हृदयस्थ परमेश्वराला प्रार्थना करुन आपल्या आणखी सांगण्याप्रमाणे जे काही यथामती विचार आपल्यापुढे मांडलेले आहेत त्यामध्ये हंसक्षीर न्यायाने जे आपल्याला ग्रहण करायचे ते ग्रहण करावं अशी प्रार्थना करुन मी हे भाषण पूर्ण करतो.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त ॥**

***न गुरोरधिकं तत्वं न गुरोरधिकं तप:***
***तत्वज्ञानात्परं नास्ति तस्मै श्रीगुरवे नम:***

व्यास महर्षी सांगताहेत, भगवत् गीता ही त्या पद्मनाभाच्या मुखातून निघालेली आहे. सर्व विश्व ज्याने निर्माण केले किंवा ज्याच्या नुसत्या संकल्पाने निर्माण होते अशी ज्याची क्रियाशक्ती आहे. त्याची ज्ञानशक्ती केवढी आहे ! हे या भगवत् गीतेवरुन समजून येते. त्रिकालदर्शी व्यासमहर्षीनी भगवंतांनी केलेला हा उपदेश लोकांना उपयोगी पडावा म्हणून सातशे श्लोकांमध्ये लिहून ठेवला आहे. सर्व उपनिषदांमध्ये असलेल्या ज्ञानाचे सार भगवंतांनी गीतेच्या रुपाने आपल्यापुढे ठेवले आहे. तो सर्वही आबालवृद्धांना समजावे या उद्देशाने त्यांचेच अवतार असलेल्या ज्ञानेश्वर महाराजांनी भावार्थ दीपिका - ज्ञानेश्वरीरुपाने आपल्या पुढे ठेवला आहे. हे आपले मोठे भाग्य आहे. ईश्वररूप झालेल्या महाराष्ट्रातील संतांनी गीतोपदेश आपल्या भाषेत लिहून ठेवला हे महाराष्ट्राचे भाग्य आहे.

भगवंतांचे दुसरे प्रिय शिष्य म्हणजे उद्धवजी. मोठे राजनीतीज्ञ मंत्री होते यादवांचे. पण देवाचे मोठे भक्त होते. गीतेप्रमाणे उद्धवजींना भगवंतांनी जाताना केलेला उपदेशही व्यास महर्षींनी लिहून ठेवला आहे. म्हणून तो आज आपल्याला पहायला, ऐकायला मिळतोय. भागवताच्या एकादश स्कंधामध्ये तो आला आहे. **तीव्र जिज्ञासा ज्याच्या मनामध्ये आहे त्याच्याकरता ही सगळी सोय आहे. त्याचे वाचन, मनन केल्यानंतर तो समजणार नाही असे नाही. पण ज्या मंडळींनी त्याचा अभ्यास केला आहे मनन केलेले आहे त्यांचे थोडे मार्गदर्शन होत राहिले म्हणजे आपल्या बुद्धीत खरा ज्ञान प्रकाश होतो. आणि तो दृढ होऊन टिकतो.**

भगवत् गीतेच्या शेवटी भगवान् सांगतात - ईश्वरसर्वभूतानां -

हे सगळ्याचे सार आहे. ईश्वर आपल्याला दिसत नाही पण या चर्मचक्षूंनीही त्याला पहाणारे महात्मे आहेत. होऊन गेलेले आहेत. परंतु आपल्यासारख्या सामान्य माणसाची तेवढी योग्यता नाहीये. म्हणून ईश्वराचे स्थान कुठे आहे हे मुख्यत्वेकरुन भगवान् सांगताहेत. सर्व भूतांचे हृदय हे स्थान सांगताहेत. सर्वांच्या हृदयामध्ये भगवान् आहेत. बुद्धिस्थ आहे परमात्मा.

भगवंताचे स्वरुप कसे आहे, शक्ती कशी आहे, उपनिषदातल्या अंतर्यामी ब्रम्हाचे वर्णन वगैरे सर्व **आचार्य महाराजांनी आपल्या श्रीकृष्णाष्टकम्** या स्तोत्रात केले आहे. ते म्हणतात, हे संपूर्ण विश्व या परमेश्वरापासून निर्माण झाले. केवळ संकल्पाने पंचमहाभूतं निर्माण झाली. अशी त्याची संकल्पशक्ती आहे. संरक्षण करण्याच्या वेळेलासुद्धा आपल्या आनंदरुपाने भगवान् संरक्षण करताहेत. प्रलयाच्या वेळेला उपसंहारही करतात.

शरण्यो लोकेशो -- माझ्या नेत्राला परमात्मा हा विषय व्हावा. परमात्म्याचे दर्शन नेत्रांना होणे शक्य आहे हे आचार्य महाराज सांगताहेत. तो हृदयामध्ये आहे. तटस्थ होऊन सांगताहेत. आपला ईश्वरभाव कांही वेळा भगवंतांनी प्रगट केला आहे. अर्जुनाला आलेली शंका दूर करण्याकरता आपण कोण आहोत हेही सांगितले पण इथे मात्र तटस्थपणे सांगताहेत --

***इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ॥४०१॥***

सूर्यनारायणाला मी योगाचा उपदेश केला. त्याने मनुला सांगितलला. पुढे परंपरेने हा मार्ग आलेला आहे, असे भगवान् सांगताहेत. ते ऐकून मनामध्ये संशय निर्माण झाला. त्याने विचारले, ''देवा ! सूर्यनारायण किती अनादि कालापासून आहे. तूं तर अगदी अलीकडच्या काळात माझ्या बरोबर जन्माला आला आहेस. मग तूं

सूर्यनारायणाला उपदेश केव्हां केलास? सामान्य माणसाला येणारी शंका आहे ही. कारण शरीर समोर दिसतंय, ईश्वर नेत्रांनी दिसत नाही हे आहे. ईश्वर समोर असतानासुद्धा ईश्वर आहे ही कल्पना आमच्या मनाला येत नाही. ईश्वर दिसून काय उपयोग? प्रत्यक्ष भगवान् गोपालकृष्ण समोर उभे आहेत ते सांगताहेत की मी सूर्याला उपदेश केलेला आहे. त्यांचे वय आणि देहाकडे पाहून अर्जुन प्रश्न करतोय तूं सूर्यनारायणाला उपदेश केव्हां केलास? परंतु भगवान् गोपालकृष्णांनी अर्जुनाच्या प्रश्नांची उपेक्षा केली नाही. ते म्हणाले, माझे पुष्कळ जन्म झालेले आहेत. या जन्मामध्ये तूं मला तुझ्या बरोबरीचा समजतोस. पण माझ्या प्रमाणेच तुझेही अनेक जन्म झाले आहेत. परंतु तुला त्यांचे ज्ञान नाहीये. माझ्या केवळ शरीराकडे पाहून तुझ्या मनांत ही शंका आली आहे.

ईश्वराचे स्वरूप हे अंतर्यामी आहे असे उपनिषदांमध्ये सांगितले आहे. पंचमहाभूतांच्यासुद्धा देवता आहेत. आधिदैविक सृष्टी फक्त वैदिक संस्कृतीमध्येच दाखिवलेली आहे. बुद्धिवादी जगात फक्त भौतिक सृष्टीचाच विचार सध्या चालू आहे. आपला बुद्धिवाद श्रेष्ठ आहे अशीही त्यांची समजून आहे. तो जर श्रेष्ठ आहे तर आधिदैविक सृष्टी नाही असे कशाला म्हणायचे? उपनिषदांसारख्या ग्रंथांमध्ये ज्या सृष्टीचे वर्णन आहे त्या बद्दल श्रेष्ठ बुद्धिवाद्यांनीही विचार करायला काय हरकत आहे. 'नाही' म्हणून एकदम कसा निर्णय द्यायचा? पण तो निर्णय झालेला आहे आणि तोच बुद्धिवाद खरा आहे अशी ठाम समजूत होऊन बसलेली आहे. त्या बुद्धिवादाचा अहंकारही निर्माण झालेला आहे त्यामुळे **जिज्ञासा संपलेली आहे. आधिदैविक सृष्टीबद्दल जिज्ञासा असणार तरच बुद्धी तिचा विचार करू शकणार.** वैदिक संस्कृतीमध्ये शब्दप्रमाण आहे. मोठमोठ्या

बुद्धीवादी महर्षींनी या शब्दप्रमाणाच्या आधारेच आधिदैविक शक्तीचा, सृष्टीचा विचार केला आहे. भौतिक शक्ती असेल. पण भौतिक शक्तीचं नियंत्रण करणारी अशाच प्रकारची एक निराळी आधिदैविक शक्ती आहे. त्या दृष्टीनं पंचभूत ही केवळ जड नाहीयेत. त्यांच्यामध्ये अंतर्गत जीव आहे. देवता आहेत. पृथ्वी ही देवता आहे, जल ही देवता आहे. त्याचप्रमाणे शरीराला धारण करणारी अशाच प्रकारची देवता जीवकोटीमध्ये आहे. आणि या सर्वही जीवांचे नियमन करणारी शक्ती प्रत्येक जीवाच्या अंतर्यामी आहे. आपल्या मायाशक्तीने सर्वही जीवांना जन्ममृत्युच्यात फिरवण्याचे काम ही शक्ती करते आहे. आमच्या बुद्धीला पटत नाही म्हणून हे थांबणार आहे असे नाही. इथे कोणच्याही पटण्याचा न पटण्याचा संबंध नाहीये.

**जिज्ञासा हा मोठा गुण आहे. शास्त्र सिद्धांत काय आहेत हे जाणून घेण्याची जिज्ञासा ज्यांच्या मनांत आहे ते अभ्यास करतात, प्रयत्न करतात. जिज्ञासा ही मुख्य आहे ना ! जिज्ञासाच नसेल तर प्रयत्न कशाला होईल?**

'कर्तुम अकर्तुम अन्यथा कर्तुम' असे त्या ईश्वराचे सामर्थ्य आहे. आपल्या मायाशक्तीने सर्वही जीवांना तो जन्ममृत्युच्या चक्रात फिरवतो. भगवान् सांगताहेत त्या ईश्वराला शरण जा. मी ईश्वर आहे असे नाही म्हणाले. प्रसंगाने बोलले असतील तसे. ''मी कालरुप आहे'' असे म्हणाले असतील, अर्जुनाचा अभिमान दूर करण्याकरता. त्याला आपले विश्वरुप दाखवले. त्याला योग्यता प्राप्त करुन दिली. ज्ञानदृष्टी दिली. त्याला सांगितलं, सगळ्यांचा संहार करण्याचा माझा संकल्प होऊन गेलेला आहे. तूं युद्ध सोडून निघून गेलास तरी यांच्यापैकी कोणी जिवंत राहाणार नाही. तूं ह्यांचे संरक्षण करणार काय? हे पटवून देण्यासाठी त्याला विश्वरुप दाखिवले.

निमित्तमात्र भव सव्यसाची। - असेही सांगितले. तूं निमित्तमात्र हो, सगळ्या वीरांना मारण्याचा माझा संकल्प झालेलाच आहे. पण तसंच राहिलं पाहिजे. मी फक्त निमित्तमात्र आहे. खरा संकल्प, खरी शक्ती ईश्वराची आहे. ही जाणीव मनामध्ये ठेवून आपण जर कर्म केलं तर ते कर्म शुद्ध होतयं मग ते कर्म बंधनकारक होत नाही.

भगवान् सांगतात, लहान मोठी सर्व कार्य माझ्या शक्तीमुळे होताहेत. त्याचा संकल्प आहे, त्याचे संरक्षण आहे. ईश्वर दर्शनाला शास्त्र हेच प्रमाण आहे, दुसरे प्रमाण नाही. ईश्वर प्रत्यक्ष दिसत नसल्यामुळे तो नाहीच अशी धारणा झाल्यावर त्याच्या दर्शनासाठी प्रयत्न कसा होणार? पण ईश्वर नाही असे म्हणायलाही आमच्याकडे प्रमाण नाही. आमच्या बुद्धीला समजत नाही म्हणून तो नाही हा कांही युक्तीवाद नव्हे. सीतेचा शोध करणाऱ्या वानरांना सीता दिसली नाही ते निराश झाले पण जटायुचा बंधू संपाती तिथे आला आणि त्याने सीतेचा ठावठिकाणा प्रत्यक्ष पाहून सांगितला. आता जर का वानरांनी विचार केला असता, आमच्यापैकी कोणलाच दिसत नाही तुला एकट्यालाच तेव्हढी दिसते हे खरं कसं मानायचे? तर सीतेचा शोध लागला असतां का? प्रत्यक्षदर्शी जे महात्मे आहेत त्यांची शक्ती आमच्या बुद्धीला आकलन होऊ शकत नाही. पण ते सांगताहेत त्याप्रमाणे प्रयत्न करुन पाहू या असेही आमच्या बुद्धीला पटत नाही त्यामुळे आमच्या कडून प्रयत्नच होत नाहीत. जिज्ञासाच निर्माण होत नाही.

भगवंतांनी सांगितले - शास्त्रप्रमाण आहे. शास्त्रानुसारिणी बुद्धी शुद्ध समजली गेली आहे. बुद्धीला समाधार ज्याच्यामध्ये असेल तोही बुद्धीला विषय होऊ शकतो. पण ती बुद्धी फार मोठी असली पाहिजे. दुष्यंतराजा एकदा शिकार करुन परत येताना कण्व ऋषींना

आश्रमात थांबला. कण्व ऋषी बाहेर गेले होते. शकुंतलेने त्याचे आदरातिथ्य केले. तिच्यावर दृष्टी पडतांच त्याच्या मनांत मोह उत्पन्न झाला. प्रथम त्याच्या मनांत आले मी क्षत्रिय आहे आणि ती ऋषी कन्या म्हणजे ब्राम्हणाची कन्या आहे तिच्यावर माझे मन जाणे बरोबर नाही. तो शास्त्र मानणारा असल्यामुळे त्याने आपले मन आवरले. पण पुन्हा त्याला वाटलं ज्याअर्थी माझे मन तिच्यावर गेले त्या अर्थी ती क्षत्रियकन्याच असली पाहिजे. माझं आर्य मन शास्त्रानुसारी आहे. शास्त्राने सांगितलेले शब्दप्रमाण आणि महात्म्यांच्या शब्दावर विश्वास आहे. त्याप्रमाणे विचार करणारी माझी बुद्धी आहे. माझं अंत:करण ज्या अर्थी या कन्येवर गेलेले आहे त्या अर्थी ही क्षत्रिय कन्याच असली पाहिजे. पण माझं मन असं आर्य मन आहे हे सांगण्याच धाडस एरव्ही करील? नेहमी आम्हाला आर्यच आमचं मन आहे असं वाटत असतं. **अनेक प्रकारचे दोष बुद्धीमध्ये भरलेले असतानासुद्धा बुद्धी प्रेरक शक्ती आहे हे मानायचीही आमच्या बुद्धीची तयारी नाही. मग त्या ईश्वरशक्तीची कृपा असणं, त्या कृपेने मन आर्य बनवणं, शुद्ध बनवणं ही लांबची गोष्ट आहे. आम्ही चुकतो हेच आम्हाला मान्य नसते, पटत नसते. आम्ही केलेले सर्व बरोबर आहे अशीच आग्रही वृत्ती जो पर्यंत मनाची व बुद्धीची आहे तो पर्यंत बुद्धीची सुधारणा होणार कशी? दोष आहेत समजल्यावर त्यावर उपाय करायचा ना ! दोषज्ञान स्वत:ला तरी होऊ शकेल. रोग्याला सर्व दोषांचे ज्ञान होत नाही. कांही चिन्ह त्याला समजतात. आपल्या शरीरात कांही बिघाड झालाय, दोष निर्माण झालाय हे समजते म्हणून तो डॉक्टर, वैद्याकडे जातो. ते त्याला तपासून रोगाचे निदान करुन औषध योजना करतात. पण जर डॉक्टरांच्या शब्दावर विश्वास न ठेवता तो रोगी चिकित्सा**

**करु लागला, तुम्ही कशावरुन सांगता हा रोग झाल्याचे, त्या रोगावर हेच औषध कशावरून, ही चिकित्सा करण्याची पद्धत आहे का वगैरे म्हणू लागला तर? आणि ती वेळ आहे का?**

तुष्णिम् अवस्था परमोपशांतिम। - ही परा शांती आहे. मन स्वस्थ राहाणं याचं नांव शांती आहे. मन स्वस्थ राहाणं शक्य आहे का? आम्ही बुद्धीचा फक्त अभिमान धरतो. आमची बुद्धी चांगली आहे, आम्ही बुद्धीने सर्व कार्य करतो वगैरे अभिमानाने सांगतो. आग्रह धारण करतो. तर मनाच्या या वृत्ती बंद करणं, मनाची स्वस्थता करणं. हे आमच्या मनाच्या स्वाधीन आहे काय, आमच्या मनाची शक्ती आहे का ती? मन स्थिर होणं कठीण आहे. अर्जुनासारखा बोलून गेला की मी या सैन्याचा निग्रह मी करु शकेन पण मनाचा निग्रह मी करु शकणार नाही.

भगवानही म्हणाले, ''मनाचा निग्रह करणे अत्यंत कठीण आहे'' असे ते अगोदर बोलून गेले पण पुढे म्हणाले, ''अभ्यासेन तु कौन्तेय...'' मनाची शक्ती इतकी मोठी आहे की त्या मनाला आवरण्याची शक्तीही त्या मनामध्येच आहे. मन बाहेर जाणे म्हणजे ईश्वरापासून बाजूला होणे. ते ईश्वराकडे लागणे आणि ते स्थिर होणं,

**पूर्ण शांती म्हणजे मनाची निश्चल अवस्था प्राप्त करून घेणे हीसुद्धा मनावरच अवलंबून आहे. त्या करता अभ्यास आणि वैराग्य हे दोन उपाय योगसूत्रकारांनी सांगितले आहेत. भगवंतांनी हेच दोन उपाय अर्जुनाला सांगितले. ते म्हणाले, मनाला स्थिर करण्याचा एक अभ्यास आहे. त्याकरता अंतर्यामी ईश्वराला सतत प्रार्थना करीत राहाणे एवढेच मुख्य कर्तव्य आहे. ईश्वरशक्ती सहाय्य करणारी आहे. ईश्वरशक्ती आपल्याला सहाय्य करणारी आहे एवढं जरी आपल्या मनाला पटले तरी पुष्कळ झाले.** आम्ही

मनाचा निरोध करण्याचा प्रयत्न  करणार आहोत. त्या प्रयत्नांना कोणाचे तरी सहाय्य पाहिजे. तशी सहाय्य करणारी ईश्वरशक्ती आहे हे मनाला पटलं तरी पुष्कळ झाले ना ! सहाय्य म्हणून तरी ईश्वराकडे जायला पाहिजे ना ! आपलं कर्तृत्व कांहीच नाही. ईश्वरशक्तीच सर्व कार्य करणारी आहे. विश्वरुपही तो झालेला आहे आणि विश्वकर्ताही तोच आहे. ही दृष्टी उत्पन्न होणं फार कठीण आहे. तेव्हां सहाय्य करणारी ईश्वरशक्ती आहे त्या ईश्वरशक्तीच्या सहाय्याने आमचा जो प्रयत्न निर्विघ्नपणें शेवटास जावो.

अंतराय अभावश्च ..... म्हणतात. जीवचाचं खरं स्वरुप काय आहे? अहम् कोण आहे? हे त्या ईश्वर - शक्तीच्या कृपेने समजून येईल. आम्हाला, ''मी कोण आहे'' हे सुद्धा सांगता येत नाही किंवा समजत नाही. देह म्हणजे मी आहे, इंद्रिय म्हणजे मी आहे, तो ''मी'' च किती ठिकाणी गुंतून राहिला आहे. तादात्म्य ध्यास किंवा संसर्गाध्यास इतका बसून गेलेला आहे की त्या मनात घर, शेत म्हणजे मीच आहे. माझंच आहे म्हणजे हा ''मी''त्यांत मिसळला गेलाय. प्रत्येक ठिकाणी मिसळल्या गेलेल्या ''मी'' ला बाजूला करायचे आहे सर्वांपासून. सर्वांपासून तो 'अहम' पदार्थ वेगळा आहे, हे समजून घेणं किती तरी कठीण आहे. देहापासून आरंभ होतो. हा देह म्हणजेच मी आहे, ही बुद्धी कमी झाली पाहिजे. म्हणून गीतेमध्ये भगवंतांनी क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक सांगितला आहे.

**शरीर जे आहे त्याला भगवंतांनी क्षेत्र म्हटले आहे आणि त्या क्षेत्रात राहाणारा जो आहे त्याला क्षेत्रज्ञ. तो अहम् आहे.** पण तो शरीरात इतका मिसळून गेला आहे कि शरीरापेक्षा मी वेगळा आहे असं त्याला कधीच वाटतच नाही. आणि शरीरापेक्षा मी वेगळा आहे ही बुद्धी झाल्याशिवाय तो धर्मकार्य, कर्मयोगाचाही अधिकारी

होऊ शकत नाही. या जन्मात मिळालेला शरीराचा संबंध सोडून मला दुसऱ्या जन्मात दुसऱ्या शरीरात जायचं आहे आणि त्याही शरीरांत गेल्यावर मला सुख मिळालं पाहिजे, माझी प्रगती झाली पाहिजे अशी बुद्धी असल्याशिवाय धर्माचरणही होणार नाही. लौकीक कार्य चाललेली आहेत. त्या करता देहात्म बुद्धीचा उपयोग होत असेल. परंतु पुढे जे फल आपल्याला मिळवायचे आहे त्याकरता मी देहापेक्षा वेगळा आहे ही अंशत: तरी बुद्धी झाली पाहिजे. पूर्ण होणे शक्य नाही.

शेवटपर्यंत आणखी देहतादात्म्य असतं. मी सच्चिदानंदरुप आहे हे प्रत्यक्ष ज्ञान झाल्यानंतर देहबुद्धी निघून जाते. देहाचा संबंध कायमचा सुटतो. तो जीवात्मा जीवनमुक्त होतो. तोपर्यंत मात्र ही स्थिती प्राप्त होणे कठीण आहे. चांगदेवांसारख्यांना सुद्धा ही स्थिती प्राप्त झाली नाही ना ! क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक त्यांनासुद्धा झाला नाही. ज्ञानेश्वर महाराजांची कीर्ती ऐकली आणि त्यांना शरण जावे अशी इच्छा झाली चांगदेवांना. ज्ञानेश्वरांचे मार्गदर्शन आपल्याला मिळाले तर आपली पूर्णता होईल असेही वाटते. श्रद्धा, विश्वास वाटला, परंतु ज्ञानेश्वरांना पत्र लिहितांना मात्र नमस्कार लिहावा किंवा आशीर्वाद लिहावा या गोंधळातच ते सांपडले. ज्ञानेश्वर महाराज कोठे, गुरुस्थानी मानायचे म्हणून नमस्कार लिहायचा. पण नमस्कार तरी कसा लिहीणार? कारण मी चौदाशे वर्षाचा आणि ते वीस वर्षांचे. आशीर्वाद लिहावा तर त्यांना गुरु म्हणून शरण जायचे आहे. ज्यांना शरण जायचंय त्यांना आशीर्वाद तरी कसा लिहायचा? या संशयामुळे कोणताच निर्णय करता आला नाही, त्यांना सुद्धा. आणि तसाच कोरा कागद पाठवून दिला. निवृत्तीनाथांनी तो कागद पाहिला आणि ज्ञानदेवांना उत्तर लिहिण्याची आज्ञा केली.

ज्ञानदेवांनी लगेच उत्तर लिहिले ते चांगदेव पासष्टी म्हणून प्रसिद्ध आहे. निश्चयात्मक बुद्धीचे, पूर्णतेचे ते लक्षण आहे.

स्वस्तिश्रीवटेषु जो लपोनि जगदा भासु... चांगदेवांची ज्ञानदेवांकडे पहाण्याची दृष्टी म्हणजे मी चौदाशे वर्षांचा ज्ञानदेवांपेक्षा मोठा आणि आणि ज्ञानेश्वर वीस वर्षांचे म्हणजे माझ्यापेक्षा लहान म्हणजे ज्ञानेश्वर महाराजांचा २० वर्षांचा देह आणि आपला १४०० वर्षांचा देह. ज्या देहाला कालाचा अधिक संबंध असेल त्याला जेष्ठ म्हणतात. म्हणजे चांगदेवांची बुद्धी देहापर्यंतच आली. चांगदेव मोठे योगी होते. पण त्यांच्या योगज्ञानाचा इथे काय उपयोग झाला? शरीराच्या पुढे त्यांची बुद्धी गेलीच नाही. ज्या बुद्धीला आत्म्यापर्यंत, सच्चिदानंद ब्रह्मस्वरुपापर्यंत जायचंय ती जर शरीरातून बाहेर पडलीच नाही तर पुढे कशी जाणार?

पण ज्ञानेश्वर महाराजांनी सुरुवात करताना लिहिले, वटेश्वर चांगदेवांचे कल्याण असे. व्यवहार दृष्टीनेसुद्धा चांगदेव स्वत:ला मोठे समजत असले तरी ''मोठ्यांचे कल्याण असो'' असे म्हणण्याचा लहानांना अधिकार आहे. यांत कांही चूक नाही. नमस्कार लिहायला नको की आशीर्वाद लिहायला नको. स्वस्ति वाचन केलेले आहे.

जो लपोनी जगदा भासु ... चांगदेव म्हणजे सर्व जगाला अधिष्ठानरुप आहे. आत्मा परमात्मा तोच चांगदेव आहे. सर्वरुपी जर तो आहे तर चांगदेव त्याचेच रुप नाही का? आत्मा देहाच्छादित झाला त्यामुळे जग दिसू लागले. बुद्धीमध्ये संसार आला. आणि मग 'प्रगटीला करी'. तो आत्मा जर प्रगट झाला तर त्याच्या कृपेने संबंध ग्रास होऊन जातो. ''मावळीत विश्वाभासू'' हा संबंध विश्वाभास मावळून जातो. ज्ञानदेव आत्मदृष्टीने हे लिहीताहेत. चांगदेव पासष्टीमध्ये त्यांनी किती विवेचन केले आहे ! ती आत्मदृष्टी त्यांनी

कशी मिळवली असेल? किती त्यांची बुद्धी निर्णय घेणारी असेल ! परिपूर्ण झाली असेल ! हे सर्व विचार करण्यासारखे आहे. ही परिपूर्णता ईश्वरकृपेवांचून प्राप्त होत नाही.

म्हणून भगवंतांची अर्जुनाला सांगितले, '' त्या ईश्वराला तूं शरण जा. अर्जुना, बुद्धी निर्मळ केल्या शिवाय ईश्वराला शरण जाता येत नाही. त्याचा प्रसाद झाला म्हणजे तुला पराशांती मिळेल. मन स्थिर होईल. अज्ञान जाईल. अश्रद्धा/संशय सर्व जाईल. तुझ्या मनांतले सर्व विचार जाऊन तुझे अंत:करण स्थिर, निर्विकार झाले म्हणजे तुला पूर्ण शांती प्राप्त होईल.'' मनाची स्थिरता जितकी जितकी वाढत जाईल तसतसा समाधीचा अभ्यास होईल. समाधी पूर्वी ध्यानयोगाचा अभ्यास करावा लागतो पण ध्यान योगाचा अभ्यास करण्यासाठीसुद्धा पुष्कळ मन निर्मळ व्हावं लागतं. त्या शिवाय ध्यानयोगाचा अभ्यास जमू शकत नाही. अंत:करण केव्हां बाजूला जाईल सांगता येत नाही.

सगुण मूर्तीचे ध्यान करायला सांगितले तरीसुद्धा मन त्या मूर्तीच्या ठिकाणी स्थिर होऊ शकत नाही. जपाच्या वेळेला मंत्रार्थाकडे लक्ष स्थिर होत नाही. नंतर बाहेरचे विचार मनांत येतात. येतात अन् जातात. अनेक शुभाशुभ संस्कार त्या मनावर झाले आहेत. त्यामुळे मन कधी कोणत्या विषयाकडे जाईल सांगता येत नाही. जर साकार मूर्तीच्या ठिकाणी जिथे अंत:करण स्थिर राहू शकत नाही तिथे जे अंतर्यामी ईश्वरस्वरुप आहे तिथे कसे स्थिर राहिल? ही मनाची संवय कशी मोडेल? म्हणून हा ध्यानयोगाचा अभ्यास फार कठीण आहे. त्याला फार अभ्यास करावा लागतो. ईश्वराची महात्म्यांची कृपा असेल तर मन त्या स्व स्वरुपाच्या ठिकाणी स्थिर होईल. योगसिद्धीमध्ये सांगितले आहे की, आपल्या डोळ्यांनी

न दिसणारे अनेक पदार्थ आहेत. आपल्याला जर त्या पदार्थांचे ज्ञान करुन घ्यायचे असेल तर अंत:करण त्या वस्तूच्या ठिकाणी स्थिर झालं पाहिजे. ध्यानाचा परिपाक म्हणजे अत्यंत स्थिर अंत:करण. एकाग्र चित्ताने एखाद्या वस्तूचे ध्यान झाल्यावर त्या वस्तूचा एकदम साक्षात्कार होऊन जातो, आविर्भाव बुद्धीमध्ये होतो, प्रकाश होतो. म्हणजे ती वस्तू बुद्धीग्राह्य होऊ शकते. बुद्धीला पटत नाही, समजत नाही असे आपण म्हणतो. पण अत्यंत सूक्ष्म बुद्धीला कोणत्याही वस्तूचे प्रत्यक्ष ज्ञान होऊ शकते. त्याच प्रमाणे परमात्म्याकडे जर बुद्धीची धारणा झाली, अंत:करण स्थिर झालं तर त्या ध्यानाचा परिपाक समाधीमध्ये होईल. सगुण साक्षात्कार होईल. हे सगळं आपोआप होऊन जातं ना ! योगशास्त्रकारांनी अंत:करणाच्या शक्तीचं वर्णन केलेलं आहे. मनामध्ये इतकी विलक्षण शक्ती आहे की ते मन ज्या वस्तूचे ध्यान करेल तद्रुप होऊन जातयं.

आचार्य महाराजांचे प्रथम पट्टशिष्य पद्मपादाचार्य म्हणून होऊन गेले. नरसिंहांचे मोठे भक्त होते ते. आचार्य महाराजांच्या बद्दल अत्यंत श्रेष्ठ भक्ती त्यांच्या मनात होती. ब्रह्मचर्याश्रमातून त्यांनी संन्यासाश्रम ग्रहण केला. आचार्य महाराजांच्या मुखातूनच प्रस्थानत्रयी त्यांना ऐकायला मिळाली. आचार्यांनी आपले सगळे सिद्धांत आपल्या पट्टशिष्याला समजावून सांगितले. हे ही त्यांचे मोठे भाग्य. वेदसिद्धांत, उपनिषदज्ञान खरं काय आहे हे सगळ्यांना समजावून सांगण्याकरता सर्व देशभर संचार केला. तेही एक मोठं राष्ट्रकार्य आहे. सगळ्यांची बुद्धी सन्मार्गाला लावणं. यालाच लोकसंग्रह म्हणतात.

भगवंतांनी अर्जुनाला सांगितले, ''तुला कर्म सोडता येणार नाहीत. तुला तरी कांही कर्तृत्व नसलं तरी लोकसंग्रहाकरता तरी तुझ्या कर्मांचा उपयोग होईल ना ! कुमार्गाकडे जाणाऱ्या लोकांना

सन्मार्गाकडे प्रवृत्त करणं हा लोकसंग्रह शब्दाचा अर्थ आहे. केवळ पक्षातल्या सभासदांची संख्या मोठी आहे म्हणजे पक्ष मोठा, बहुमत आहे याला लोकसंग्रह म्हणत नाहीत. तूं स्वत:ला श्रेष्ठ समजत असशील. तुला कर्म सुटत नाहीत. त्या करता सत्कर्म करावी लागतील.'' असा कर्मयोगाचा आग्रह अर्जुनाला भगवंतानी मुद्दाम केला आहे. कोणीही अकर्मक राहात नाहीयेत. लोकांची बुद्धी सन्मार्गाकडे वळवणे राज्य शासनालाही शक्य नाहीये. ज्ञानेश्वर महाराजांच्या सारख्या ईश्वररुप झालेल्या महात्म्यांच्या संकल्पाने जे कार्य होतयं ते राजशासनही करु शकत नाहीये. पंढरपूरची वारी सुरु करुन सातशे वर्ष झाली. ती आजही चालू आहे. अखंड. ऊन नाही, वारा नाही, पाऊस नाही. काही नाही. बायका, पुरुष, तरुण, वृद्ध पांच पांचशे मैलावरुन पंढरपूरला चालत येताहेत. ही जी देहातून त्यांची बुद्धी बाजूला जाली ती कशाने झाली? देहामध्येच बुद्धी राहिली असती तर घरदार सोडून ते बाहेर पडलेच नसते. कांही कांही जणांचे असंही सांगतात, शुद्धातल्या एकादशीला पंढरपूरला येऊन दर्शन घेऊन निघायचे आणि वद्य एकादशीला आळंदीला जायचे. असे बारा महिने चालू आहे. अशीही कांही तपस्वी मंडळी आहेत. ही तपोनिष्ठ कशी तयार झाली? देहाची आसक्ती जर मनामध्ये असती तर हे शक्यच झालं नसतं.

आचार्य महाराज संचार करताहेत. शास्त्राचा खरा अर्थ काय आहे हे सर्वांसमोर त्यांना ठेवायचंय. अज्ञान हा मोठा दोष आहे. लोकांचे अज्ञान दूर करायचे हा पहिला प्रयत्न आहे. श्रद्धा नसणे हा दुसरा दोष आहे. श्रद्धा असली तरी संशयामुळे ती डळमळीत होते. तो संशय दूर केला पाहिजे. म्हणजे वाणीमध्ये, बुद्धीमध्ये अलौकीक शक्ती असली पाहिजे. त्या शक्तीशिवाय बुद्धीतले सर्व दोष दूर करुन

योग्य मार्गावर स्थिर करण्याचे कार्य करता येत नाही.

आचार्य संचार करीत एका गांवात आले. तिथे एक भैरवाचा तांत्रिक भक्त होता. आचार्यांबरोबर झालेल्या वादविवादात त्याचा पराजय झाला. तंत्रमार्ग योग्य नाही हे आचार्यांनी त्याला पटवून दिले. सर्व मंडळींच्या समोर त्याचा मार्ग चुकीचा आहे हे सिद्ध झाल्यावर त्याला कांही बोलता आले नाही. तेवढ्या पुरतं त्याने कबूल केला पराभव. पण त्या उग्रभैरवाच्या मनांत मात्र आचार्यां बद्दल द्वेषबुद्धी निर्माण झाली. आज भर सभेमध्ये माझ्या अनुयायांसमोर ज्या आचार्यांनी माझे खंडन केले त्यांचा नाश केला पाहिजे. अशा प्रकारची सूडबुद्धी त्याच्या मनांत उत्पन्न झाली. दोन चार दिवसांनी आचार्य महाराज एकटे बसले असतांना तो त्यांना भेटून म्हणाला, गुरु महाराज, मी एक भैरवाचा यज्ञ केला आहे. त्यात पूर्णाहूति देण्यासाठी मला एक तर सर्वज्ञ पुरुषाचे तरी मस्तक पाहिजे किंवा सार्वभौम राजाचे तरी मस्तक पाहिजे. ते जर दिले तर मला याच देहाने भैरवलोकाला जाता येईल. आता सार्वभौम राजाचे मस्तक मागितले तर तत्क्षणी माझेच मस्तक जाईल. आपण सर्वज्ञ आहात. आपलं मस्तक मिळालं तर माझं कार्य होईल.''

देह म्हणजे मी नाही हे आचार्यांचे ज्ञान नुसते सांगण्यासाठी नाहीये. देहात्मविवेक प्रथमच भगवंतानी अर्जुनासमोर ठेवला. देह म्हणजे आत्मा नाही हे समजून घेऊन गीता ऐक तरच तुला या गीताज्ञानाचा उपयोग होईल, म्हणाले.

आचार्यांनी त्या उग्र भैरवाला सांगितले, ''उद्या मी अमूक अमूक गुहेमध्ये जाऊन बसतो. कोणालाही समजणार नाही अशारीतीने तूं माझं मस्तक तोडून घेऊन जा.'' त्या प्रमाणे दुसऱ्या दिवशी सांगितलेल्या ठिकाणी कोणालाही न सांगता आचार्य समाधी

लावून बसले. उग्रभैरवाने विचार केला आपल्या तंत्रमार्गावर आलेले संकट आचार्यांचा नाश केला म्हणजे दूर होईल. आचार्यांचा शिरच्छेद म्हणजे ज्ञान नाश नाही हे त्या उग्रभैरवाला कळले नाही.ज्ञान हे बुद्धीमध्ये आहे आणि बुद्धी ही नष्ट होणारी नाहीये. आत्मज्ञान होईपर्यंत बुद्धी बरोबर राहाते. शरीरं किती येतात आणि जातात पण बुद्धी कायम आहे जीवाबरोबर . ही कायम राहाणारी बुद्धी किंवा अंत:करण तत्व ज्याला म्हणतात ते चांगलं बनवण्याचा प्रयत्न जर मनुष्यजन्मामध्ये केला गेला तर ती चांगली बुद्धी पुढच्या जन्मात आपल्याबरोबर येते. गजेंद्रमोक्षाच्या कथेत हत्ती देवाची स्तुती करतो यावर आमचा विश्वास बसत नाही. हत्ती पशु आहे तो देवाची स्तुती काय करणार? पण त्याच्या मागच्या जन्माचा विचार केला पाहिजे. मागच्या जन्मात त्याने ईश्वराची उपासना केली होती त्यामुळे या जन्मात त्याच्या मनामध्ये इतकी ईश्वरभक्ती निर्माण झाली. आपल्या स्तुतीच्या आरंभी तो म्हणतो, संपूर्ण विश्वामध्ये भरुन राहाणारा, सर्व प्रेरक अशा प्रकारचा जो आहे परमात्मा त्याला मी नमस्कार करतो. तत् पदार्थ शुद्धी ज्याला म्हणतात ती त्यांची झाली आहे. इतक्या मोठ्या ज्ञान भूमिकेवर तो गेला असेल हे आम्हाला खरं वाटतं नाही. कारण आम्ही त्याच्या देहाकडे पाहून त्याला पशु समजतोय. देह म्हणजे आत्मा नाहीये. देहात आलेला आत्मा. मागच्या जन्मांत हा हत्ती चांगला राजा होता. आपल्या अंत:करणावर त्याने चांगले संस्कार केले. ईश्वराबद्दल एक दृढ निष्ठा त्याच्या अंत:करणामध्ये उत्पन्न झाली. ते अंत:करण घेऊन तो या हत्तीच्या जन्माला आला.

अर्थात् परमेश्वराची स्तुती करणं हे त्याच्या बुद्धीचे कार्य आहे. शरीराचे कार्य नाही. आचार्य महाराजांना मारण्यासाठी जेव्हां तो

उग्रभैरव निघाला तेव्हां पद्मपादाचार्य नृसिंहांचे ध्यान करीत होते. त्यांची उपासना इतकी सिद्ध झाली होती की ध्यानामध्ये त्यांच्या उपास्य देवतेशी - नृसिंहांशी - ते इतके एकरुप होत की नृसिंहरुप होऊन जात. बुद्धी इतकी स्थिर व्हायला पाहिजे की ज्या वस्तूचे ध्यान करु तद्रुप होता आले पाहिजे. पद्मपादाचार्यांना त्या ध्यानावस्थेत आचार्यांचा वध करण्याच्या तयारीत असलेला उग्रभैरव दिसू लागला. आणि पद्मपादाचार्यांचे शरीर नाहीसे होऊन ते नरसिंहस्वरुप झाले आणि धांवत धांवत त्या गुहेत गेले त्या उग्रभैरवाला आचार्यांचा शिरच्छेद करण्यापूर्वीच त्याला गाठले, खाली पाडले आणि हिरण्यकश्यिपूप्रमाणे त्याचे पोट फाडले. तोंडाने मोठमोठ्याने गर्जना चालू होती. तोपर्यंत आचार्यांचे इतर शिष्यही आले. त्यांना पद्मपादाचार्य दिसेनात नृसिंह दिसत होते. आचार्यांची समाधी उतरली आचार्यांनी नृसिंहाची स्तुती केलेली आहे.

थोड्या वेळाने नृसिंहस्वरुप अदृष्य होऊन पद्मापादाचार्य दिसू लागले. त्यांनी आपल्या गुरुमहाराजांना वदंन केले. काय प्रत्यक्षात घडले याची त्यांना आठवणही नव्हती. हा एक प्रयत्नाचा, अभ्यासाचा विषय आहे. बुद्धीमध्ये अगोदर ईश्वरस्वरुपाबद्दल अत्यंत निष्ठा पाहिजे. प्रथम आस्तिक्य बुद्धी पाहिजे. आस्तिक्य बुद्धी झाल्यानंतर प्रयत्न घडणार. प्रयत्नसुद्धा दीर्घकाळपर्यंत करायला पाहिजे. ज्या मनामध्ये ईश्वराचे अधिष्ठान ठेवायचे ते मन निर्मल व्हायला पाहिजे. मगच ते ईश्वरस्वरुप त्या मनांत कायम राहाणार. ते मन अत्यंत स्थिरही पाहिजे. त्या करताही प्रयत्न करावा लागतो ना ! चार सहा वर्षांचा महाविद्यालयाचा कोर्स निराळा आणि हा अभ्यास निराळा. एवढ्या लहान कालावधीच्या कोर्समध्ये हा अभ्यास कसा पूर्ण होईल?

**सुखेषु अनुद्विग्नमन: दु:खेषु विगतस्पृह:**

गीतेच्या ह्या अर्ध्या श्लोकाचा अभ्यास करायला सहा वर्षांचा काल पुरेल काय? कोणचीही अनुकूल गोष्ट घडली असतांना मनाला आनंद होत नाही आणि प्रतिकूल गोष्ट घडली असतांना मनाला विषाद वाटत नाही, इतकी मनाची निर्विकारता साधायला किती दिवस अभ्यास करायला पाहिजे ! तेवढी आमच्या मनाची तयारी आहे का? हर्ष, विषादादि सगळे विकार मनांतून दूर झाले पाहिजेत.

**मानापमानयोस्तुल्य:**

ही मनाची निर्विकार, साम्य स्थिती यायला किती काल पाहिजे ! तो अभ्यास करताना येणारी सगळी विघ्नही दूर करणारी कोणी तरी शक्ती आपल्या पाठीशी नको का? त्या शिवाय आपला अभ्यास यशस्वी कसा होणार? म्हणून या सगळ्या दृष्टीने 'त्वमेव शरणं गच्छ' म्हणतात भगवान्. त्या ईश्वरालाच तूं शरण जा. दुसरीकडे जाऊ नकोस. दुसरे कोणीही तुझे संरक्षण करु शकणार नाही. गजेंद्राने पुष्कळ स्तुती केली पण एकही देव त्याला सोडवण्याकरता आला नाही. काय बाकीच्या देवांना त्याची सुटका करता आली नसती? भगवान् श्रीहरिच आले शेवटी. कारण बाकीचे ब्रह्मा, इंद्रादि देव म्हणाले, आमचे नांव घेऊन कुठे गजेंद्राने बोलावलंय? आम्हाला कुठे हांक मारली आहे? मग आम्ही कशाला जावं?

म्हणजे इंद्रादि देव सुद्धा जीवंच आहेत. ईश्वर नाहीयेत. त्यांनासुद्धा ईश्वर साक्षात्कार झालेला नाहीये. कांही कांही देवयोनीमध्ये आलेले महात्मे आहेत. यमधर्म आहेत. इंद्र, वरुण आहे असा उपनिषदांमध्ये उल्लेख आहे. पण सर्वसामान्य अशी स्थिती आहे. तर भगवान् सांगताहेत, त्या ईश्वरालाच तूं शरण जा. अंतर्यामी आहे तो. बुद्धीला प्रेरक शक्ती आहे तिकडे तूं लक्ष दे.

तुझ्या मनामध्ये पुष्कळ शक्ती आहे. ते मन जर ईश्वराकडे वळवून स्थिर केलंस तर त्या मनात मोठी शक्ती निर्माण होईल. मनाला स्थिर करणं हीसुद्धा मनाचीच शक्ती आहे. मनाला जास्ती जास्ती विकारी बनवण्याकडे मनाची प्रवृत्ती असते. तोच अभ्यास झाला म्हणजे विकार जास्ती जास्ती वाढत जातात. मनाला निर्विकार करणं, सद्विचारशील बनवणं यासाठी मनानेच प्रयत्न केला पाहिजे ना ! नुसता उपदेश ऐकून पुस्तक वाचून हे कसे होणार?

भरताला, रामचंद्र राज्य कर म्हणून स्वत: सांगताहेत व ते कर्तव्य आहे. मला पित्याने वनांत जाण्याची आज्ञा केलेली आहे. तुला पित्याचे वचन उल्लंघन करुन माझ्या बरोबर वनांत येता येणार नाही, राज्य सोडता येणार नाही. भरताची बुद्धी निर्मल असल्यामुळे त्याने रामचंद्रांची आज्ञा मान्य केली. रामचंद्रांच्या पादुकांची सिंहासनावर स्थापना केली. पादुकारुपी रामचंद्र हे स्वामी आहेत. मी फक्त त्यांचा सेवक आहे. ही भावना आहे. भरताने रामचंद्र वनवासात जायला निघाल्यावरच सांगितले, '' फक्त चौदा वर्षे मी राज्य करीन. तुमची आहे. पित्याची आज्ञा आहे म्हणता. पंधराव्या वर्षाचा सूर्योदय होईपर्यंत भरत जिवंत राहिल. पुढे नाही. भरत तुम्हाला दिसणारच नाही.''

आईने मिळवून दिलेले राज्य भरताच्या हातात आहे तरीसुद्धा सुरवातीपासूनच त्याची भूमिका होती, राज्य माझे नाहीये. त्यामुळे चौदा वर्षानंतर रामचंद्र आल्यावर लगेच त्यांचे राज्य त्यांना देऊन टाकले आणि नमस्कार करुन उभा राहिला. ही निर्मल बुद्धी प्राप्त होण्यासाठी किती अभ्यास करावा लागेल, किती कठीण आहे तो अभ्यास.

महाभारतकारांनी दुर्योधनाचेही चरित्र लिहीले. त्यानेही असेच

पांडवांना तेरा वर्ष वनवासात पाठवले. परत आल्यावर आपल्याला त्यांना अर्धे राज्य दुर्योधनाने सांगितले, सुईच्या टोकावर राहील एवढीसुद्धा जमीन तुम्हाला युद्धाशिवाय देणार नाही. म्हणजे किती गुंतून गेलाय दुर्योधन ! त्याग नाहीच त्या बुद्धीमध्ये. त्यागाचा अभ्यासच नाहीये. दुर्योधनाचे चरित्र सांगून त्याग कसा नसतो आणि भरताचे चरित्र सांगून त्याग कसा असतो असे दोन्हीं दाखवले आहे.

रघुवंशात कालीदासांनी वर्णन केले आहे भरताच्या त्यागाचे. रामचंद्र आलेले आहेत रावणादिकांचा नाश करुन. भेटी झालेल्या आहेत. भरताने रामचंद्रांनाही नमस्कार केला आणि सीतादेवींच्या पायावर मस्तक ठेवले. त्यावेळी कालीदास विचार करताहेत, सीतादेवींचे चरण पवित्र आहेत की भरताचे मस्तक पवित्र आहे. काय हे जनकात्मजा जानकीदेवीचे चरण किती वंद्य आहेत. लंकेश्वर मोठा पराक्रमी राजा. सर्व आधिभौतिक शंक्तींचा विकास त्याने करवून घेतला होता, तो सीतादेवींना म्हणतोय, ''माझी राणी हो'' - नाही. सीतादेवींचे त्याच्याकडे लक्षही नाहीये. भाषणही करीत नाहीयेत. अशी सीतादेवींचे चरण वंद्य आहेत.

आपल्या जेष्ठ बंधू वनवासात गेला आहे. त्याला अन्नपाणी नीट मिळत नसेल तर आपणही घेऊ नये असे त्याला वाटते. सर्व राज्य ताब्यामध्ये आहे पण कोणच्याही विषयाचा उपभोग घ्यायचा इच्छा नाही. पण राज्य कारभार उत्तम चाललाय. हाच खरा आणखी कर्मयोग आहे. हेच खरं ज्ञान आहे. त्याग आहे, अंत:करणामध्ये. मी फक्त निमित्तमात्र आहे. माझं कांहीही कर्तृत्व नाही. मी राज्य कर्ता नाही. कालीदास म्हणतात, जेष्ठाची अनुवृत्ती करावी. जेष्ठ बंधू जटा धारण करुन वनांत गेला तर आपणही जटा धारण करायच्या, आपणही अन्न खायचे नाही. हेही वंद्य आहे. पण निर्णय काय

करायचा? शेवटी कालीदासांनी असा निर्णय दिला की जानकीच्या चरणांनी भरताचं मस्तक पवित्र केलं म्हणा किंवा भरताच्या मस्तकाने जानकीचे चरण पवित्र केले म्हणा. श्रेष्ठ कनिष्ठ निर्णय देणं शक्य नाहीये. इतका त्याग त्या भरताच्या पवित्र बुद्धीमध्ये आहे. देहाची आस्था नाही. देहाची आसक्ती नाही. सत्ता नको. आपला जेष्ठ बंधू आपला स्वामी आहे हे जाणणारी बुद्धी आहे. त्यामुळे अशी त्यागी वृत्ती बनू शकते. चौदा वर्षांची राजसत्ता लगेच सोडून दिलेली आहे. राष्ट्राला कल्याण करणारा आदर्श नेता कसा मिळाला पाहिजे हे दाखविण्याकरता वाल्मिकी महर्षींनी रामायण लिहीले.

पण आता ते कोण वाचतंय? बुद्धीस्वातंत्र्याचा उपयोग रामायणावर आक्षेप घेण्यासाठी, राम, सीतेची निंदा करण्यासाठी त्यावर विपरित लेख लिहिण्यासाठी चाललाय. त्याबद्दल कोणालाही प्रतिकार करायची बुद्धी नाही. दामाजीपंतांचे उदाहरण बुद्धी स्वातंत्र्याचेच उदाहरण म्हणून घ्यायला हरकत नाही. दुष्काळात सांपडलेली माणसे धान्य मागायला आली त्यांचा प्राण जातोय. त्यांना काय सांगायचं? खलीता पाठवतो बादशहाला आणि त्याचे उत्तर आले की देतो? तो पर्यंत हे लोक जिवंत राहातील का? दामाजीपंत म्हणाले, सगळं धान्य घेऊन जा. काय होईल ते होईल. पण आधी प्रजाजन जगले पाहिजेत ना ! आपण करतोय ते कर्म अत्यंत योग्य आहे असा बुद्धीने निर्णय दिला ह्याला बुद्धीस्वातंत्र्य म्हटले पाहिजे. परंतु त्यांच्या सगळ्या धान्याचे बिल दिले गेले. त्यांच्या पोथीमध्ये बादशहाची पावती मिळाली. तुमचं सगळं बिल आम्हाला मिळालेलं आहे. तुमच्याकडे काही देणे नाही. असं कसं झालं? बुद्धीचा संकल्प ईश्वरशक्तीशी एकरुप झाली तर अशक्य कांहीच नाहीये. अंत:करणशक्तीही मोठी आहे. ईश्वरानेच अंत:करण निर्माण केलंय

ना ! ही बुद्धीशक्ती म्हणजे भक्तीचेच एक स्वरुप आहे.

***या देवी सर्व भूतेषू बुद्धीरूपेण संस्थित: ।***
***नम: तस्यै नम: तस्यै नम: तस्यै नमो नम: ।।***

बुद्धी हे भगवतीचेच स्वरुप आहे असे सांगताहेत मार्कंडेय ऋषी. बुद्धीवाद कमी मानणारे नाहीयेत ऋषी ! पण त्यांचं म्हणणं एवढंच आहे की बुद्धी चांगली बनवून अभिमान धरा. निर्दोष बुद्धी करा. त्या बुद्धीने वाटेल ते कार्य करता येईल. पण सर्व सामान्यांची बुद्धी निर्दोष नाहीये. पदोपदी अहंकारादि विकार, कामक्रोधादि विकार भरलेले आहेत. लोभामुळे अखंड पापं घडताहेत. म्हणून ज्ञानेश्वर महाराजांच्यासारखे प्रार्थना करताहेत.

***दुरितांचे तिमिर जावो ।***
***विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ..... भूता परस्परे जडो मैत्र जीवांचे ।***

हे राष्ट्राला उपकारक नाही का? केलं पाहिजे ना ! वैयक्तिक, सामाजिक पातकांचा नाश झाल्याशिवाय स्वधर्माचे ज्ञान, आचरण होणार नाही.

जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात। – इतकं त्यांनी आश्वासन दिलेले आहे. तिकडे कुणाचे लक्ष आहे? केवळ अर्थकारण प्रधान बुद्धी आमची बनून गेलेली आहे. त्याला राजशासनाचीच अनुकूलता आहे. राजशासनाने धर्माची उपेक्षा करुन कसे होणार? संत महात्म्यांनी घालून दिलेले मार्ग आहेत. ईश्वराची भारतवर्षावर कृपा दृष्टी आहे. म्हणून थोड्या फार अंशाने कांही तरी अद्यापि जिवंत आहे. तर त्या दृष्टीने – त्वमेव

***शरणं गच्छ सर्व भावेन भारत : तत् प्रसादात...***

ज्ञानेश्वर महाराजांचा ग्रंथही त्याच्यावरच आहे. ज्ञानेश्वर महाराजांनीही गीतेचं सगळं सार आपल्यापुढे मांडलेले आहे. हे ग्रंथ म्हणजे त्यांची

संगतीच आहे. प्रत्यक्ष ज्ञानेश्वर महाराजांच्या संगतीत राहाण्याइतके आमचे भाग्य कुठे आहे? त्यांचे ग्रंथ हेच त्यांचे स्वरुप आहे. त्या स्वरुपाची संगती जर आपल्याला मन:पूर्वक घडली, आपलं मन निर्दोष व्हावं अशी तळमळ मनाला लागून राहिली तर त्यानेही कार्य होऊ शकते. अशा ग्रंथांचा अभ्यास झाला, त्यांचे मनन झाले तर ते ज्ञान दृढ होतं आणि त्या ज्ञानाचं फलही आपल्या पदरात पडतं. त्या करता अशा प्रकारचं श्रवण, मनन, निदिध्यासन अखंड चालू राहिले म्हणजे कार्य होते. आपली बुद्धी निर्मल, निर्विकार बनवणं हा बुद्धी विकास आहे. हा बुद्धीचा विकास कसा करायचे हे ज्ञानेश्वर महराजांनी पसायदानामध्ये समजावून सांगितले आहे.

ते कार्य आपण करता आहात. ईश्वराची तुमच्यावर कृपा आहे. चांगली बुद्धी आहे. अंतर्यामी भगवान् पांडुरंग जो आहे त्याच्या कृपेने हे अशा प्रकारचे कार्य भारतवर्षामध्ये चालू आहे. असाच भारतीयांचा बुद्धी विकास परमेश्वराच्या कृपेने घडून यावा, सर्वांना शांती, सौख्य, समाधान प्राप्त व्हावं एवढीच त्या अंतर्यामी परमेश्वराजवळ प्रार्थना करुन ही सेवा पूर्ण करतो.

***पुंडलिक वरदा हरि विठ्ठल***
***श्रीज्ञानदेव तुकाराम***
***मंगलमूर्ती मोरया***
***यन्नामस्मरणादैन्यम् पापंतापश्चनश्यति ।***
***भीतीग्रहार्ति दु:स्वलां दत्तात्रेय नमामित्वम् ।।***

आज गुरुमहाराजांची जयंती आहे. गुरु गौरव या दृष्टीने शास्त्राचे उत्तम श्रवण, मनन ज्यांचे झालेले आहे असे श्रेष्ठ, विद्वान -- त्यांचे गुरु गौरव या विषयावर प्रवचन ऐकले.

ज्ञानेश्वर महाराज गुरु गौरव कसा वर्णन करतात हेही त्यांनी

प्रतिपादन केले. सर्वही संत मंडळी अखंड सद्‌गुरुंचे स्मरण करु शकतात. ईश्वराचे पूर्ण दर्शन व्हायचे म्हणजे फार कठीण आहे. मूर्तीमध्ये ईश्वर आहे ही आपली भावनाही कांही वाईट नाही. पण ईश्वर सर्वत्र भरुन राहिलेला आहे हे ज्ञान होण्याकरता पांडुरंगांनी नामदेवांना गुरुंच्याकडे पाठवले ही कथा सर्वांना माहित आहे. ईश्वराचे परिपूर्णत्व पहाणाराही ईश्वररुप होऊन जातो. हे अध्यात्मामध्ये फार मोठे आहे. बाकीच्या ज्ञानामध्ये ज्ञाता आणि ज्ञेय वेगळे राहाते. पण इथे ज्ञाता आणि ज्ञेय एक होऊन जाते. ही सद्‌गुरुंची कृपा आहे.

प्रवचनें करणारे श्रेष्ठ पुरुष ह्यांचा विशेषरुपाने समाजाला फार मोठा उपयोग आहे. गुरुमहाराजांच्या कृपेने त्यांच्यासारख्यांचे प्रवचन आपणासर्वांना ऐकायला मिळाले. ज्ञानराजांनी गुरुभक्तांची, साधकांची लक्षणे सांगितली आहेत तशी आपण आपली बुद्धी बनवायची. प्रयत्न कुठपर्यंत करायचा आणि शेवटी गुरुकृपाच कशी फलदायी आहे हे त्यांनी स्पष्ट करुन सांगितले. तेव्हां त्यांच्या द्वाराने गुरुमहाराजांच्या कृपेने गुरुगौरव काय आहे हे ऐकायला मिळाले. ते आपल्या लक्षात रहावं. त्यांच्या द्वाराने समाजामध्ये बुद्धीशुद्धी व्हावी एवढीच सद्‌गुरुमहाराजांच्या जवळ प्रार्थना करु.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥**

**येऊर ३०.१.९४**

*यन्नामस्मरणादैन्यम् पापंतापश्च नश्यति ।*
*भीतीग्रहार्ती दु:स्वप्नम् दत्तात्रेय नमामित्वम् ॥*

वसिष्ठ महर्षींनी भगवान रामचंद्रांना केलेला उपदेश मिळालेल्या काळामध्ये उत्तम विवेचन आपण आत्तापर्यंत ऐकले. लोकमान्यानी कर्मयोगाचा पुरस्कार केला. आपण ***ह्या कर्मयोगापासून फार बाजूला झालेलो आहोत. प्रयत्नवाद आम्हाला नाहीये. चांगलं वाईट हे कळतही नाही. चांगल्या लोकांनी सांगितल्याप्रमाणे वागण्याची बुद्धी आपल्याला होत नाही. त्यामुळे निराशावस्था आपल्याला आलेली आहे. भारताची पुढे काय अवस्था होणार आहे हे जाणून लोकमान्यांनी कर्मयोग म्हणजे प्रयत्नवाद आपल्यापुढे ठेवला. लोकांनी एकत्र यावे म्हणून त्यांनी कांही उत्सव सुरु केले. समर्थांनीसुद्धा ''सर्वां मुखी मंगल बोलवावे'' हा प्रयत्नवाद सांगितला आहे.***

***एकट्याने प्रयत्न करुनही उपयोग नाहीये. प्रयत्नवादाचे फल हे आपल्याला निश्चित प्राप्त होते. असा वसिष्ठ महर्षींचा सिद्धांत आहे.*** ज्ञानेश्वरीमध्ये ज्ञानेश्वरांनी वेगळे वेगळे उपदेश करुन मार्गदर्शन केलेले आहे. पण राष्ट्राला उपकारक असे मार्गदर्शन त्यांनी शेवटी पसायदानामध्ये केलेले आहे ते लक्षांत ठेवण्यासारखे आहे. ***भूता परस्परे जडो मैत्र जीवांचे । – हे कांही व्यक्तीकरता मागितलं नाही देवाकडे. परस्परांची मैत्री असली पाहिजे, ऐक्य असले पाहिजे. दुसऱ्याला त्रास झाला, माझा काय संबंध आहे, अस समजून बाजूला होऊन उपयोग नाही. परस्परांबद्दल मैत्री, ऐक्य भावना असेल तर राष्ट्राची उन्नती सहज होऊ शकते हे ज्ञानराजांनी सूचित केले आहे.***

***ज्ञानेश्वरीचे वाचन करण्याला – एक तरी ओवी अनुभवावी !***

*– हा अनुभव येतो. त्याच्यावर ईश्वराची कृपा होते. शास्त्र हे ईश्वराची आज्ञा आहे. शास्त्रज्ञाप्रमाणे प्रयत्न करावा . तसे आपण करु लागल्यावर आपल्या बुद्धीला गोंधळ निर्माण करणारी मंडळीही आहेत, ज्यांच्या स्वत:च्या बुद्धीत गोंधळ निर्माण झालेला असतो अशी. कोणचाही साम्यवाद बुद्धीतले वैषम्य दूर करु शकत नाही. ते बुद्धीतले वैषम्य कायम राहाणारे आहे. संस्था गेल्या, पक्ष निर्माण झाले. हे पक्ष तरी किती अस्थिर आहेत. आज एक पक्ष उद्या दुसरा पक्ष. म्हणजे बुद्धीची अस्थिरताच ह्या रुपाने आपल्या समोर येते आहे. बुद्धीची स्थिरता झाली पाहिजे. आणि योग्य प्रयत्न जर आपल्या कडून झाला तर त्याचे निश्चित फल प्राप्त होते.*

देणे ईश्वराचे देणे ईश्वराचे । – म्हणून समर्थांनी सांगितले आहे. प्रयत्नाला लागल्यानंतर ईश्वर सगळं देतो.

मान्यवर भगवंतराव वेगळे वेगळे उत्सव करतात. समाजामध्ये उत्साह निर्माण व्हावा समाजाची जडावस्था दूर व्हावी, आपल्याजवळही कांही सामर्थ्य आहे हे लोकांना कळून याये आणि उत्साहाने प्रयत्न करुन यशस्वी व्हावे हाच ह्या सगळ्याचा उद्देश आहे. याप्रमाणे योगवासिष्ठाचे थोडक्यात सार त्यांनी आज सांगितले. वसिष्ठ महर्षींनी रामचंद्रांना हा प्रयत्नवाद शिकवलेला आहे. राजा निराश झाला तर प्रयत्न काय करणार. सगळ्या समाजाचे नियंत्रण राजाच करतोय. म्हणून वसिष्ठ महर्षींनी राजाची बुद्धी शुद्ध केली. राजाच्या बुद्धीची सुधारणा झाली की समाजाची आपोआप सुधारणा होते.

तेव्हां या प्रकारचे ग्रंथ आपल्यामध्ये आहेत. अनेक संतमहंतांनी पुष्कळ महत्त्वाचे सिद्धांत आपल्या ग्रंथातून मराठी भाषेत मांडलले

आहेत. नुसता मराठी भाषेचा अभिमान बाळगून काय उपयोग आहे. आपलं अंत:करण संतांच्या मार्गदर्शनाप्रमाणें आचरण करण्याकडे प्रवृत्त झालं पाहिजे. त्या ग्रंथांवर विश्वास उत्पन्न झाला पाहिजे. ग्रंथांचा उपयोग खरा आहे आणि ग्रंथांच्या उपदेशाप्रमाणे वागून आपण आपल्या प्रयत्नाचे फल मिळवायला पाहिजे हा एक महत्त्वाचा उपदेश योगवासिष्ठातून घेऊन सांगितला.

एका दृष्टीने हा प्रयत्नवाद आज राष्ट्राला उपयुक्त आहे. राष्ट्राला हा पाहिजे आहे. शिवाजीराजांनी प्रतिकूल परिस्थितीत प्रयत्न केला. परंतु तो शुद्ध बुद्धीने प्रयत्न केला. त्यांनी वासुदेवशास्त्रींचे उदाहरण सांगितले. ते फार मोठे मर्मज्ञ होते, शास्त्रज्ञ होते. निर्णयसागरचं सगळं कार्य त्यांच्या देखरेखीखाली चाललं होतं. निर्णयसागरने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकामध्ये अशुद्ध नाही हे सगळ्यांना माहीती आहे. ते होते तो पर्यंत शुद्ध छापायचे अगदी. प्रयत्नवादच आहे हा. आपलं कर्तव्यकर्म केलं पाहिजे. हे प्रत्येकाला वाटलं पाहिजे. फलाचा त्याग हे फार कठीण आहे.

तेव्हां हे आजचे प्रवचन मनाला उत्साह देणारे अशा प्रकारचं त्यांनी केलेलं आहे. त्यांच्या अभ्यासामुळे अशा प्रकारचे मार्गदर्शन सर्वांना होत राहिल. तरुण पिढीलाही आणखी कांही तरी विचार करण्याची बुद्धी उत्पन्न होईल. या प्रकारे त्यांच्याकडून हे कार्य होत राहावं. एवढीच आणखी सर्वांतर्यामी बुद्धी प्रेरक परमेश्वराचरणी प्रार्थना आहे.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥**

***स्थावरं जंगमं व्याप्तं यत्किंचित्सचराचरम् ।***
***तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नम: ॥***

ईश्वर कृपेने कोणचाही काळ असला तरी संत महात्म्यांचं जीवांचा उद्धार करण्याच कार्य अखंड चालू आहे. हिरण्यकश्यिपूच्या काळात नारद महर्षींसारखी सात्विक प्रवृत्तीची मंडळी कार्य करीतच होती. त्यांना कांही हिरण्यकश्यिपूची भीती वाटत नव्हती. लोकांना मार्गदर्शन करुन ईश्वरकृपेस पात्र करायचे हे कार्य दैवी संपत्तीसंपन्न ताई दामलेंसारख्यांकडून आजही चालूच आहे. ताईंच्या संकल्पाप्रमाणे हा उत्सव गेली २०-२५ वर्षे चालू आहे. या वर्षीच्या उत्सवाला आपण सर्व मंडळी इथे नरसोबावाडीला आलात.

हे स्थान भगवान नरसिंह सरस्वतिस्वामीमहाराजांच्या वास्तव्याने अत्यंत पवित्र झालेले आहे. कृष्णा पंचगंगेचा संगम असलेले हे स्थान आहे. मनोहर पादुकांच्या रुपाने भगवान नरसिंह सरस्वती महाराज या ठिकाणी आहेत.

ईश्वराबद्दल मनामध्ये प्रेम, श्रद्धा उत्पन्न व्हावी अशी संत महात्म्यांची इच्छा आहे. त्याकरता नारदांच्या सांगण्यावरून व्यासमहर्षींनी मुद्दाम भागवत महापुराणाची रचना केली. नारदांनी व्यासांना, ''सर्वांच्या पुढे भक्तीमार्ग तुम्ही ठेवा'' असे सांगितले त्यामुळे हा ग्रंथ तयार झाला आहे.

आज सकाळी सर्व महिला मंडळींनी कृष्णामातेची पूजा केलीत. सौभाग्यदान केलत. कृष्णा माता म्हणून एक देवता आहे.

विष्णु स्वरूप आहे. विष्णुंनीच कृष्ण हे रुप धारण केले आहे. सर्व देवांनी निरनिराळ्या नद्यांची रुपे धारण केली. त्यात कृष्णामाई म्हणजे साक्षात विष्णुचा अवतार आहे. भगवान दत्तात्रेय अवतारही विष्णुचा अवतार आहे. नरसिंह सरस्वतिही त्यांचाच अवतार आहे.

आणि कृष्णरुपानेही भगवान इथे आले आहेत. तेव्हां मनामध्ये ही एक श्रद्धा, विश्वास धारण करुन आपण सर्वांनी या कृष्णामातेला वस्त्र समर्पण करण्याचे मोठे प्रत्यक्ष पहाण्यासारखे शास्त्रीय कर्म आपण सर्वांनी केलेत. शास्त्राने सांगितल्याप्रमाणे कांही तरी प्रतीक पाहिजे ना।

*चतुर्बाह: श्रीमत्सजलजलदश्यामलतनु: ।*
*प्रकाशशब्दक्त्रेन्दु: सदुडुगणमुक्तावलिरपि ।।*
*तडिव्दासा भास्वत्सुतिलकलकन्मौरिघहृत् ।*
*क्षमाध्रस्य हयत्रेरपि जयति सूनु: स्वहितकृत् ।।*

कृष्णा लहरीच्या या पहिल्या श्लोकात सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांनी दत्तात्रेयांची आणि कृष्णामाईची प्रार्थना केली आहे. चतुर्बाहू श्यामवर्ण असणारी विजेप्रमाणे झळाळणारे वस्त्र परिधान केलेली कांतीमान कुंकूमतिलक भालपटलावर असणारी अशी ही कृष्णामाई आहे.

हे प्रवाहरुप आहे. कुठे पादरुप आहे तर कुठे मध्य भाग आहे. आणि शेवटी परब्रह्मरुप कृष्णादेवी आहे असे या स्तोत्रामध्ये सांगितलेले आहे. निर्गुण निराकार, सत्‌चित्‌ आनंदघन असे जे परमात्म स्वरुप आहे तेही कृष्णा देवीच आहे. आणि त्यातही प्रवाहरुपही साकाररुपच आहे. पण मानवांना पहाता यावं म्हणून चतुर्भुजरुपही धारण केले आहे.

आपल्या संस्कृतीमध्ये आधिदैवी विभाग म्हणून मुद्दाम सांगितला आहे. ईश्वराचे अस्तित्व मान्य करण्यास, ईश्वर भक्ती काया वाचा मनाने करण्यास वेळ लागतो. शरीरात असणारा जीवात्मा अहम्‌ म्हणून आहे त्याच्याबद्दल किती गोंधळ आहे. देहापासून सुरवात आहे. देहालाच आत्मा समजून आपण सगळे व्यवहार करत

असतो. देहापेक्षा तो निराळा आहे. पण तो निराळा कसा आहे? इंद्रियांना आत्मा म्हणायेच की मनाला? शरीराचे कार्य तर सगळ्यांकडून चाललेले आहे. शरीरामध्ये राहाणारा जो अहम् आहे तो कळायला किती तरी वेळ लागतो आहे. मग ईश्वर स्वरुप समजून यायला तर किती तरी वेळ लागेल. जरी साकार रुप धारण केले तरी त्याचे दर्शक व्हायला किती तरी सुकृताची आवश्यकता आहे. मनामध्ये तशी तळमळ उत्पन्न व्हायला लागते.

ज्ञानेश्वर महाराज आहेत आज. ते कांही देहत्याग करुन गेलेले नाहीत. योग सामर्थ्यांने त्यांनी आपल्या प्राणवायुचा निरोध केलेला आहे. जो पर्यंत शरीरामध्ये प्राणवायू असतो तो पर्यंत शरीराचा नाश होत नाही. पण प्राणवायूबरोबर इतर ज्ञानेंद्रियांना बरोबर घेऊन देहाच्या बाहेर जाण्याचे सामर्थ्य त्यांच्याकडे आहे. योगी महात्मे अशा रीतीने योग सामर्थ्याने सूर्यमंडळाद्वारे ब्रह्मलोकापर्यंत जाऊ शकतात. कुठेही फिरु शकतात असे उपनिषदामध्ये वर्णन आलेले आहे. परंतु कुंभक करुन (प्राणवायू स्थिर करुन) आत्मानंदामध्ये निमग्न झालेल्यांना शरीराचा कांही संबंधच नाही.

ज्ञानेश्वरमहाराजांच्या कंठाला वृक्षाचे मूळ लागले आणि यांनी नाथमहाराजांना दृष्टांत देऊन ते काढून टाकण्यास सांगितले त्याप्रमाणे नाथमहाराजांनी समाधी उघडून ते कापले. असे आपण ऐकतो. त्यांना ज्ञानेश्वर महाराजांचे दर्शन झाले. आपल्याला त्यांचेही दर्शन होऊ शकत नाही मग ईश्वराचे दर्शन होणे किती कठीण आहे ! प्रत्यक्ष ईश्वराची सेवा, पूजा आपण कांही करु शत नाही. म्हणून त्याची जी प्रतीके सांगितली आहेत यांची पूजा केली म्हणजे ईश्वराची पूजा होते. शास्त्र प्रमाण मानून आपण ही पूजा करतो.

भगवती कृष्णामाईची पूजा झाली आज सकाळी. सर्व महिलांनी

सौभाग्यदान म्हणून वस्त्रार्पण केलेले आहे. हा मोठा सोहळा, ईश्वरास्तिक्य बुद्धी, भगवत भक्ती, कृष्णामाईबद्दल वाटणारी भक्ती कशी आहे हे आज सर्वांना पहायला मिळाले. हे आपल्या भगवत भक्त ताई दामल्यांचे कार्य आहे. त्यांचे उत्तम मार्गदर्शन लाभलेली मंडळी या ठिकाणी आहेत.

ईश्वररुपी परमेश्वर म्हणायचे आणि मूर्तीत परमेश्वर नाही असे म्हणजे विसंगती आहे. हा बुद्धीवाद बरोबर नाही. सर्व विश्व त्याचे स्वरुप आहे हे मान्य करायचे पण मूर्ती मात्र प्रतीक म्हणून नाही असे कसे म्हणायचे? ईश्वर स्वरुपाचे ज्ञान होण्यास फार वेळ लागतो. फक्त श्रद्धेने ते ज्ञान मिळवण्याच्या दृष्टीने प्रवृत्ती होते. जीवात्म्याचे ज्ञान होणे सोपे आहे. आता तो मी कोण आहे? मला दु:ख झाले म्हणजे कोणाला दु:ख झाले? श्रीदत्तमहात्म्यात अलर्क राजाची कथा आली आहे. मलाच दु:ख होतय असे तो समजत होता. पण त्याच्या मातेच्या संकल्पाने, त्याच्या पूर्व सुकृताने त्याची श्रीदत्तात्रेयांची भेट झाली आणि त्याला श्रीदत्तात्रेयांनी विचारले, ''तुला कुठे दु:ख झाले ते सांग म्हणजे आपण त्यावर डाग देऊ'' हा प्रश्न ऐकताक्षणी अलर्काला सगळा विवेक झाला. देह इंद्रिय मन बुद्धी वगैरे सगळे बाजूला झाले. ते सगळे अचेतन आहे. अचनेतनाला सुखदु:खाची भावना असू शकत नाही. पण चेतन जो आहे आत्मा तो सर्व साक्षी आहे. आनंदरुप आहे. त्याला सुखदु:खाचा संबंध नाही. अलर्क शेवटी समजला आपल्याला दु:ख नाहीच आहे. इथपर्यंत त्याची बुद्धी आलेली आहे. श्रीदत्तात्रेयाच्या संकल्पाने अलर्काची बुद्धी पालटली.

तर ईश्वर तत्व समजून घेण्यासाठी केवळ श्रद्धेने प्रवृत्ती झाली पाहिजे. त्या शिवाय ज्ञान होत नाही. शुद्ध अहम् कोण हे युक्तीवादाने म्हणा एखाद्या महात्म्याच्या कृपेने, मार्गदर्शनाने समजून घ्यायचे

आहे. मोठे मोठे ज्ञानी पुरुषसुद्धा ईश्वराच्या भजनामध्ये अखंड निमग्न असतात. शुकाचार्य महाराज निर्गुण निराकार परब्रह्माच्या समाधीमध्ये अखंड असायचे पण नारदांच्याकडून भगवान श्रीकृष्णांचे चरित्र ऐकल्यावर त्यांची बुद्धी सगुणाकडे वळली. ज्ञानाबरोबर भक्तीही करणारे असे महात्मे कसे असतात याचे हे उदाहरण आहे. सद्‌गुरु हे प्रतीक आहे.

ईश्वर मानायची जरुरी नाही वगैरे कोणी किती छापले तरी भारतामध्ये ईश्वरास्तिक्य बुद्धी कांही झाले तरी कमी होणार नाही हे आजच्या सकाळच्या उदाहरणावरुन सगळ्यांना पटले असेल. आस्तिक्य बुद्धीने अशा प्रकारची सेवा म्हणा अर्चन म्हणा होत असतं.

जीवात्म्याचे स्वरुप समजायलासुद्धा वेळ लागतो. देह जीव म्हणायचा की इंद्रियांना जीव म्हणायचे प्राणवायूला जीव म्हणायचे की मनाला की बुद्धीला? कोणाला म्हणायचे? परमात्मा आणि जीवात्मा वस्तुतः एकच आहेत. पण ईश्वर जीव आहे हे समजण्यास खूप वेळ लागेल. म्हणून देहातील जीवात्म्याचे स्वरुप समजून घेण्यास अशा महात्म्यांचे मार्गदर्शन उपयोगी पडते. आपल्या बुद्धीमध्ये असणारे जे अनेक दोष आहेत त्यामुळे अतींद्रिय जे ईश्वरस्वरुप आहेते समजून यायलाही वेळ लागतो. वेदांनाही ईश्वराचे निश्चित स्वरुप सांगण्याची शक्ती नाही असे म्हणतात. वाणीही थांबते, मनही थांबते. तर असं ईश्वर स्वरुप समजून घेण्याकरता त्याची भक्ती मनामध्ये उत्पन्न झाली पाहिजे. भगवत् भक्ती कर्मयोगालाही उपयोगी पडणारी आहे आणि ज्ञानालाही. ईश्वर शक्ती सर्वत्र एक आहे हे ज्ञान व्हायला पाहिजे. जे जे अवतार ईश्वराने धारण केले ते सगळे एकच आहेत हे तरी ज्ञान कुठे होते आपल्याला? सगुण साकारामध्येही आपल्या मनांत भेद बुद्धी असते. राम निराळे

कृष्ण निराळे. त्यांचे चरित्र निराळे यांचे चरित्र निराळे. संत महात्मे मात्र सम दृष्टी ठेवून एकच स्वरुप दृष्टीसमोर ठेवून तितक्याच तन्मयतेने प्रत्येकाचे वर्णन करतात. रामही त्याचेच स्वरुप आहे, कृष्णही त्याचेच स्वरूप आहे, शिवही त्याचेच स्वरुप आहे, ज्ञानेश्वरमहाराजही त्याचेच स्वरुप आहे.

तेव्हां अशा रीतीने ईश्वर स्वरुपाचे ज्ञान होण्याकरता भक्तीचा उपयोग आहे. त्या भक्तीने आणखी मनही शुद्ध होते. विशाल होते. मनातल्या दोषामुळे मनाला विकासाच्या मर्यादा पडतात. अनेक वासना, अनेक कुसंस्कार मनामध्ये आहेत. त्या सगळ्या वासना नाहीश्या होऊन ते मन निर्मल झाले की मग हळू हळू ईश्वरस्वरुपाचा प्रकाश त्या मनांत पडायला सुरवात होते. सनत्कुमारांनीही शेवटी हेच सांगितलयं. चित्त अत्यंत निर्मल व्हायला पाहिजे. हा बुद्धीवाद संत महात्म्यांनी मान्य केला आहे.

कर्माचरण ही सुद्धा ईश्वरसेवाच आहे. ईश्वर भक्ती जर अंत:करणात उत्पन्न झाली असेल तर कर्माचरणही अत्यंत शुद्ध होते. अहंकार कमी कमी होत जातो. प्रेरक शक्तीबद्दल आणखी निर्माण होतो. केवळ बुद्धीपर्यंत थांबून उपयोग नाही. बुद्धीच्या पलीकडे बुद्धीला प्रेरणा करणारा कोणी तरी एक आहे, एक मोठी शक्ती आहे ही श्रद्धा हा विश्वास निर्माण झाल्यावर मग सगळे अनुभव आपोआप यायला लागतात. भगवत् प्रेम निर्माण व्हायला लागतं. दैवी संपत्ती प्राप्त होते.

द्रौपदीजवळ केवढी कृष्ण भक्ती होती ! सगळ्या संकटातून तर ती तरुन गेलीच. परंतु युद्धाच्या शेवटच्या दिवशी अश्वत्थाम्याने तिची सगळी मुले मारुन टाकली. कृष्णाने जेव्हां त्याला धरुन आणून तिच्या समोर उभे केले आणि विचारले, ''तुझ्या मुलांना मारणारा

हा, याला धरुन आणलय, याला काय शिक्षा करायची ते सांग. तू सांगशील ती शिक्षा करययला मी तयार आहे'' पण द्रौपदीने काय सांगावे ! रडत बसली होती बिचारी, कृष्ण भक्ती मनांत असली तरी केवढं संकट आहे ! पुत्राबद्दलची ममता मनांतून जाणे फार कठीण आहे. पण दु:ख बाजूला झाले आणि मनांतली दृढ असलेली कृष्णभक्ती वर आली. आणि लगेच उठून तिने अश्वत्थाम्याला नमस्कार केला आहे. व्यास महर्षी वर्णन करताहेत, ''याला जीवदान द्या, सोडून द्या, हा ब्राह्मण पुत्र आहे याला मारणं योग्य नाही. ज्यांच्याजवळ तुम्ही विद्याध्ययन केलत त्यांचा हा मुलगा आहे म्हणजे साक्षात गुरु स्वरुप आहे. त्याचा नाश म्हणजे गुरुंचा नाश करण्यासारखे आहे. याच्या आईला माझ्याप्रमाणे पुत्र शोकाचे दु:ख व्हावे असे मला वाटत नाही'' म्हणजे द्रौपदी संसारी होती की संसारी नव्हती? किती तिचे मन तयार झाले होते ! त्यामुळे सर्वांना तिचे म्हणणे मान्य करावे लागले. भीम अतिशय रागावला होता पण तोही कांही बोलू शकला नाही. 'संकल्पावी माया संसाराची' ही तयारी तिची आहे. मनांत दु:ख होणे सहाजिकच आहे. इतर सगळे विरुद्ध होते. अश्वत्थामा जिवंत राहिला असता की नाही कोणास ठाऊक !

निर्मत्सर अंत:करण आहे. दुसऱ्याच चांगलं झालेलं पाहिल्यावर मनांत असमाधान उत्पन्न होण्याला मत्सर असे म्हणतात.

द्रौपदीचा हा अखेरचा निर्णय केवढा निर्णय आहे. राज्य मिळालं पाहिजे असं आग्रहाने सांगणारी द्रौपदी. तुमचा धर्माचरणाचा काय उपयोग झाला? राज्य घालवून बसलात असे म्हणणारी द्रौपदी. आज सांगते आहे की अश्वत्थाम्याला सोडून द्या. हे परिवर्तन काय लगेच झालं काय? श्रीकृष्णांनी तिच्यावर कृपा केली असली पाहिजे. सर्व आणखी कृष्णार्पण करुन बसली आहे. मुलांकरता सुरवातीला

थोडा शोक झाला, म्हणाली. पण शोक टाकायची तयारी आहे. शोक बाजूला टाकून पुन्हा भगवत् भक्तीकडे मन कधीही वळतयं. इतका बुद्धी विकास तिने करुन घेतलाय. तर अशा रीतीने पुष्कळ स्त्रिया झाल्या आहेत. धर्माचरण करुन भगवत् भक्ती करुन त्यांनी आपला उद्धार करुन घेतला आहे.

श्रीकृष्ण चरित्रामध्ये व्यासांनी ऋषी पत्नींची कथा दिली आहे. एकदा सगळ्या गोपालांसह भगवान वनामध्ये गेले होते. ऋषींचे आश्रम वनात असायचे. गोपालांना भूक लागल्यावर भगवंतांनी आपल्या मित्रांना सांगितले, ''ऋषींच्या आश्रमात यज्ञयाग चालू आहे तिथे जाऊन त्यांना सांगा, आम्हाला भूक लागली आहे कांही तरी खायला द्या.'' ऋषींनी सांगितले, यज्ञ चालू असताना मध्येच असे अन्न देता येत नाही. वगैरे. गोपालांनी परत येऊन भगवंतांना ऋषी काय म्हणाले ते सांगितले. भगवान म्हणाले, आता त्या ऋषी पत्नींच्याकडे जाऊन त्यांना तेच सांगा. त्याप्रमाणे गोपालांनी दूध, दही आणि इतर जेवणाचे पदार्थ वगैरे दिले. त्यांना भगवंतांच्या दर्शनाची ओढ होती. त्यामुळे भगवान आलेले आहेत म्हटल्यावर त्या यज्ञाचा स्वैपाक वगैरे सोडून तशाच दर्शनाला निघाल्या. त्यांनी दिलेले अन्न गोपालांनी भक्षण केले.

त्या ऋषींचे नंतर डोळे उघडले. आपण प्रत्यक्ष परमेश्वर आपल्या जवळ येऊनही अज्ञानाने आपण त्याला ओळखू शकलो नाही याचा त्यांना पश्चाताप झाला. वास्तविक वेदज्ञान, कर्मज्ञान त्यांना उत्तम होते. यज्ञरुपी परमेश्वराचीच ते उपासना करीत होते पण सगुण साकार परमेश्वराला आपल्या ज्ञानाच्या अहंकाराने ते ओळखू शकले नाहीत. ज्ञान जितकं जितकं वाढत जाईल तितका तितका अहंकार वाढत जातो म्हणतात. पण भक्तीने शुद्ध ज्ञानाची प्राप्ती होते. सर्व कर्तृत्व शक्ती ईश्वराची आहे अशी संतांची ठाम भूमिका असते त्यामुळे त्यांचे

अंत:करण अहंकाररहित असते.

आपल्या पत्नींच्याजवळ ज्ञान नसले तरी त्यांच्या मनांत केवढी कृष्ण भक्ती आहे याची त्यांना जाणिव झाली. व्यास महर्षी सांगतात, संसाराची ममता आड आलेली आहे. आपण कृष्णाकडे गेलो हे जर कंसाला समजले तो उद्या आपला आश्रम जाळून टाकील अशी भीती त्यांना वाटली आहे. म्हणजे ईश्वर आहे असे ज्ञानमार्गाने समजून घ्यायचे आणि दुसरीकडे कंसाची भीती बाळगायची. केवढी विसंगती आहे. त्या ऋषींच्या मनावर परिणाम झाला. ऋषींना पश्चाताप झाला पण त्यांना कृष्ण दर्शन घडले नाही. इथे कंसाचं भीतीच्या रुपाने प्रतिबंध निर्माण झाला. असे प्रतिबंध येत असतात. पण ईश्वराच्या कृपेने ते सगळे दूरही होतात. आणि ज्ञान व कर्म शुद्ध होऊन जाते. पण किती पुण्यकर्म केले याचा आपल्याला विसर पडला पाहिजे. जे कांही झाले ते जगदंबेच्या कृपेने, कृष्णामाईच्या कृपेने झाले असे मनांत आले तरी हरकत नाही. सगळा अहंकार नाहीसा करुन जीवाकडून शुद्ध कर्म करुन घ्यायचे सामर्थ्य देवाकडे आहे पण त्याकरता आरंभाला विश्वासाची, श्रद्धेची जरुरी मात्र आहे. ती श्रद्धा पुढे ईश्वराच्या कृपेने वाढत जाते.

कर्तुम् अकर्तुम् सामर्थ्य त्याचे आहे हे मानणं म्हणजे ईश्वराचे आस्तिक्य आहे. कोणत्याही परिस्थितीत मनामध्ये भीती उत्पन्न होऊ न देणे हे दैवी संपत्तीचे पहिले लक्षण आहे. त्रैल्योक्याचा राजा असलेला प्रत्यक्ष बाप जीवावर उठूनसुद्धा प्रल्हादजी घाबरले नाहीत. बाप असला तरी भीतीचे कारण काय? भगवत् भक्तीमुळे देह म्हणजे मी नाही हा क्षेत्र विवेक दृढ झालेला आहे. नारदांसारख्या महात्म्यांच्या कृपेने त्यांची भक्ती दृढ झालेली आहे. जिथे मृत्युचीच भीती नाही तिथे इतर कोणची भीती वाटायचे कारणच नाही.

'तुझा विसर न व्हावा' एवढेच मागणे देवाजवळ मागायचे आहे. तुकाराम महाराजांनी हेच मागणे मागितले आहे.

***न लगे मुक्ती धन संपदा संत संग देई सदा***
***तुका म्हणे गर्भवासी सुखे घालावे आम्हासी***

गर्भावस्थेत केवढे दु:ख भोगावे लागते. हरकत नाही. पण तुझा विसर पडू देऊ नकोस.

भीष्माचार्य इच्छा मरणी होते. त्यांच्या शेवटच्या क्षणी स्वत: गोपालकृष्ण त्यांच्यासमोर उभे होते. भीष्माचार्यांनी जन्मभर भगवंतांची भक्ती केली. श्रीकृष्ण म्हणजे साक्षात परमेश्वर आहे अशी त्यांची खात्री होती. ते म्हणतात, भगवंता, ज्या बुद्धीत कोणतीही इच्छा राहिलेली नाही अशी शुद्ध बुद्धी मी तुला अर्पण करतो आहे. तृष्णारहित मन मी तुला अर्पण करतो आहे. संपलं ! संसार संपलेला आहे. मुक्त झाले भीष्माचार्य. त्यांना कुठे जावे लागले नाही. त्यांचे सूक्ष्म शरीर इथेच भगवंताच्यात विलीन झालेले आहे.

कृष्णालहरीचा शेवटचा श्लोक महत्त्वाचा आहे.

***कृष्णां यो वृणुते भक्त: पदं यायान्निरन्तरम् ।***
***तृष्णां यो वृणुते खेदं यायान्निरन्तरम् ।***

जो भक्त स्नानादिकांनी कृष्णेची आराधना करतो तो नित्य अभय पदाचा अधिकारी होतो. जो वासनेची निवड करतो तो अभक्त निरंतर खेदाचा धनी होतो.

तर अशा रीतीने आपली तृष्णा देवाने कमी करावी, आणि निरंतर आपल्याला भगवंताचे स्मरण राहावे, काया वाचा मनाने त्याची अखंड सेवा घडावी एवढीच प्रार्थना करुन आपण इथून जायचे आहे.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥**

'तुझा विसर न व्हावा' एवढेच मागणे देवाजवळ मागायचे आहे. तुकाराम महाराजांनी हेच मागणे मागितले आहे.

***न लगे मुक्ती धन संपदा संत संग देई सदा***
***तुका म्हणे गर्भवासी सुखे घालावे आम्हासी***

गर्भावस्थेत केवढे दु:ख भोगावे लागते. हरकत नाही. पण तुझा विसर पडू देऊ नकोस.

भीष्माचार्य इच्छा मरणी होते. त्यांच्या शेवटच्या क्षणी स्वत: गोपालकृष्ण त्यांच्यासमोर उभे होते. भीष्माचार्यांनी जन्मभर भगवंतांची भक्ती केली. श्रीकृष्ण म्हणजे साक्षात परमेश्वर आहे अशी त्यांची खात्री होती. ते म्हणतात, भगवंता, ज्या बुद्धीत कोणतीही इच्छा राहिलेली नाही अशी शुद्ध बुद्धी मी तुला अर्पण करतो आहे. तृष्णारहित मन मी तुला अर्पण करतो आहे. संपलं ! संसार संपलेला आहे. मुक्त झाले भीष्माचार्य. त्यांना कुठे जावे लागले नाही. त्यांचे सूक्ष्म शरीर इथेच भगवंताच्यात विलीन झालेले आहे.

कृष्णालहरीचा शेवटचा श्लोक महत्त्वाचा आहे.

***कृष्णां यो वृणुते भक्त: पदं यायान्निरन्तरम् ।***
***तृष्णां यो वृणुते खेदं यायान्निरन्तरम् ।***

जो भक्त स्नानादिकांनी कृष्णेची आराधना करतो तो नित्य अभय पदाचा अधिकारी होतो. जो वासनेची निवड करतो तो अभक्त निरंतर खेदाचा धनी होतो.

तर अशा रीतीने आपली तृष्णा देवाने कमी करावी, आणि निरंतर आपल्याला भगवंताचे स्मरण राहावे, काया वाचा मनाने त्याची अखंड सेवा घडावी एवढीच प्रार्थना करुन आपण इथून जायचे आहे.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥**

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

***गुरुर्ब्रम्हागुरुर्विष्णुगुरुर्देवो महेश्वर:***

***गुरु: साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नम:***

भगवान् श्रीशंकराचार्य महाराजांनी साधकांच्या पुढे ''श्रीदक्षिणामूर्ति'' स्तोत्राचा एक क्रम ठेवलेला आहे.

***ईश्वर: गुरु: आत्मा इति मूर्तिभेदविभागिणे।***

***व्याप्तदेहाय दक्षिणामूर्तये नम: ॥***

ईश्वरस्वरुप आधी सांगितले आहे. त्यानंतर गुरुस्वरुप आहे आणि नंतर आत्मा ब्रह्म ज्याला म्हणतात. या तीनही मूर्ती एकच आहेत असे त्यांनी सांगितले आहे. आकाशाप्रमाणे सर्व व्यापक परमात्मा आहे, गुरु आहे आणि ईश्वर आहे. तीनही मूर्ती एक आहेत, दृष्टी आचार्य महाराजांनी साधकांच्या पुढे मांडली आहे. सर्व संत साधकांना याच दृष्टीने सद्गुरुचं माध्यम आहेत हे दाखिवलं आहे आचार्य महाराजांनी. ईश्वराची उपासना त्यांच्या मार्गदर्शनाने श्रद्धापूर्वक चालू राहिलेली असताना सद्गुरुंचे दर्शन होते.

***सवर्णाश्रम धर्मेण तपसा हरितोषणात***

वर्णाश्रम धर्माचे आचरण करावे असे सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज सांगताहेत. आणि त्या वर्णाश्रम धर्माचे आचरण म्हणजेच भगवंताचे भजन आहे. दास्य भक्ती आहे ती. कर्मयोग म्हणजे वेगळा नाहीये. त्या आचरणामुळे योग्य साधन संपत्ती प्राप्त होतीच आणखी सद्गुरुंचे दर्शन होते, त्यांची भेट होती आणि नंतर सद्गुरुंचा प्रसाद झाला म्हणजे ब्रह्मज्ञान प्राप्ती होते आणखी मुक्ती मिळते.

परमार्थमार्गामध्ये ध्यानयोगाला विशेष महत्व आहे. ध्यानयोगाचा पुरस्कार अष्टांगयोगामध्येही आलेला आहे. भगवत्

गीतेतही भगवंतांनी त्याचेच प्रतिपादन केले आहे. तो ध्यानयोगाचा अभ्यास चित्रकारांचा असावा लागतो. एखादा उत्तम बंगला बांधणारा इंजिनियर म्हणा आर्किटेक्ट म्हणा त्याच्या बुद्धीमध्ये तो संबंध बंगला कसा बांधायचा, किती खोल्या करायच्या, किती लाकूड, स्टील इ. सामान लागेल हे आलेले असते. त्याच्या अंत:चक्षुसमोर तो बंगला अव्यक्तरुपाने आलेला असतो. त्याप्रमाणे चित्रकाराला आरंभाला ते ध्यान झाले पाहिजे ना ! ध्यानपूर्वक, श्रद्धापूर्वक झालेलं जे चित्र आहे त्याचा परिणाम पहाणाऱ्याच्या मनावर होतो. म्हैसूरच्या राजवाड्यामध्ये राजा रविवर्म्याने काढलेली कांही मोठी मोठी चित्र आहेत. एक एक खणाची सीतादेवी, दमयंतीच आहे. या चित्राकडे पाहिल्यावर पातिव्रत म्हणजे काय हेच पहाणाऱ्याच्या मनांत येणार आणि मान आदराने लवणार. हे त्या चित्राचे सामर्थ्य आहे. चित्र काढणाऱ्याचा ध्यानयोग किती मोठा असेल ! ईश्वरस्वरुप, सद्‌गुरुस्वरुप आपल्या मनामध्ये अखंड राहिले पाहिजे. योगशास्त्रामध्ये चित्तस्थैर्याचे उपाय बरेच सांगितले आहेत. प्राणायाम हाही योग सांगितला आहे चित्तामध्ये.

*वितरागविषयं वा चित्तम्*

असं एक सूत्र आहे. वितराग महापुरुष, रागद्वेषादिक विकार ज्याच्या मनांमध्ये नाहीत, त्याचे चरित्र चिंतन करावे म्हणजे चित्त स्थिर होते. हा एक स्वतंत्र उपाय सांगितला आहे.

तर महात्म्यांचे चरित्र लिहिणारा लेखकही तसाच मिळावा ही सुद्धा ईश्वराची, सद्‌गुरुंची योजना असली पाहिजे ना। त्यांचे चरित्र लेखन करणारा एखादा असा श्रद्धाळु ध्यान योगी, त्याला प्रेरणा व्हायची आणि त्याने ते ध्यान करुन चरित्र लिहायचे ही योजना त्यांचीच असली पाहिजे. आणि तसं चरित्र प्रकाशित झाले आणि

आपल्याला त्याचे चिंतन झाले तर योगसूत्रकारांच्या सांगण्याप्रमाणे त्याचे फल -- चित्त स्थिर होणं -- हे आपल्याला मिळतं. हा एक स्वतंत्र उपाय आहे.

परमेश्वराचे स्वरुप आपल्याला दिसत नाही. पण वेदव्यासादिक त्यांच्या ग्रंथामध्ये ईश्वराच्या ध्यानाची वर्णन केलेली आहेत.

*शांताकारं भुजगशयनं ...... सर्व लोकैकनाथं ।*

या ध्यानाप्रमाणे जर ईश्वरकृपेने, सद्गुरुकृपेने आपली मनोवृत्ती झाली तर या शब्दांचा उपयोग होतो. ईश्वरस्वरुप जरी अव्यक्त, अचिंत्य असले तरी सगुण साक्षात्कार झालेल्यांनी त्याचे जे वर्णन लिहून ठेवले आहे त्याचे चिंतन केले म्हणजे आपल्यालासुद्धा ते ध्यान घडतं म्हणतात. ध्यानाचा अभ्यास जस जसा होईल तस तसे अव्यक्ताचे व्यक्तरुप आपण पाहू शकतो. अव्यक्तरुपानेही कार्य करता येते ना। व्यक्तरुपाने सर्व ठिकाणी जाणे येणे वगैरे सगळ्या लोकांचे समाधान होईल की नाही कोणास ठाऊक। त्याला कांही मर्यादा आहेत पण अव्यक्त रुपाला कांही मर्यादा नाहीत. एकाच वेळेला ते महात्मे सर्व ठिकाणी जाऊ शकतात.

श्रेष्ठ पुरुषांच्या चरित्राचे चिंतन हे चित्तस्थैर्याला कारण असते हे पांतजलमहर्षींनीही कबूल केले आहे. ईश्वर भक्ती आणि गुरुभक्ती भिन्न भिन्न आहे असाही एक साधकांना उपदेश आहे, नाही असे नाही. परंतु शेवटी मात्र ईश्वर आणि गुरु एकरुप आहेत.

*गुरुदेव एक मानूनी भक्ती*
*तयांची करी त्या करी येई मुक्ती*
*सुयुक्ती अशी ही धरी नित्य चित्ता*
*त्वरे आदरे तूं स्मरे नित्य दत्ता ॥*

प.प. श्रीमत् वासुदेवानंद सरस्वतीस्वामीमहाराजांनी हा सिद्धांत

सांगितलेला आहे. गुरु आणि देव एक आहेत असे समजून भक्ती झाली पाहिजे. उपनिषदामध्ये सांगितले आहे -- मातृमान्, पितृमान् आणि आचार्यमान् - श्रेष्ठ माता, पिता आणि आचार्य ज्याला मिळालेले आहेत तोच आत्मज्ञानापर्यंत जाऊ शकतो. सावत्र मातेने आपला अपमान केल्यामुळे हरीच्या दर्शनाकरता ध्रुव वनांत गेला. दाता एक रघुनंदन - दुसऱ्याकडे मागायचे नाही आता. नारदांचे त्याला मार्गदर्शन मिळाले आणि चार पांच महिन्यात त्याल सगुण साक्षात्कार झाला. महाविष्णुंच्या वराने ध्रुवपद मिळाले. नंतर तो जेव्हां राजधानीत परत आला तेव्हां त्याचा ज्या सावत्र मातेने अपमान केला होता ती अगोदर त्याला भेटायला गेली, प्रेमाने भेटली आणि तिने त्याला आशीर्वाद दिला. त्या वेळी शुकाचार्यांनी मुद्दाम उल्लेख केला आहे --

***यस्य प्रसन्नौ भगवान गुणमैत्री हरि:***
***तस्मै नमंति भूतानि निम्न स्वयम्।***

हे ईश्वरभक्तीचे, सद्गुरु भक्तीचे, पूर्व सुकृताचे फल आहे. पण महात्मे फलाकडे पहात नाहीत. त्यांना फलाची आशा नसते. कर्तव्य आहे. तेवढे त्यांनी केले. पण शुकदेव सांगतात

***तस्मै नमंति भूतानि।***

भगवान् श्रीहरि ज्याच्यावर प्रसन्न झाले आहेत त्याच्यासमोर ज्याप्रमाणे सखोल जागेत पाणी आपोआप वहात जाते, त्याप्रमाणे सर्व भूतं नम्र होतात. आशा नसतानाही हे फल महात्म्यांच्याकडे आपोआप येते. हे त्याचे फळ सांगितले आहे. फळाकरता आंब्याचे झाड लावले की सावली, सुगंध हे आपोआपच त्याच्यामुळे मिळतात. सांप्रदायात आज्ञापालनाला विशेष महत्व आहे.

गुरु साक्षात् परब्रह्मरुप आहेत, परमेश्वररुप आहेत अशी भावना पाहिजे. ते कांही निवडून आलेले नाहीत. निवडून आलेलेसुद्धा टिकत

नाहीत. स्वत:च्या तपाच्या योगाने ईश्वरकृपा, सद्गुरुकृपा संपादन करुन श्रेष्ठ भूमिकेवर गेलेले जे महात्मे आहेत त्यांच्या आज्ञापालनाने आपले हित होणार आहे. प्रियही होणार आहे. हाच संप्रदाय आहे. पण कदाचित प्रिय बाजूला झाले आणि हित जर होणार असेल तर त्यांच्यावर लक्ष ठेवले पाहिजे. एखाद्या वेळेला प्रिय होणार नाही. कांही भक्त देवाजवळ मागतात --

*न मिळो खावया न वाढो संतान*
*परि हा नारायण कृपा करो*

नारायणाच्या कृपेला प्राधान्य आहे. खाणं पिणं मिळालं नाही तरी हरकत नाही.

*विटंबो शरीर होत का...*
*परी राहो चित्ती नारायण*

त्याला महत्व आहे. सद्गुरुंचे अखंड स्मरण घडण्याला ते प्राधान्य देतात. बाकीचे नको म्हणतात. तर अशा दृष्टीने कदाचित प्रिय बाजूला होईल परंतु प्रियामध्ये आपली बुद्धी जर आसक्त झालेली असेल तर सद्गुरुंच्या बद्दलची श्रद्धा कमी होण्याचा संभव आहे. आपलं हित कोणतं हे आपली बुद्धी समजू शकत नाही. आपल्या हिताची जाणीव नाहीये. अर्जुनाला ते कळत नाही. अगोदर पुष्कळ बुद्धीवाद त्याने मांडला. हिंसात्मक युद्धकर्म सांगणारं शास्त्र मला मान्य नाही, हे शास्त्र मानणारे मोठे मोठे जरी असले तरी ते मलाही मान्य नाहीये वगैरे बोलू लागला. अभिमानामुळे आपण कोणाजवळ बोलतो याचे त्याला भान राहिले नाही. भगवान् बोलले नाहीत. ''चालू दे, काय बोलायचे ते बोलूं दे'' म्हणाले.

*कार्पण्यदोषोपहतस्वभाव: पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेता: ।*
*यच्छ्रेय: स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽ हं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥२७॥*

परंतु लगेच त्याला आणखी आपली चूक समजली. आपल्या भूमिकेची त्याला जाणीव झाली. अहंकार दूर झालेला आहे. त्याने कबूल केले, धर्माधर्माबद्दल मला विचार करता येत नाही. माझ्या बुद्धीचे हे सामर्थ्य नाही. मी आपला शिष्ट आहे. माझ्या हिताहिताचा विचार करणारे आपण समर्थ आहात. मला निश्चित मार्ग जो आहे तो सांगा. असा अहंकार सोडून, बुद्धीवाद बाजूला ठेवून ज्या वेळेला तो शरण आलेला आहे त्या वेळेला गीताज्ञानाला आरंभ झालेला आहे. नाही तर असे कितीही अर्जुन गेले असते तरी युद्ध थांबले नसते. भगवंतांनी त्याला बजावलेले आहे. सर्वांचा संहार करण्याचा माझा संकल्प झालेला आहे. तू गेलास तरी हे कौरव जिवंत राहाणार नाहीत.

***कालो ऽ स्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धोलोकान् समाहर्तुमिह प्रवृत: ।***
***ऋतेऽ पि त्वां न भविष्यन्ति सर्वे ये वस्थिता: प्रत्येनकेषु योधा: ॥११.३२॥***

तर ही अशा प्रकारची आज्ञापालन करण्याची मनोवृत्ती राष्ट्राच्या दृष्टीनेसुद्धा किती तरी योग्य आहे। सध्याचा बुद्धीवाद वेगळा आणि संतांचा बुद्धीवाद फार वेगळा. संतांच्या बुद्धीवादामध्ये सद्‌गुरु हे साक्षात् परब्रह्म आहेत अशी भावना दृढ आहे. त्यामुळे सद्‌गुरुंची आज्ञा पालन करण्याकडे प्रवृत्ती आहे. मातेच्या इच्छेने कां होईना पित्याची आज्ञा आहे चौदा वर्ष वनवास पत्करला पाहिजे. मर्यादा पुरुषोत्तम रामचंद्र वनाची हद्द सोडून कोणच्याही नगरामध्ये गेले नाहीत. किष्किंधानगरीमध्ये सुग्रीवाच्या राज्याभिषेक सोहळ्याला त्याने अत्यंत आग्रह करुनही रामचंद्र गेले नाहीत. म्हणाले, ''चौदा वर्ष वनाची हद्द सोडण्याची मला आज्ञा नाही.'' त्यांनी आपल्या ऐवजी लक्ष्मणाला पाठवले. गुरु भक्तीच्या सांप्रदायात शब्दश: आज्ञापालन करण्यात आपलं हित आहे ही दृढ भावना आहे. ईश्वर भक्ती आणि गुरु भक्ती शेवटी एक होऊन जाते. हा सिद्धांत आहे.

ईश्वर भक्तीचा सांप्रदाय वाढवण्यासाठी संतांनी सतत प्रयत्न केलेला आहे.

*किंबहुना सर्व सुखी ।*
*पूर्ण होऊनी तिहीं लोकी ।*
*भजिजो आदि पुरुषी ।*
*अखंडीत ॥*

त्या आदि पुरुषाला विसरु नये म्हणतात. सर्वही सुखं मिळू देत तुम्हाला... असे तेच म्हणतात पण त्यांचे मुख्य सांगणे आहे की तुम्ही ईश्वराची भक्ती करा. ईश्वर भक्तीच्या योगाने तुम्हाला सद्‌गुरुंची प्राप्ती होणार आहे. त्यांचे मार्गदर्शन मिळणार आहे. तो तुमची सगळी काळजी घेईल, तुमची सगळी कार्य तुम्हाला करायला लागणार नाहीयेत, तुम्हाला तुमचे कसे होइल ही चिंता नको.

बुद्धी ही कर्मानुसार आहे हा एक सिद्धांत आहे. आपल्या पूर्वकर्मानुसार शुभाशुभ वासना आपल्या मनांत निर्माण होत असतात. पण देवदत्त बुद्धी जी आहे ती वेगळी आहे. असे मानावे लागते. ईश्वर प्रसादाने मिळणारी बुद्धी ही निराळी मानावी लागते. कर्म बाजूला सारुन ईश्वर प्रसादाने ती मिळते.

तेषां सततयुक्तानां भजनां प्रीतिपूर्वकम् ।
ददामि बुद्धीयोगं तं येन मामुपयान्ति ते ॥१०.१०॥

माझ्या जवळ येऊन ज्यांना पोहोचायचे आहे त्यांना मी बुद्धी देतो, म्हणतायेत भगवान्. पूर्व सुकृताप्रमाणे ईश्वराची कृपा संपादन करण्याकरता मार्गदर्शन करणारे महात्मे भेटले आणि त्यांच्या आज्ञेप्रमाणे आचरण ठेवले तर ईश्वरदत्त बुद्धी आपोआप मिळू शकेल आणखी

*ते मां उपयांति ते*

हे फल प्राप्त होऊन सगुण साक्षात्कार किंवा निर्गुण साक्षात्कारही होऊ शकेल. सगुण आणि निर्गुण वेगळे नाहीयेत.

***सगुण निर्गुण एकु गोविंदु रे।***

ज्ञानेश्वर महाराज दोन्ही एकच मानतात. त्यांच्या दृष्टीने दोन्ही एकच आहेत.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो... हे आम्ही रोज म्हणतो पण त्याप्रमाणे भावना असली पाहिजे. सद्गुरु आणखी साक्षात् परब्रह्मरुप आहेत. श्रीगुरुचरित्रामध्ये एक कथा आलेली आहे. जिचा पती गेलेला आहे, मुलगा मतिमंद निघाल्याने प्राणत्याग करायला निघालेली कुरवपुरातील स्त्री श्रीपादवल्लभांना शरण आली. त्यांनी तिला सांगितले की आत्महत्या हा दोष आहे. तिला त्यांनी शनीप्रदोषाचे व्रत करण्याची आज्ञा केली. तीही इतकी श्रेष्ठ भक्त होती की शनीप्रदोषाच्या दिवशी संध्याकाळी साक्षात् श्रीपादवल्लभांनाच शंकर मानून तिने त्यांची पूजा, आरती करीत असे.

***गुरुर्देवो महेश्वर:***

ईश्वराची भक्ती मला करायला सांगितली आहे सद्गुरुंनी पण ईश्वर निराळे नाहीयेत या भूमिकेवर ती गेलेली असल्यामुळे तिला लगेच फळ मिळाले. त्या जन्मात प्रारब्धवशात् मंद बुद्धी असलेला तिचा पुत्र ज्ञानसंपन्न झाला. आणि पुढच्या जन्मात ''आता तुमच्यासारखा मुलगा पाहिजे'' म्हणाल्यावर तिची इच्छा पूर्ण करावी लागली.

सर्व नियामक परमेश्वर आहे पण अनेक जन्म संसिद्ध: अशा भूमिकेतून जे श्रेष्ठ भूमिकेपर्यंत गेलेले जीव आहेत त्यांचा तो नियम्य बनतो आहे. सर्वांचे नियामक असणारे त्रिमूर्ती अनसूयेच्या तपामुळे तिचे नियम्य झाले आहेत. संत महात्म्यांच्या आणि शास्त्राच्या आदेशाप्रमाणे वागणारा जीवत्मासुद्धा ईश्वराला नियम्य करु शकतो

याचे हे उदाहरण आहे.

***कोणाही जीवाचा न घडो मत्सर ।***

***वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे ॥***

ही खरी ईश्वराची भक्ती आहे. या दृष्टीने साधनामार्गामध्ये साधक म्हणून प्रवेश ज्यांनी केलेला आहे त्यांनी या दृष्टीने वागून आणखी सर्वांच्या सहानुभूतीने, सर्वांच्या सल्ल्याने योग्य रीतीने वागून ही जी अखंड परंपरा चालत आलेली आहे ती परंपरा उत्तरोत्तर अखंड चालू रहावी आणखी आपलं आणि इतरांचे समाधान या दृष्टीने व्हावे अशा रीतीने परमेश्वराची, सद्गुरुंची प्रार्थना केल्यावर अशक्य असं कांहीही नाहीये. फक्त ती कार्यसिद्धी त्या जीवाच्या अंत:करणातल्या श्रद्धा, निष्ठेवर अवलंबून आहे.

***स निश्चयेन योक्तव्य: योग: अनिर्विण्ण चेतस:***

भगवान् सांगताहेत, अनुत्साह उपयोगी नाही. निश्चय पाहिजे हे साधन मला करायचे आहे आणि त्यासाठी निश्चय हे साधन आहे. आणि निर्विण्ण नाही. नैराश्य नाही, उत्साहभंग नाही. ***एखाद वर्ष कुठं झाल किंवा थोडा साधना अभ्यास झाला की अजून आम्हांला अजून कांहीच मिळालं नाही, त्याला साधनेत अशा क्रिया होतात, आम्हांला साधनेत कांहीच क्रिया होत नाहीत, आपण किती मागे आहो, अशा लेखी तक्रारी येतात. बहिरंग पाहूनच अशा तक्रारी येतात. आपण मागं असलो तरी पुढे जाऊ शकतो.*** श्रेष्ठ पुरुषाच्या सान्निध्यात-पंढरीमध्ये आलेलो आहोत ही भावनाही कमी झालेली आहे त्यामुळे अशा प्रकारे नैराश्य येते. नको बुवा काय हे? असा उत्साह भंग होतो. तसा होऊन उपयोग नाही.

एकेक महिना जसा गेला तसा ध्रुवाचा उत्साह जास्ती जास्ती वाढत गेलेला आहे. पहिल्या महिन्यात तीन दिवसांनी फळ भक्षण

केलं. पुढे नुसती पानेच खाल्ली. त्याच्या पुढच्या महिन्यात नऊ दिवसांतून एकदाच पाणी घेतले. चौथ्या महिन्यात बारा दिवसांनी एकदा वायुचा आहार केला. म्हणजे बारा दिवस त्याचा कुंभक होत असला पाहिजे हे यावरुन दिसतय. बारा दिवसानंतर पुन्हा श्वासोच्छ्वास आहे. वायुचा आहार कुणाला शक्य आहे? माहित तरी आहे का? वायु ही आहाराची वस्तू आहे याची जाणीवही कोणाला होणे शक्य नाही. सद्‌गुरु नारद महर्षींच्या कृपेने चार महिन्यात ही अवस्था होऊन गेलेली आहे.

तर अशी गुरु परंपरा भारतवर्षामध्ये लाभलेली आहे. असे अनेक महात्मे व्यक्त किंवा अव्यक्त रुपाने अद्यापि आहेत. त्यांचे मार्गदर्शन आपल्याला लाभत आहे. आचार्य महाराजांनी सांगितल्याप्रमाणे अव्यक्त रुप म्हणजे सर्वव्यापी स्वरुपामध्ये आणखी सद्‌गुरु आपले आहेत ही भावना ठेवून श्रद्धेने त्यांच्या चरित्राचे चिंतन हे मुख्य करायला लागल्यानंतर चित्ताला स्थैर्य प्राप्त होते.

योग शास्त्र हे प्रयोग शास्त्र आहे. कर्मयोग म्हणजेही प्रयोग शास्त्रच आहे. योग्य प्रयोग झाल्यावर त्याचे फळ मिळतं. तसं श्रद्धा ठेवून महात्म्यांच्या चरित्राचे चिंतन झालं तर चित्त कसे निर्विकार होते हे प्रत्यक्ष अनुभवाला येण्यासारखी गोष्ट आहे.

पूर्व संस्कारानुसार साधनेत बाह्य् क्रिया कमी जास्ती होतील परंतु चित्ताची प्रसन्नता, निर्विकारता ही स्वत:ला अनुभवाला येण्यासारखी आहे. म्हणून सांप्रदायासंबंधी कांही जरी मनामध्ये विकल्प निर्माण होण्याचा संभव असला तरीसुद्धा पुन्हा पुन्हा संत चरित्राचे चिंतन करून, ज्यांना दीर्घ काळ संत संगती घडली असेल अशांबरोबरही चर्चा करून आपलं मन नि:शंक करण्याचा प्रयत्न

करून साधनाभ्यासामध्ये अखंड निमग्न रहाणे हा मुख्य उद्देश आहे. सर्वांनी त्याचे चिंतन ठेवून आणखी आपला साधनाभ्यास चालू ठेवावा आणि आत्मप्रचीतीपर्यंत जाऊन पोहोचावे.

इकडे सद्‌गुरु प. प. श्रीमत्‌ वासुदेवानंद सरस्वतीस्वामीमहाराजांचा दत्त सांप्रदायही आहे आणि वारकरी सांप्रदायही आहे. विरोध कशासाठी? मूळ सिद्धांत जो आहे तो ज्यांच्या लक्षामध्ये आलेला आहे. त्यांच्या मनामध्ये विरोध नाहीये. समन्वय पद्धतीच त्यांची असती.

***साधू दिसताती वेगळाले ।***
***परी ते स्वरूपी मिळाले ।***
***अवघे मिळून एकची जाहले ।***
***देहातीत वस्तू ।***

समर्थांनी सांगितल्याप्रमाणे देहातीत वस्तूस्वरुपाला गेलेल्या महात्म्यांची कृपा सर्वांवर झालेली आहे, त्यांचे मार्गदर्शन लाभलेले आहे. पुढेही अव्यक्तरुपाने मार्गदर्शन करण्याची व्यवस्था त्यांनी केलेली आहे. ती त्यांची जबाबदारी आहे. त्यांचे ते कार्य चाललेले आहे. हे पक्के मनांत बाळगून आपण सद्‌गुरुंची ईश्वराची भक्ती चालू ठेवायची. आपली बुद्धी विशाल झाली की नाही आपलं आपण आत्मपरीक्षण करून पहायचे व साधनाभ्यास चालू ठेवायचा. दीर्घ काल निरंतर, आदरबुद्धीने, श्रद्धापूर्वक अभ्यास चालू ठेवला म्हणजे सर्वही कार्य होतं. ईश्वराची आपल्या सर्वांवर कृपा व्हावी आणि त्याच्या कृपेने सर्वांचे पूर्ण कल्याण व्हावे एवढीच प्रार्थना.

**॥ अवधून चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**

## सहस्त्रचंद्रदर्शनच्या आदल्या दिवशी वामन निवासात केलेले निरुपण

आचार्य-भगवान् शंकराचार्यांनी देवीचे स्तोत्र केलेले आहे. ती प्रार्थना करताना त्यांनी दोन तीन ठिकाणी असा उल्लेख केला आहे-

***'कुपुत्रो जायते क्वचिदपि कुमाता न भवति'***

माता ही कधीही कुमाता होत नाही. आपल्या मातेचा निरोप घेऊन ते बाहेर पडले. जगाचे कार्य त्यांना करायचे होते. संन्यास दीक्षा घ्यायची होती. आपला एकुलता एक मुलगा जातोय याचे त्यांच्या मातेला वाईट वाटले. पण महाराजांनी तिला आश्वासन दिले की ती जेव्हां त्यांचे स्मरण करील त्या वेळेस ते तिला दर्शन देतील. आणि त्याप्रमाणें अंत:काळी जेव्हां त्यांच्या मातेने त्यांचे स्मरण केले त्यावेळी ते तिथे आले आणि त्यांनी मातेला विष्णुलोकाला पोहोचविले आहे. त्या वेळचे त्यांचे श्रीकृष्णाष्टक प्रसिद्ध आहे.

***श्रियाश्लिष्टो विष्णु: स्थिरचरवपुर्वेदविषयो धियां साक्षी शुद्धो हरिरसुरहन्ताढजनयन: ।***
***गदी शंखी चक्री विमलवनमाली स्थिररुचि: शरण्यो लोकेशो मम भवतु कृष्णोऽक्षिविषय: ।***

आचार्य महाराजांनी हे स्तोत्र पूर्ण केल्यावर भगवान् श्रीहरि आपल्या सर्व गणांना घेऊन त्या तिथे आले आणि आचार्यांच्या मातेला आपल्या बरोबर घेऊन गेले. असा एक विशेष अविर्भाव आपल्या संस्कृतीमध्ये आहे.

शिवाजीराजे अगदी शेवटपर्यंत आपल्या मातेच्या आज्ञेमध्ये होते. त्यांचा राज्याभिषेक पाहून जिजामातांनी देह ठेवला. त्या वेळेला शिवाजीराजांनाही मातृशोक अनावर झाला. तर अशा रीतीने

मातापितरांचे स्मरण, सद्गुरु महाराजांचे स्मरण हेही आवश्यक आहे. ते आज नीलाताईंनी घडवून आणले. हा एक मोठा मंगल प्रसंग अनुभवता आला.

गुरुमहाराजांच्या पहिल्या पुण्यतिथी उत्सवामध्ये शिवोम्तीर्थमहाराज आले होते. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले, ''महाराज आता सर्वच ठिकाणी आहेत. पूर्वी व्यक्त रुपाने एकाच ठिकाणी जात होते. पण आता अव्यक्त रुपाने सर्वत्र ते राहिलेले आहेत.'' असे एक ते बोलून गेले.

*चिन्मयं व्यापियत्सर्वं त्रैलोक्यं सचराचरम् ।*
*तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नम: ॥*

तर 'सत्कर्म योगे वय घालवावे' या समर्थांच्या आदेशाप्रमाणें आपले आयुष्य घालवणारी पुण्यवान मंडळी आहेत. काया, वाचा, मनाने सत्कर्माचरण घडावे इकडे त्यांचे लक्ष आहे. मनाकडे लक्ष आहे, वाणीकडे लक्ष आहे, शरीराकडे लक्ष आहे. अशी जी जी मंडळी असतील ती सर्वही ईश्वररुपच आहेत असे म्हणायला हरकत नाही. त्याशिवाय इतका निग्रह, इतकी शक्ती त्यांना मिळाली नसती. अशा प्रकारच्या सर्वही विभूती भगवंताच्या आहेत. त्यांचे स्मरण जरी केले तरी आपला पापक्षय होतो आहे. आणि त्याची आवश्यकता आहे. ज्ञानराजही सांगतात, दूरितक्षय झाला पाहिजे. तर अशा प्रकारचा एक मंगल प्रसंग पहाण्याचे भाग्य आम्हाला सौ. नीलाताईंच्या योगाने मिळाले असें म्हणायला हरकत नाही. सर्वांना त्यात समाधान आहे. उद्यापासून आता पंचायतन याग, संहिता स्वाहाकार, शतचंडी याग वगैरेंना आरंभ होणार आहे. ही सर्वही पुण्यकर्म महात्म्यांच्या आशीर्वादाने पहायला मिळतात. ते आशीर्वाद महत्त्वाचे आहेत. सध्याच्या काळात अशा प्रकारची कर्म पहायला मिळणेही कठीण

आहे. मोठमोठी वैदिक, आचार्य मंडळीही येणार आहेत. बंगलोर जवळील कुडली मठाचे आचार्य येणार आहेत. ते तरुण असून मोठे योगी आहेत. अन्न वगैरे घेत नाहीत. वायुच्या आहारावर राहातात. अशी मोठी मोठी मंडळी आशीर्वाद देण्याकरता येणार आहेत. हा त्या पूज्य मातापित्यांचाच आशीर्वाद आहे. त्या आशीर्वादाचे आम्हाला नेहमी स्मरण असावे. नेहमी पाहिजे. ह्याची कोणी तरी आठवण करून द्यायला पाहिजे ना ! ती योजना गुरु-महाराजांनी जातानाच करुन ठेवली असे म्हणायला हरकत नाही. त्याप्रमाणे आज हा एक अव्यक्तरुपाने त्यांचाही आशीर्वाद मिळालेला आहे. आणि अव्यक्तरुपाने त्यांचा निवास सर्वत्र आहे. त्याशिवाय अशा प्रकारची कर्म घडत नाहीत.

सर्वे भद्राणि पश्यन्तु.........। सत्कर्म, मंगल पहायला अनुभवायला मिळो एवढीच परमेश्वराजवळ प्रार्थना.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**

